अखिल भारतीय प्राच्यविद्यासम्मेलन
शतवर्ष महोत्सव ग्रंथमाला – १०८

वराहोपनिषद्

डॉ. कलापिनी अगस्ती

प्रधानसंपादक
आचार्य श्रीनिवास वरखेडी
कुलगुरु

संपादक
आचार्य मधुसूदन पेन्ना
संचालक, संशोधन व प्रकाशन विभाग



कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय
CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection
रामटेक, जि. नागपुर (महाराष्ट्र)

शीर्षक	—	वराहोपनिषद्
लेखिका	—	डॉ. कलापिनी अगस्ती
प्रधानसंपादक	—	आचार्य श्रीनिवास वरखेडी कुलगुरु, क.का.सं.वि., रामटेक
संपादक	—	आचार्य मधुसूदन पेन्ना संचालक, संशोधन व प्रकाशन विभाग, क.का.सं.वि., रामटेक
अखिल भारतीय प्राच्यविद्या सम्मेलन	—	प्रो. गौतम पटेल, अध्यक्ष प्रो. सरोजा भाटे, सचिव प्रो. ग. उ. थिटे, उपाध्यक्ष
संपादक मंडळ	—	डॉ. दिनकर मराठे, क.का.सं.वि., रामटेक डॉ. वीणा गानु, नागपुर.
प्रकाशन वर्ष	—	२०२०
आवृत्ती	—	प्रथम
मूल्य	—	रू. **290/-**
आय.एस.बी.एन.	—	**978-93-85710-56-8**
मुखपृष्ठ	—	श्री. उमेश पाटील
मुद्रक	—	शिवनेरी ऑफसेट, नागपूर.
प्रकाशक	—	कुलसचिव, क.का.सं.वि., रामटेक प्रशासकीय भवन, मौदा रोड, रामटेक.

The KK Sanskrit University does not hold any responsibility regarding the content, language, originality, Plagiarism or views expressed by the author of these centenary publication books. The respective author is solely responsible.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

PREFACE

It is indeed a matter of great pleasure and pride for Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek to have this rarest opportunity of hosting the 50th session of All India Oriental Conference at Nagpur. This AIOC-50th session at Nagpur will be forever remembered by all as the year 2019 also happens to be the year of Centenary Celebration of AIOC. The premier objective with which the great scholars of yester years had contemplated and established this national academic event called All India Oriental Conference has been achieved through these years with scores of young scholars contributing significantly to the treasure house of knowledge through their valuable research work.

The research of yore and of the present should be properly recorded so as to make it easily available to all lovers of knowledge and wisdom in the years to come. With this objective, we have contemplated to commemorate the 100th year of this grand event of 50th session of AIOC by way of publishing 100 monographs on different subjects in four languages viz., Sanskrit, Hindi, Marathi and English. It is no doubt a herculean task but still worth of it, for the reason that these 100 monographs will inspire many young scholars to take upon a fresh study and research of the oriental subjects with more vigour and zeal.

The AIOC Centenary Publication Series includes wide variety of subjects like Literature, Language, Veda, Indian Philosophy, Sanskrit Grammar, Law, Children Literature, Yoga, Astronomy and Astrology, Ayurveda, Pali, Prakrit, Jain, Buddhism, Education, Library Science, Poetics, Aesthetics, and Indology. It also includes reprint of some rare texts of academic importance which have gone out of print are not easily available. We wish to mark this centenary celebrations with this series that connects the glory of the past and aspirations of future. I place on record my sincere gratitude to all the authors of these monographs who have kindly contributed to the richness of this series.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

I am confident that the books published in these series will definitely inspire the lovers of Oriental Learning in general and of Sanskrit Language and Literature in particular.

On this occasion, we have published a memorable book of all the speeches of Section-Presidents of all previous sessions of AIOC. It is indeed a very capacious addition to any collection. I with all respect thank two eminent scholars of our times - Prof. Gautam Patel, President and Prof. Saroja Bhate, General Secretary, the torch bearers of AIOC who have not only encouraged us in this venture but also made all efforts to provide these valuable historical speeches for us. I thank all executive members of AIOC and my colleagues of the varsity for making this event a grand success.

My words fall short in describing the painstaking efforts and scholarly commitment of my esteemed colleague Prof. Madhusudan Penna, local secretary of this session in bringing out this series.

I also take this opportunity to profusely thank Shri. Subhash Jain and Shri Dipak Jain, the proprietors of New Bharatiya Book Corporation, New Delhi for their enthusiastic approach and timely work with all precision and grace.

Let us all sanctify ourselves in the eternal flow of wisdom by reading these books and recommending these to others also!

सरस्वती श्रुतिमहती महीयताम्

Ramtek — Prof. Shrinivasa Varakhedi
10th January 2020 — Vice Chancellor, KKSU

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

Kavikulaguru Kalidas Sanskrit University
All India Oriental Conference

100th Year 50th Session
10th-12th January, 2020

Chief Patron
Hon'ble Nitin Gadkari
Minister of Road, Transport & Highways of India

Patron
Prof. Shrinivasa Varakhedi
Vice Chancellor, KKSU, Ramtek

AIOC President
Prof. Gautam Patel
Chairman, Sanskrit Seva Samiti, Ahmedabad.

AIOC General Secretary
Prof. Saroja Bhate
Professor of Sanskrit (Retd.), Pune University, Pune

AIOC Local Secretary
Prof. Penna Madhusudan
Dean, KKSU, Ramtek

Additional Local Secretary
Dr. Harekrishna Agasti
Dr. Kalapini Agasti
Dr. Dinakar Marathe
Dr. Parag Joshi

Organising Committee
Prof. C.G. Vijayakumar, Registrar (I/c) & Dean, KKSU, Ramtek
Prof. Nanda Puri, Dean, KKSU, Ramtek
Prof. Krishnakumar Pandey, Dean, KKSU, Ramtek
Prof. Laita Chandratre, Dean, KKSU, Ramtek
Dr. Ramachandra Joshi, Finance Officer, KKSU, Ramtek
Dr. Umesh Shivahare, Controller of Examination, KKSU, Ramtek
Dr. Dipak Kapade, Librarian, KKSU, Ramtek
Dr. Renuka Bokare, PRO, KKSU, Ramtek
Shri. Rajivranjan Mishra, Technical Head, KKSU, Ramtek
CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection
Shri. Pravin Kalambe, Security Officer, KKSU, Ramtek

Reception Committee

Prof. Shrinivasa Varakhedi, Chairperson Reception Committee & VC, KKSU
Parampujya Govindagiri Swamiji, Rishikesh
Prof. P.T. Chande, Former VC, KKSU
Prof. Uma Vaidya, Former VC, KKSU
Prof. Vijendra Kumar, VC, National Law University, Nagpur
Prof. Rajnish Shukla, VC, National Hindi University, Wardha
Prof. Vinayak Kane, VC, RTM Nagpur University, Nagpur
Shri. Krupal Tumane, Member of Parliament
Shri. Girishji Vyas, Member of Legislative Council
Shri. Chandrashekhar Bawankule, Guardian Minister, Nagpur
Prof. Vishram Jamdar, Director, VNIT, Nagpur
Dr. Bhushankumar Upadhyay, Commissioner of Police, Nagpur
Shri. Vijay Phanshikar, Editor, The Hitavada, Nagpur
Shri. Rajkumar Tirpude, Tirpude Group of Insitutions, Nagpur
Shri. Mohabbat Singh, Tuli International, Nagpur.
Shri. Chandragupta Varnekar, Principal Retd., Nagpur
Shri. Suresh Sharma, Baidyanath, Nagpur
Shri. Prabhakar Rao Mundle, Dharampeth Educational Institutions, Nagpur

Executive Committee

Prof. G. U. Thite,
Vice President

Dr. Brijeshkumar Shukla,
Treasurer

Members

Dr. Rajni Satish Chandra Jha
Prof. Shukla Ramakant
Dr. Behera Ranjit
Dr. Meena Shukla
Dr. Nirmala Kulkarni
Dr. Roy Gauri Nath
Dr. Tripathi Uma Rani
Dr. Pushpa Jha
Dr. Basu Ratna
Dr. Mithilesh Kumar
Prof. Singh Prasoon Dutta
Shri. Mishra Arun Ranjan
Dr. Mishra Baidyanath
Dr. Tripathi Rajendra Rasraj
Shri. Harshdev Madhav
Dr. Kamdev Jha
Dr. Parinita Deshpande
Dr. Jha Udayanath (Ashok)

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वराहोपनिषद्

डॉ. कलापिनी अगस्ती

विभाग प्रमुख, भारतीय दर्शन विभाग
कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय
रामटेक, जि. नागपुर

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वराहोपनिषद्

विषयानुक्रम

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

3) तृतीय अध्याय – अद्वितीयपरम आत्मानुभव
– सत्–चित्–आनंदरूप भगवंत
– मोक्षसाधनरूप भक्ती
– ईश्वराचे सर्वसमत्व
– संसाराचे कारण चित

4) चतुर्थ अध्याय – 1) ब्राह्मणम्
– सप्तभूमिकांमध्ये चार जीवन्मुक्तीभूमिका
– प्रणवाचे चातुर्विध्यम्
– चार प्रकारचे जीवन्मुक्त

2) मन्त्र
– सप्तभूमिकांचे वर्णन
– जीवन्मुक्तलक्षण
– विहंगमपिपीलिकामार्ग विवेक

5) पाचवा अध्याय – श्वाससंख्या
– देहक्षयनिवारणााठी भूतधारणविधी
– लय–मन्त्र–हठ त्रिविध योग
– अष्टांगयोग
– यम–नियमभेद
– अकरा आसने
– प्राणायाम
– नाडीचक्र
– तुरीयदर्शनअभ्यासविधी
– कालवंचन उपायरूप योग
– शिवशक्तिस्थान निरूपण
– ब्रह्मानुसंधानसहित प्राणायाम
– विघ्नशांतीसाठी प्रणवजप

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

– आरंभादी योगाच्या चार अवस्था
– विद्याफल

उपोद्धात

कृष्णयजुर्वेदीय असलेले हे वराह–उपनिषद ज्ञानयोगाचे विस्तृत वर्णन करणा–या उपनिषदांमध्ये महत्त्वपूर्ण असे आहे. ऋभुऋषी आणि वराह रूपातील भगवंत यांच्यातील संवाद रुपानेच अध्यायात या उपनिषदाचा विषय वर्णिला आहे. वराहरूपातील भगवंताने सांगितलेले तत्त्वज्ञान या उपनिषदाचा वर्ण्य विषय वर्णिला असल्याने या उपनिषदास वराहोपनिषद हे नामाभिधान करण्यात आले आहे.

ऋभुमुनींनी नम्रतेने व जिज्ञासेने भगवंताला तुझ्या स्वरूपज्ञानाने मुक्ती व तुझ्याविषयीच्या अज्ञानाने बंध मिळतो त्यामुळे तुझ्या स्वरुपाला प्रतिपादित करणा–या ब्रह्मविद्येचे कथन कर अशी विनंती केल्यावर भगवंताने ब्रह्मविद्येचे सुलभ सारगर्भ विवेचन या उपनिषदात केले आहे. संपूर्ण विश्वातील एकूण शहाण्णव तत्त्वांचे वर्णनही या निमित्याने प्रस्तुत उपनिषदात भगवंताने केले आहे. आत्म्याचे स्वरूप वर्णन करताना आनन्दरूपत्व, स्वयंप्रकाशत्व, स्वरूपत्वचिन्मयत्व आदींचे अत्यंत तात्विक विवेचन या उपनिषदातील अध्यायांमध्ये केले आहे.

चित्त हेच संसारचक्रांचे कारण आहे. तर या संसारातून मुक्ती मिळविण्यासाठी भक्ती हा सर्वोत्तम उपाय आहे. भक्तीचे माहात्म्य वर्णितांना प्रणव, प्रणवाच्या मात्रा यांचे अत्यंत मार्मिक वर्णन यात आले आहे. जीवनमुक्ती, योगाच्या सात भूमिका, जीवनमुक्तीचे लक्षण, योगाचे अष्टांग, नाडीचक्र, आरंभादि योगाच्या चार अवस्था आदिचेही सूक्ष्म विवेचन या उपनिषदात आढळते. तुर्यतुर्यातीत अवस्थेचे अत्यंत तात्विक विवेचन या उपनिषदाचा केन्द्रबिंदू आहे. योग व वेदान्तजिज्ञासूंसाठी अतिशय ज्ञानगर्भ आणि तात्विक तरीही सुलभ, सरस असे हे वराहोपनिषद् अत्यंत उपयुक्त आहे.

डॉ. कलापिनी अगस्ती

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वराहोपनिषद्

सह नाववतु–इति शान्तिः ।

प्रथमोध्याऽयः

तत्त्वसंख्याविकल्प

अथ ऋभुर्वै महामुनिर्देवमानेन द्वादशसंवत्सरं तपश्चचार। तदवासने वराहरूपी भगवान् प्रादुरभूत्। स होवाचोत्तिष्ठोत्तिष्ठ वरं वृष्णीष्वेति। सोदतिष्ठत्। तस्मै नमस्कृत्योवाच भगवन् कामिभिर्यद्यत् कामितं तत्तत् त्वत्सकाशात् स्वप्नेऽपि न याचे। समस्तवेदशास्त्रेतिहासपुराणानि समस्तविद्याजालानि ब्रह्मादयः सुराः सर्वे त्वद्रूपज्ञानान्मुक्तिमाहुः। अतस्त्वद्रूपप्रतिपादिकां ब्रह्मविद्यां ब्रूहीति होवाच। तथेति स होवाच वराहरूपी भगवान्।

ऋभु महामुनिंनी बारावर्षे तपश्चर्या केली. ती पूर्णझाल्यावर भगवान वराहरूपात (त्यांच्यासमोर) प्रकट झाले. ते म्हणाले, 'उठ उठ, वर माग'. (हे ऐकून) ऋभु गोष्टीची मुनी उठले. त्यांना नमस्कार करून म्हणाले, "भगवंत, कामना करणाऱ्यांनी ज्या–ज्या कामना (इच्छा) केली ते मी तुमच्याकडे स्वप्नातसुद्धा मागत नाही. सर्व वेद, शास्त्र, इतिहास, पुराण, सर्व विद्यासमूह, ब्रह्मादि सर्व देवता तुझ्याच स्वरूपाच्या ज्ञानाने मुक्ती प्राप्त होते असे सांगतात. म्हणूनच स्वरूपाचे वर्णन करणारी ब्रह्मविद्या मला तुम्ही कथन करा. (हे ऐकून) भगवंत म्हणाले, 'ठीक आहे. (भगवंताने ब्रह्मविद्या सांगण्यास सुरवात केली.)

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चतुर्विंशतितत्त्वानि केचिदिच्छन्ति वादिनः।

केचित् षट्त्रिंशतत्त्वानि केचित् षण्णवतीति च।।1।।

तेषां क्रमं प्रवक्ष्यामि सावधानमनाः शृणु।।

संधिविच्छेद –केचिदिच्छन्ति–केचित्+इच्छन्ति। षण्णवतीति –षट् +नवति + इति

शब्दार्थ – चतुर्विंशतितत्त्वानि– चौवीस तत्त्वे

केचित्– काही जण, इच्छन्ति – इच्छा करतात

षट्त्रिंशत्– छत्तीस, षण्णवतीति– शहाण्णव

अन्वय –केचित् वादिनः चतुर्विंशतितत्त्वानि , केचित षट्त्रिंशतत्त्वानि, केचित् षण्णवति इति च इच्छन्ति। तेषां क्रमं प्रवक्ष्यामि। सावधानमनाः शृणु।

अर्थ –काही दार्शनिक (सांख्य इ.) चोवीस तत्त्वे आहेत असे मानतात तर काही (शैवादि) दार्शनिक छत्तीसतत्त्वे तर काही शहाण्णवतत्त्वे मानतात. त्या सर्व तत्त्वांचे क्रमशः वर्णन करतो. ते तू एकाग्रचित्त होऊन ऐक.

चतुर्विंशतितत्त्वानि

ज्ञानेन्द्रियाणि पञ्चैव श्रोत्रत्वग्लोचनादयः।।2।।

कर्मेन्द्रियाणि पञ्चैव वाक्पाण्यङ्घ्र्यादयः क्रमात्

प्राणादयस्तु पञ्चैव पञ्च शब्दादयस्तथा।।3।।

मनोबुद्धिरहंकारश्चित्तं चेति चतुष्टयम्

शब्दार्थ –पञ्चैव – पाचच, पाणि – हात, वाक् – वाणी

अन्वय –श्रोत्रत्वग्लोचनादयः पञ्चैव ज्ञानेन्द्रियाणि। वाक्पाण्यङ्घ्र्यादयः पञ्चैव क्रमात् कर्मेन्द्रियाणि, प्राणादयस्तु पञ्चैव शब्दादयः तथा पञ्च। मनोबुद्धिरहङ्कारश्चित्तं च इति चतुष्टयम् इति (चतुर्विंशतितत्त्वानि भवन्ति)

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ –श्रोत्र, त्वचा, नेत्र, रसना आणि नासिका ही पाच ज्ञानेन्द्रिय होय. वाक्, पाणि (हात्). पाद, पायू, उपस्थ अशी क्रमाने पाचच कर्मेन्द्रिय आहेत. प्राणादि (प्राण, अपान, व्यान, उदान, समान) पाच वायू आहेत. तसेच शब्दादि (शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे तन्मात्र) पाच आहेत. मन, बुद्धि, अहंकार आणि चित्त हे चार अन्तःकरण आहे. अशी एकूण चोवीस तत्त्वे असल्याचे ब्रह्मतत्त्वाचे जाणकार सांगतात.

वैशिष्ट्य –पंच ज्ञानेद्रिय, पंच कर्मेन्द्रिय, पंचप्राण, पंचतन्मात्र आणि अन्तःकरण चतुष्टय अश्या एकूण 24 तत्त्वांचे वर्णन प्रस्तुत श्लोकात केले आहे.

षट्त्रिंशतत्त्वानि

एतैस्तत्वैः समं पञ्चीकृतभूतानि पञ्च च।
पृथिव्यापस्तथा तेजो वायुराकाश एव च।।5।।
देहत्रयं स्थूलसूक्ष्मकारणानि विदुर्बुधाः
अवस्थात्रितयं चैव जाग्रत्स्वप्नसुषुप्तयः।।6।।
आहत्य तत्त्वजातानां षट्त्रिंशन्मुनयो विदुः।

शब्दार्थ –पञ्चीकृतभूतानि – पंचीकरण झालेली भूत (महाभूत), आप – जल, देहत्रय – तीन प्रकारचे देह, विदुः–जाणले, बुधाः – जाणकर(विद्वान),अवस्थात्रय – तीन अवस्था, आहत्य – एकूण, षट्त्रिंशत् – छत्तीस

अन्वय –एतैः तत्त्वैः समंपञ्चीकृतभूतानि पृथिव्यापस्तथा तेजो वायुः आकाश च पञ्च एव च। देहत्रयं स्थूलसूक्ष्मकारणानि बुधाः विदुः। जाग्रत्स्वप्नसुषुप्तयः च एव अवस्थात्रयम्, तत्त्वजातानां आहत्य षट्त्रिंशत् (इति) मुनयः विदुः।

अर्थ –या (चोवीस) तत्त्वांसोबत पंचीकृत पृथिवि, आप, तेज, वायू, आकाश ही पाच महाभूते, स्थूल, सूक्ष्म आणि कारण ही तीन शरीरे विद्वानांनी सांगितली आहे. तसेच

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जाग्रत, स्वप्न, सुषुप्ती या तीन अवस्था असे सर्व तत्त्व मिळून एकूण छत्तीस तत्त्वे मुनींनी वर्णिली आहेत.

वैशिष्ट्य –प्रथम चोवीस तत्त्वंचा उल्लेख करून पुढे त्यात पंचमहाभूत, तीन शरीरे, तीन अवस्था, यांचा समावेश करून छत्तीस तत्त्वांचा उल्लेख यात केला आहे.

षण्ववतितत्त्वानि

पूर्वोक्तैस्तत्त्वजातैस्तु समं तत्त्वानि योजयेत्।।7।।

षड्भावविकृतिश्चास्ति जायते वर्धतेऽपि च।

परिणामं क्षयं नाशं षड्भावविकृतिं विदुः।।8।।

शब्दार्थ – योजयेत – योजित करावे, वर्धते – वाढते, परिणामं – परिवर्तन होणे, क्षयं – क्षीण होणे

अन्वय –पूर्वोक्तैः तत्त्वजातैः समं तु तत्वानि योजयते्। (तानि) षड्भावविकृतिः च अस्ति जायते, वर्धते, परिणामं, क्षयं, नाश षड्भावविकृतिं विदुः

अर्थ –पूर्वी वर्णिलेल्या (छत्तीस) तत्त्वांसह पुढील तत्त्वे योजावी. यात अस्ति, (आहे) जायते (उत्पन्न होते), वर्धते (विकसित होते), परिणाम (परिणाम पावते), क्षय (क्षीण होते), नाश (नष्ट होते) ही षट्भावविकृती सांगितली आहे.

वैशिष्ट्य – निरुक्तादी ग्रंथांमध्ये वर्णिलेले वस्तूंचे षड् भावविकार यात स्पष्ट केले आहेत. प्रत्येक वस्तुची निर्मिती म्हणजे जायते, पुढे तिचा विकास होणे म्हणजे वर्धते, तिच्यात होणारे परिवर्तन म्हणजे परिणाम, हळू हळू कालांतराने तीची होणारी क्षती म्हणजे क्षय, व तिचा शेवट म्हणजे नाश हे सहा भाव विकार सर्वांनमध्ये होतात.

अशना च पिपासा च शोकमोहौ जरा मृतिः।

एते षडूर्मयः प्रोक्ता षट्कोशानथ वच्मि ते।।9।।

त्वक् च रक्तं मांसमेदोमज्जास्थीनि निबोधत।

कामक्रोधौ लोभमोहौ मदो मात्सर्यमेव च।।10।।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

एतेऽरिषट्का विश्वश्च तैजसः प्राज्ञ एव च।

जीवत्रयं सत्त्वरजस्तमांसि च गुणत्रयम्।।11।।

शब्दार्थ –अशना – भूक,पिपासा – तहान, जरा – वार्धक्य, ऊर्मयः – लाटा, (द्वन्द्व),षट्कोशान–सहाकोश, वच्मि– मी सांगतो, निबोधत – जाण, अरिषटकाः – सहाप्रकारचे वैरी

अन्वय –अशनाच पिपासा च शोकमोहौ जरा मृतिः एते षट् ऊर्मयः प्रोक्ताः, षट्कोशान् अथ ते वच्मि । त्वक् च रक्तं मांसमेदोमज्जास्थीनि निबोधत। कामक्रोधौ लोभमोहौ मदः मात्सर्यम् एव च एते अरिषट्काः , विश्वः तैजसः प्राज्ञ एव च जीवत्रयं । सत्त्वरजस्तमांसि च गुणत्रयम्।

अर्थ – (या तत्त्वांसोबतच) भूक–तहान, शोक–मोह, जन्म–मृत्यू ही सहा द्वन्द्व (उर्मयः) सांगितली आहेत. आता तुझ्यासाठी षट्कोशांचे (षाट्कौशिक देहाचे) वर्णन करतो. त्वचा, रक्त, मास, मेद (चरबी), मज्जा, अस्थी ही सहा (देहाचे) कोश आहे हे जाण. काम, क्रोध, लोभ, मोह, मद (गर्व), मत्सर हे सहा आपले शत्रू आहेत आणि विश्व, तैजस्, प्राज्ञ हे तीन जीव व सत्त्व, रज, तम हे तीन गुण आहेत.

वैशिष्ट्य–स्थूलदेहातील रक्त मांस आदि धातूंचा प्राणिमात्रांतील तहान भूक आदि आवश्यकतांचा, प्राणिमात्रांच्या सद्गतीच्या मार्गात अडथळे निर्माण करणाऱ्या लोभमोहादि वैरींचा व अधिष्ठातारूप असलेल्या जीवांचा व त्रिगुणांचा उल्लेख प्रस्तुत श्लोकात केला आहे.

प्रारब्धागाम्यर्जितानि कर्मत्रयमितीरितम्

वचनादानगमनविसर्गानन्दपञ्चकम्।।12।।

संकल्पोऽध्यवसायश्च अभिमानोऽवधारणा।

मुदिता करूणा मैत्री उपेक्षा च चतुष्टयम्।।13।।

दिग्वातार्कप्रचेतोऽश्विवह्नीन्द्रोपेन्द्रमृत्युकाः।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तथा चन्द्रश्चतुर्वक्त्रो रुद्रः क्षेत्रज्ञ ईश्वरः ।।14।।

आहत्य तत्त्वजातानां षण्णवतिस्तु कीर्तिताः ।

शब्दार्थ –अर्जितानि–अर्जित केलेली, ईरितम् – सांगितले आहे, विसर्ग – विसर्जन, अध्यवसाय – निश्चय, दिक् – दिशा, वात – वायू, चतुर्वक्त्रो –ब्रह्म

अन्वय –प्रारब्धागाम्यर्जितानि कर्मत्रयम् ; वचनादानगमनविसर्ग आनन्दपञ्चकम् इति ईरितम् । संकल्पः अध्यवसायः अभिमानः अवधारणामुदिता, करुणा, मैत्री, उपेक्षा च एते चतुष्टयम् । दिक्–वात–अर्क–प्रचेत–अश्विनी–वह्नि–इन्द्र–उपेन्द्र–मृत्युकाः तथा चन्द्रः, चतुर्वक्त्रः, रुद्रः क्षेत्रज्ञः, ईश्वरः (इति) तत्त्वजातानाम् आहत्य षण्णवतिः तु कीर्तिताः ।

अर्थ– प्रारब्ध, अनागत आणि अर्जित अशी तीन प्रकारची कर्मे सांगितली आहेत. वचन (बोलणे), आदान, गमन, विसर्ग आणि आनंद ही पाच (कर्मेन्द्रियांचे कार्य) आहेत. संकल्प करणे, निश्चय करणे, अभिमान करणे आणि अवधारण करणे ही चार (अन्तकरणचतुष्ट्याची कार्य) आहेत. तर मुदिता, करुणा, मैत्री, उपेक्षा या चार (अनुक्रमे सुख, दुःख, पुण्य, अपुण्य या विषयांप्रती ठेवावयाच्या भावना) आहेत. दिशा, वायू, सूर्य, वरुण, अश्विनी, अग्नी, इन्द्र, उपेन्द्र, यम, चंद्र, ब्रह्म, रुद्र, जीवात्मा आणि परमात्मा अशी एकूण छहाण्णव तत्त्वे मानली गेली आहेत. (ख्यात आहेत.)

वैशिष्ट्य–श्लोक क्र.7 पासून 14 पर्यंतच्या श्लोकात एकूण शहाण्णव तत्त्वांचे स्वरूप मांडण्यात आले आहे. षड्भावविकार तहानभूक आदि गरजा, षाट्कोशिक देह, कामक्रोधादि सहावैरी, जीवत्रय, गुणत्रय, कर्मत्रय, कर्मेन्द्रियांचे पंच कार्य, अन्तःकरण चतुष्ट्याचे चार कार्य, भावना चतुष्ट्य, व तत्वांनुसार अधिष्ठाता देवता इत्यादिंचा शहाण्णव तत्वांमध्ये अन्तर्भाव करण्यात आला आहे.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तत्त्वातीतभगवद्भक्तेरेव मुक्तिः

पूर्वोक्ततत्त्वजातानां वैलक्षण्यमनामयम् ।।15।।

वराहरूपिणं मां ये भजन्ति मयि तत्वतः ।

विमुक्ताज्ञानतत्कार्या जीवन्मुक्ता भवन्ति ते ।।16।।

संधिविच्छेद –तत्त्वातीतभगवद्भक्तेरेव – तत्त्व + अतीतभगवद्भक्तेः + एव । पूर्वोक्ततत्त्वजाताना – पूर्व + उक्ततत्त्वजातानां । वैलक्षण्यमनामयम् – वैलक्षण्यम् + अनामयम् । विमुक्ताज्ञानतत्कार्या – विमुक्त + अज्ञानतत्कार्या ।

शब्दार्थ –अनामयम् – शुध्द, विमुक्त – मुक्त, अज्ञानतत्कार्य – अज्ञानजनीत कार्य

अन्वय –पूर्वोक्ततत्त्वजातानां अनामयम् वैलक्षण्यं वराहरूपिणं मां ये भजन्ति विमुक्ताज्ञनतत्कार्याः जीवनमुक्ताः ते तत्त्वतः मयि भवन्ति ।

अर्थ– पूर्वी वर्णिलेल्या (छहाण्णव) तत्त्वांची त्या अनामय म्हणजे शुद्ध विष्णुतत्त्वाशी पूर्णतः विलक्षणता आहे. (अर्थात् शुद्ध परमतत्त्व हे या तत्त्वांपासून पूर्णतः भिन्न आहे.) जे साधक वराहरूपातील माझ्यावर (विष्णूवर) पूर्णतः भक्ती करतील ते अज्ञान व तत् जनित सर्व कार्यातून मूक्त होतील. ते जीवनमुक्त होतील.

वैशिष्ट्य–पूर्व वर्णित चोवीस, छत्तीस व शहाण्णव या सर्व तत्त्वांपासून विष्णु तत्त्व पूर्णतः भिन्न आहे. जो साधक विशुध्द अशा विष्णुची साधना करतो तो अज्ञान व तन्निर्मित संसारपाशापासून मुक्त होतो मोक्षाचा अधिकारी होतो.

तत्त्वज्ञानफलम्

ये षण्णवतितत्वज्ञा यत्र कुत्राश्रमे रताः ।

जटी मुण्डी शिखी वापि मुच्यते नात्र संशयः ।।17।।

संधिविच्छेद –षण्णवतितत्वज्ञाः – षट् + नवतितत्वज्ञाः । कुत्राश्रमे – कुत्र + आश्रमे । नात्र – न + अत्र । वापि – वा + अपि

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शब्दार्थ –षण्णवतितत्वज्ञाः – शहाण्णव तत्त्वांचा जाणकार, कुत्राश्रमे – आश्रमात (ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम इ.) असलेला. त्या त्या आश्रमानुसार कर्म धारण करणारा.

अन्वय –षण्णवतितत्वज्ञाः – ये यत्र कुत्र आश्रमे रताः, जटी, मुण्डी शिखी वा अपि मुच्यते अत्र संशयः नास्ति।

अर्थ –जे या छहाण्णव तत्त्वांचे जाणकार होतात (या तत्त्वांचे यथार्थज्ञान प्राप्त करतात) ते जरी, मुण्डी, शिखी वा अन्य कोणी असो ते कोणत्याही आश्रमात रत असो ते मुक्ती प्राप्त करतात यात जराही शंका नाही.

वैशिष्ट्य –मुक्तीचा अधिकारी आश्रमानुसार ठरत नसून तो साधक कोणत्याही आश्रमात असो जसा ब्रह्मचर्याश्रमात वा गृहस्थाश्रमात असून तो आश्रमानुसार आपले कर्म धारण करीत असेल व शहाण्णव तत्त्व पूर्णतः जाणत असेल तर तो मुक्त होण्यास अधिकारी आहे असे येथे वर्णिले आहे.

इतिप्रथमोऽध्यायः



CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

द्वितीयोऽध्यायः

साधनचतुष्टयसंपत्तिः

ऋभुर्नाम महायोगी क्रोडरूपं रमापतिम्
वरिष्ठां ब्रह्मविद्यां त्वमधीहि भगवन् माम्।।1।।
एवं स पृष्टो भगवान् प्राह भक्तार्तिभञ्जनः।
स्ववर्णाश्रमधर्मेण तपसा गुरुतोषणात्।।2।।
साधनं प्रभवेत् पुंसां वैराग्यादिचतुष्टयम्।
नित्यानित्यविवेकश्च इहामुत्र विरागता।।3।।
शमादिषट्कसंपत्तिर्मुमुक्षा तां समभ्यसेत्

संधिविच्छेद –ऋभुर्नाम – ऋभुः + नाम । त्वमधीहि – त्वम् + अधीहि । भक्तार्तिभञ्जनः – भक्त + आर्तिभञ्जनः – स्वर्णाश्रमधर्मेण – स्ववर्ण + आश्रमधर्मेण । वैराग्यादिचतुष्ट्यम्– वैराग्य + आदिचतुष्टयम्। नित्यानित्यविवेकश्च – नित्य + अनित्यविवेकः + च । इहामुत्र– इह + अमुत्र । शमादिषट्कसंपत्तिर्मुमुक्षा – शम + आदिषट्कसंपत्तिः + मुमुक्षा । समभ्यसेत् – सम् + अभ्यसेत्

शब्दार्थ –भक्तार्तिभञ्जनः – भक्तांच्या संकटांचा नाश करणारा, वैराग्यादिचतुष्टयम् – साधन चतुष्टय

अन्वय –भगवन् । माम् वरिष्ठां ब्रह्मविद्यां त्वम् अधीहि (इति) ऋभुर्नाम महायोगी क्रोडरुपं रमापतिं प्राह। एवं पृष्टः भक्तार्तिभञ्जनः स भगवान प्राह स्ववर्णाश्रमधर्मेण तपसा गुरुतोषणात् वैराग्यादिचतुष्टयं साधनं पुंसा प्रभवेत् । नित्यानित्यविवेकश्च इह–अमुत्र विरागताशसंपत्तिः मुमुक्षा तां समभ्यसेत् (इति)।

अर्थ– ऋभु नावाच्या त्या महायोगीने वराहरूपातील लक्ष्मीच्या पतीला (विष्णूला) परमश्रेष्ठ असलेली ती ब्रह्मविद्या माझ्यासाठी कथन कर असे म्हटले. अशाप्रकारे

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याच्याकडून विचारणा झालेला, भक्तांच्या संकटांचा नाश करणारा तो भगवंत म्हणाला, "स्वतःच्या वर्ण व आश्रम यात विहित धर्माच्या आचरणाने, तपाने व गुरुकृपेने मनुष्य वैराग्य इत्यादी चार साधने प्राप्त करतो (ती साधने म्हणजे) नित्य–अनित्य वस्तूंविषयी सारासार विचार करणे, इह लोक व परलोकांतील विषयांबाबत वैराग्य प्राप्त करणे, शम्, दम् इत्यादि सहा तत्त्वांचे आचरण करणे व मोक्षप्राप्तीची इच्छा असणे. या चार साधनांचा नित्य अभ्यास करावा.

वैशिष्ट्य –वेदान्ताचा अधिकारी हा वेदज्ञानसंपन्न व साधनचतुष्टय संपन्न असावा असा (अथातो ब्रह्मजिज्ञासा) (ब्रह्मसूत्र 1.1) वेदान्तशास्त्राचा नियम आहे. या उपनिषदात आश्रमपालन, तप व गुरुकृपा साधक सहज साधनचतुष्टय संपन्न होतो असे वर्णिले आहे. ही साधने म्हणजे

1. नित्यानित्यवस्तुविवेक – सत् काय व असत् काय हे सारासार जाणण्याची क्षमता
2. इहामूत्रफलभोगविराग – इहलोक व परलोकातील भोग भोगण्याची इच्छा नसणारा विरक्त
3. शमादिषट्क – शम, दम, उपरति, तितिक्षा इ. ने युक्त असणारा
4. मुमुक्षा – मुक्त होण्याची इच्छा

ब्रह्मात्मज्ञान्येव कृतकृत्यः

एवं जितेन्द्रियो भूत्वा सर्वत्र ममतामतिम् ।।4।।

विहाय साक्षिचैतन्ये मयि कुर्यादहंमतिम्

दुर्लभं प्राप्तं मानुष्यं तत्रापि नरविग्रहम् ।।5।।

ब्राह्मण्यं च महाविष्णोर्वेदान्तश्रवणादिना ।

अतिवर्णाश्रमं रूपं सच्चिदानन्दलक्षणम् ।।6।।

यो न जानाति सोऽविद्वान् कदा मुक्तो भविष्यति ।

संधिविच्छेद –कुर्यादहंमतिम्– कुर्यात् + अहंमतिम्। तत्रापि – तत्र + अपि । महाविष्णोर्वेदान्तश्रवणादिना – महाविष्णोः + वेदान्तश्रवणादिना । अतिवर्णाश्रमं – अतिवर्ण + आश्रमं । सच्चिदानन्दलक्षणम् – सत् + चित् + आनन्दलक्षणम् । सोऽविद्वान– सः अविद्वान्

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शब्दार्थ –जितेन्द्रियो – इंद्रियांवर विजय मिळविलेला, ममतामतिम् – ममत्व बुध्दी, विहाय – सोडून, मानुष्यम् – मानव देह, नरविग्रहम् – पुरूषदेह

अन्वय –एवं जितेन्दियः भूत्वा सर्वत्र ममतामतिं विहाय साक्षिचैतन्ये मयि अहंमतिं कुर्यात् । दुर्लभं मानुष्यं प्राप्तं तत्रापि नरविग्रहम् (दुर्लभम्) ब्राह्मण्यं च महाविष्णोः वेदान्तश्रवणादिना ।अतिवर्णाश्रमं रूपं सच्चिदानन्दलक्षणं यः न जानाति सः अविद्वान् कदा मुक्तो भविष्यति

अर्थ– अशाप्रकारे (साधनचतुष्टय संपन्न झाल्यावर) इन्द्रियांवर विजय प्राप्त करून, सर्व विषयांबाबतची ममत्वबुद्धी सोडून, साक्षिरुप असलेल्या परम चैतन्याच्या ठिकाणी अर्थात् माझ्यामध्ये निज स्वरूपाला जाणावे (अर्थात्) माझ्या स्वरूपात 'हा मीच आहे' अशी भावना करावी. मनुष्यत्व अतिशय दुर्लभ आहे त्यातही नरदेह प्राप्त करणे दुर्लभ आहे. त्यातही ब्राह्मण्यता प्राप्त करणे दुर्लभ आहे. त्यापेक्षाही महाविष्णूकडून वेदान्तश्रवणादि करावयास मिळणे अत्यंत दुर्लभ आहे. वर्ण आणि आश्रम यांच्या धर्माच्या परे असलेले असे हे सच्चिदानन्द स्वभाव असलेल्या विष्णूचे रूप आहे. हे (ज्ञान) जो जाणत नाही तो अविद्वान केव्हा मुक्ती प्राप्त करेल? (अर्थात कधीच मुक्ती प्राप्त करू शकणार नाही.)

वैशिष्ट्य–मानवदेहाला कर्मयोनी म्हणतात हे सर्वश्रुत आहे. या देहातच जीव स्वोन्नती करण्यास पात्र असतो. जो अविद्वान नरदेहाची महती न समजता हे जीवन अज्ञानात रममाण होऊन व्यर्थ व्यतीत करतो. त्यास मोक्ष कसा मिळू शकेल असा प्रश्न येथे उपस्थित केला आहे. मात्र जो साधक मानव देहात राहून विष्णुचे स्वरुप जाणतो व 'तोमीच आहे' असे अद्वैतज्ञान मिळवतो त्याचाचजन्म सार्थक झाला असे समजावे.

आत्मनः सुखरूपत्वम्

अहमेव सुखं नान्यदन्यच्चनैव तत् सुखम् ।।7।।
अमदर्थं न हि प्रेयो मदर्थं (तु)(तत्) स्वतःप्रियम् ।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

परप्रेमास्पदतया मा न भूवमहं सदा ।।8।।
भूयासमिति यो द्रष्टा सोऽहं विष्णुर्मुनीश्वर ।

संधिविच्छेद – अहमेव – अहम् + एव । नान्यदन्यच्च– न + अन्यत् + अन्यत् च । नैव – न + एव । अमदर्थं – अ (न) + मत् + अर्थं । मदर्थं – मत + अर्थं । भूवमहं – भूवम् + अहं । भूयासमिति – भूयासम् + इति । सोऽहं – सः + अहं । विष्णुर्मुनीश्वरः – विष्णुः + मुनीश्वरः ।

शब्दार्थ –नान्यद् – दुसरे नाही, आमदर्थम् – माझ्यासाठी नसलेला, स्वतःप्रियम् – स्वतःसाठी प्रिय असलेले, परप्रेमास्पद – परम प्रेमाचे अधिष्ठान,भूयायम् – होणारा

अन्वय –अहमेव सुखं न अन्यत्, अन्यत् च तत् न एव सुखम् । अमदर्थं हि न प्रियः मदर्थं (तु तत्) स्वतःप्रियम् । (हे) मुनीश्वर परप्रेमास्पदतया मा भूवम् अहं न, सदा भूयासम् इति यः द्रष्टा सः अहं विष्णुः

अर्थ– जे काही सुख आहे ते मीच आहे. मला सोडून अन्य कोणते सुख नाही. जर असेल तर ते सुख नव्हे. जे काही माझ्यासाठी नाही ते प्रिय नाही आणि माझ्यासाठी असेल तर ते स्वतः प्रिय आहे. मी परम प्रेमाचे स्थान असल्यामुळे मी कधीही नाही (राहणार) असे होणार नाही. मी नेहमी राहणार आणि हे मुनीश्वर, असे जो जाणतो तो व्यापक असल्यामुळे मीच विष्णु होतो. (तो द्रष्टा साधक मीच अर्थात् विष्णूरूप होतो.)

वैशिष्ट्य–ज्या साधकाला विष्णुच्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान झाले आहे. तो साधक सर्वत्र विष्णुमयत्व अनुभवतो व स्वतःही विष्णुरूप होतो यात शंका नाही

आत्मनः स्वयंप्रकाशत्वम्

न प्रकाशोऽहमित्युक्तिर्यत्प्रकाशैकबन्धना ।।9।।

स्वप्रकाशं तमात्मानमप्रकाशः कथं स्पृशेत् ।

स्वयं भातं निराधारं ये जानन्ति सुनिश्चितम् ।।10।।

ते हि विज्ञानसंपन्ना इति मे निश्चिता मतिः ।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संधिविच्छेद –प्रकाशोऽहमित्युक्तिर्यत्प्रकाशैकबन्धना – प्रकाशः + अहम् : इति + उक्तिः + यत् + प्रकाश + एकबन्धना । तमात्मानमप्रकाशः – तम् + आत्मानम् + अप्रकाशः । निराधारं – निर् + आधारं ।

शब्दार्थ –निराधारं – आधाराशिवाय, सुनिश्चितम् – निश्चितरूपाने, विज्ञानसंपन्ना –तत्त्वज्ञानी

अन्वय –अहं प्रकाशः न इति प्रकाशैकबन्धना यदुक्तिः , तम् आत्मानं स्वप्रकाशं अप्रकाशः कथं स्पृशेत् , भातं निराधारं ये स्वयं सुनिश्चितं जानन्ति विज्ञानसंपन्नाः हिते इति निश्चता मे मतिः ।

अर्थ– मी स्वप्रकाश नाही (मी तेजो रूप नाही) असे वचन ज्या प्रकाशावरच अवलंबून असते त्या स्वप्रकाश आत्म्याचे उपप्रकाश म्हणजे जड इन्द्रियादि कसे ग्रहण करणार. स्वप्रकाश निराधार अशा आत्मतत्त्वाला जे निश्चितपणे जाण त ते खरच विज्ञानाने सम्पन्न आहेत ही माझी निश्चितबुद्धि आहे. (असे माझे ठाम मत आहे.)

वैशिष्ट्य –आत्मा हा स्वयंप्रकाशित आहे. ही जड सृष्टी आत्मप्रकाशाच्या अधिष्ठानाने प्रकाशित होते. जो सर्व तत्त्वांचा आधार आहे. पण ज्यास अन्य कोणाच्याही आधाराची आवश्यकता नाही अश्या निराधार स्वप्रकाश असलेल्या आत्म्याला जाणणारा साधकच खरा तत्त्वज्ञानी होय.

आत्मनः मायातत्कार्यविलक्षणत्वम्

स्वपूर्णात्मातिरेकेण जगज्जीवेश्वरादयः ।।11।।
न सन्ति नास्ति माया च तेभ्यश्चाहं विलक्षणः ।
अज्ञानान्धतमोरूपं कर्मधर्मादिलक्षणम् ।।12।।
स्वयंप्रकाशमात्मानं नैव मां स्प्रष्टुमर्हति ।

संधिविच्छेद –स्वपूर्णात्मातिरेकेण – स्वपूर्णात्मा + अतिरेकेण । जगज्जीवेश्वरादयः – जगत् + जीव + ईश्वरादयः । नास्ति – न + अस्ति । तेभ्यश्चाहं – तेभ्यः + च + अहम् । अज्ञानान्धतमोरुपं – अज्ञान + अन्धतमोरूपं । कर्मधर्मादिलक्षणम् – कर्मधर्म

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

+ आदिलक्षणम् । स्वयंप्रकाशमात्मानं – स्वयंप्रकाशम् + आत्मानम् । नैव – न + एव । स्प्रष्टुमर्हति – स्प्रष्टुम् + अर्हति ।

शब्दार्थ –स्वपूर्णात्म – स्वयंपूर्ण, विलक्षणः – वेगळा

अन्वय –जगज्जीवेश्वरादयः स्वपूर्णात्मातिरेकेण न सन्ति । माया च नास्ति । तेभ्यः अहं च विलक्षणः । अज्ञानान्धतमोरूपं कर्मधर्मादिलक्षणं स्वयंप्रकाशमात्मानं मां नैव स्प्रष्टुमर्हति ।

अर्थ– स्वयंपूर्ण अशा आत्म्याहून जगत्, जीव, ईश्वर इत्यादि भिन्न नाहीत. माया पण नाही. हे आत्मतत्त्व त्यापासून विलक्षण आहे. अंधकाररूपी अज्ञानाचे कर्म, धर्म इत्यादि भाव स्वप्रकाशरूप असलेल्या आत्मस्वरूपाला कधीच स्पर्श करू शकत नाही.

वैशिष्ट्य–कर्मधर्मादि भाव हे अज्ञान जनीत असल्याने ते ज्ञानरूप आत्म्याला कधीच स्पर्श करीत नाही म्हणून योगदर्शनात ईश्वराचे स्वरूप वर्णितांना ''क्लेशकर्म विपाकाशयैः अपरामृष्टः पुरूषविशेषः ईश्वरः'' असे वर्णिले आहे.

जगत्, जीव, ईश्वर, माया यांचे अस्तित्व त्या आत्मरूपावर आधारित आहे पण हे आत्मतत्त्वापसून भिन्न नाही पण हे सर्व म्हणजेच आत्मतत्त्व नसून आत्मतत्त्व यापेक्षाही व्यापक आहे असा आशय घ्यावा.

ब्रह्मात्मज्ञानिनः ब्रह्मभावः

सर्वसाक्षिणमात्मानं वर्णाश्रमविलक्षणम् ।।13।।
ब्रह्मरूपतया पश्यन् ब्रह्मैव भवति स्वयम् ।
भासमानमिदं सर्वं भानरूपं परं पदम् ।।14।।
पश्यन् वेदान्तमानेन सद्य एव विमुच्यते ।
देहात्मज्ञानवज्ज्ञानं देहात्मज्ञानबाधकम् ।।15।।
आत्मन्येव भवेद्यस्य स नेच्छन्नपि मुच्यते ।

संधिविच्छेद –सर्वसाक्षिणमात्मानं – सर्वसाक्षिणम् + आत्मानं । वर्णाश्रमविलक्षणम् – वर्ण + आश्रमविलक्षणं । ब्रह्मैव– ब्रह्म + एव । भासमानमिदं– भासमानम् + इदम् ।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देहात्मज्ञानवज्ज्ञानं – देह + आत्मज्ञानवत् + ज्ञानं । आत्मन्येव – आत्मनि + एव । भवेद्यस्य – भवेद् + यस्य । नेच्छन्नपि – न + इच्छन् + अपि ।

शब्दार्थ –सर्वसाक्षिणमात्मानं – सर्वांचे साक्षीरूप असलेले आत्मतत्त्व, वर्णाश्रमविलक्षण – वर्णश्रम इ. पासून वेगळे असलेले, भासमान – भासीत होणार, विमुच्यते – मुक्त होते, नेच्छन्नपि – इच्छा नसतांना सुध्दा

अन्वय –सर्वसाक्षिणं वर्णाश्रमविलक्षणम् आत्मानं ब्रह्मरुपतया पश्यन् स्वयं (साधकः) ब्रह्मैव भवति। भासमानम् इदं सर्वं भानरूपं परं पदं वेदान्तमानेन पश्यन् सद्य एव विमुच्यते । देहात्मज्ञानबाधकं देहात्मज्ञानवज्ज्ञानं यस्य आत्मनि एव भवेत् न इच्छन् अपि सः मुच्यते।

अर्थ– साधक सर्वसाक्षी आत्म्याला वर्ण व आश्रम यापासून वेगळे समजतो म्हणजे (मी) ब्रह्म असा अनुभव करून स्वतः ब्रह्ममय होवून जातो. अनुभवाचा विषय असलेले जग केवळ ज्ञानरूपी आहे तर अंतिम स्थान ब्रह्म आहे असे वेदांताच्या आधारे पाहणारा (साधक) त्याच क्षणी मुक्त होतो. शरीर आणि आत्मा यांचे ज्ञान असलेल्या (साधकाला) ब्रह्माचे ज्ञान झाले तर शरीरच आत्मा आहे हे (त्याचे) ज्ञान बाधित होते. अशाप्रकारे जो आत्म्याचा साक्षात्कार करेल त्याला इच्छा नसताना ही मुक्ति मिळते.

वैशिष्ट्य –जो आत्मतत्त्वाचा जाणता होतो तो सकल सृष्टीला ज्ञानरूप मानून ज्ञात्याच्या रूपात स्थिरावतो, व आपले इष्ट स्थान केवळ ब्रह्मतत्त्वाला मानतो तो साधक त्याची इच्छा असो वा नसो मुक्त होतो हे निश्चित.

आत्मज्ञानिनः कर्मबन्धाभावः

सत्यज्ञानानन्दपूर्णलक्षणं तमसः परम् ।।16।।

ब्रह्मानन्दं सदा पश्यन् कथं बध्येत कर्मणा।

त्रिधामसाक्षिणं सत्यज्ञानानन्दादिलक्षणम् ।।17।।

त्वमहंशब्दलक्ष्यार्थमसक्तं सर्वदोषतः।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संधिविच्छेद –सत्यज्ञानानन्दपूर्णलक्षणं – सत्यज्ञान + आनन्दपूर्णलक्षणं । ब्रह्मानन्दं – ब्रह्म + आनन्दं । सत्यज्ञानानन्दादिलक्षणम् – सत्यज्ञान + आनन्द + आदिलक्षणम् । त्वमहंशब्दलक्ष्यार्थमसक्तं – त्वम् + अहंशब्दलक्ष्यार्थम् + असक्तं ।

शब्दार्थ –बध्येत – बांधला जाणे, कर्मणा – कर्माद्वारे, सर्वदोषतः – सर्व दोषांतून

अन्वय –तमसः परं सत्यज्ञानानदपूर्णलक्षणं त्रिधामसाक्षिणं सत्यज्ञानानदादिलक्षणं त्वम्–अहं–शब्दलक्ष्यार्थं सर्वदोषतः असक्तं ब्रह्मानन्दं सदा पश्यन् कथं कर्मणा बध्येत।

अर्थ– सत्य, ज्ञान, आनंद आणि पूर्णत्व असे जे ब्रह्म तत्त्व अंधकाराच्या पलिकडे आहे आणि आनंद स्वरूप आहे त्याचा अनुभव घेतल्यास कर्माचे बन्धन कसे राहणार? जाग्रत, स्वप्न, सुषुप्ती या तीन अवस्थांचा साक्षी असलेले आत्मतत्त्व हे सत्य, ज्ञान, आनंद या स्वरूपाचे आहे. तेच आत्मतत्त्व तू आणि मी या शब्दांचा लक्ष्यार्थ आहे आणि ते सर्वप्रकारांच्या दोषांनी अलिप्त आहे.

वैशिष्ट्य–येथे आत्मतत्ताच्या स्वरूपाचे वर्णन करतांना ते सत्–चिदानंद पूर्ण स्वरूपाचे असून तमोमय अंधाराच्या परे आहे. सर्वसाक्षीचैतन्य हे अस्मद् युष्मद् शब्दांचा लक्ष्यार्थ आहे व सर्व दोषांपासून अलिप्त आहे.

अज्ञानिज्ञानिनोः दर्शनस्थितिवैलक्षण्यम्

सर्वगं सच्चिदानन्दं ज्ञानचक्षुर्निरीक्षते ।।18।।
अज्ञानचक्षुर्नेक्षेत भास्वन्तं भानुमन्धवत् ।

संधिविच्छेद –सच्चिदानंदं– सत् + चित् +आनन्दं । ज्ञानचक्षुर्निरीक्षते – ज्ञानचक्षुः + निरीक्षते । अज्ञानचक्षुर्नेक्षेत– अज्ञानचक्षुः + न + ईक्षेत । भानुमन्धवत्– भानुम् + अन्धवत् ।

शब्दार्थ –सर्वगं – सर्व विहार करणारा, ज्ञानचक्षु – ज्ञानदृष्टी, भास्वन्तं– प्रकाशणाऱ्याला, भानुम् – सूर्याला

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –सर्वगं सच्चिदानन्दं ज्ञानचक्षुः निरीक्षते; भास्वन्तं भानुम् अन्धवत् अज्ञानचक्षुः न ईक्षेत।

अर्थ–सर्वत्र विचरण करणारे, सत्–चित्–आनंद स्वरूप असणारे ते ब्रह्मतत्त्व केवळ ज्ञानचक्षूंद्वारे पाहिल्या जाऊ शकते. ज्याप्रमाणे प्रकाशमान सूर्य अंधनेत्रानी पाहिल्या जाऊ शकत नाही तद्वत् अज्ञानचक्षूंनी ते परमतत्त्व पाहिल्या जाऊ शकत नाही.

वैशिष्ट्य–प्रकाशमान सूर्य अंधदृष्टीला कधीच दिसू शकत नाही तद्वत ज्या व्यक्तीची बुध्दी अज्ञानाने झाकाळलेली असेल त्या व्यक्तीला स्वयंप्रकाशित आत्मा जवळ असूनही कधीच जाणल्या जात नाही. आत्मदर्शन हे ज्ञानचक्षुंनीच साध्य आहे.

प्रज्ञानमेव तद्ब्रह्म सत्यप्रज्ञानलक्षणम्।।19।।
एवं ब्रह्मपरिज्ञानादेव मर्त्योऽमृतो भवेत्।

संधिविच्छेद –प्रज्ञानमेव – प्रज्ञानम् + एव । ब्रह्मपरिज्ञानादेव – ब्रह्मपरिज्ञानात् + एव । मर्त्योऽमृतो – मर्त्यः + अमृतः

शब्दार्थ –सत्यप्रज्ञान लक्षणं– सत्य आणि ज्ञान हेच लक्षणं,ब्रह्मपरिज्ञानात् – ब्रह्माच्या यथार्थज्ञानाद्वारे,मर्त्यः – मृत्यु लोकातील, अमृत – शाश्वत, चिरंतन, मृत्युरहित

अन्वय –सत्यप्रज्ञानलक्षणं तद्ब्रह्म प्रज्ञानम् एव । एवं ब्रह्मपरिज्ञानात् एव मर्त्यः अमृतः भवेत् ।

अर्थ– ते ब्रह्म प्रज्ञानम् (ज्ञानरूप) आहे. सत्य, प्रज्ञानम् हेच त्या ब्रह्माचे लक्षण आहे. अशा रूपात झालेल्या ब्रह्माच्या ज्ञानाद्वारे मर्त्य (मनुष्य) अमृततत्त्व होतो. (अमृतपदास प्राप्त होतो)

वैशिष्ट्य–येथे ब्रह्माचे स्वरूपलक्षण देण्यात आले ''सत्यंज्ञानमनन्तं ब्रह्म।'' ब्रह्मज्ञानाने मनुष्य अमृतपदास प्राप्त होतो.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तद्ब्रह्मानन्दमद्वन्द्वं निर्गुणं सत्यचिद्घनम् ।।20।।
विदित्वा स्वात्मनोरूपं न बिभेति कुतश्चन।

संधिविच्छेद –तद्ब्रह्मानन्दमद्वन्द्वं – तदब्रह्मानन्दम् + अद्वन्द्वं । स्वात्मनोरूपं – स्व + आत्मनः + रूपं । कुतश्चन – कुतः + चन

शब्दार्थ –आनन्दम् – आनंदरूप, अद्वन्द्वं – द्वंद्वरहित, स्वात्मनोरूपं – आत्मरूप, कुतश्चन – कश्यापासून

अन्वय –अद्वन्द्वं निर्गुणं सत्यचिद्घनं तद्ब्रह्मानन्दं स्वात्मनोरूपं विदित्वा(साधकः) कुतश्चन न विभेति

अर्थ– ते ब्रह्म तत्त्व आनन्दस्वरूप, द्वंन्द्वरहित, निर्गुण, सत्य, आत्मरूप आहे त्याप्रमाणे माझे आत्मरूप आहे. असे जाणल्यावर (तो साधक) कश्यापासूनही भीत नाही. (भय हे द्वैतात असते. सर्व अद्वैतरूप पाहणाऱ्यासाठी भयाचे अस्तित्वच राहत नाही.)

वैशिष्ट्य–द्वैतात भीती असते सर्व अद्वयरूप जाणल्यावर दुसरं काही उरतच नसल्याने कशाचीच भीती राहात नाही. अभयात भय ते कोणाचे.

चिन्मात्रं सर्वगं नित्यं संपूर्णं सुखमव्ययम् ।।21।।
साक्षाद्ब्रह्मैव नान्योऽस्तीत्येवं ब्रह्मविदां स्थितिः।

संधिविच्छेद –चिन्मात्रं – चित् + मात्रं । सुखमव्ययम् – सुखम् + अव्ययम् । साक्षाद्ब्रह्मैव – साक्षाद्ब्रह्म + एव । नान्योऽस्तीत्येवं – न + अन्यः + अस्ति + इति + एवं

शब्दार्थ –चिन्मात्रं– चैतन्यमात्र, सुखम् – आनंदरूप,अव्ययम् – अवयवरहित, नान्यो – दुसरा नाहीच,ब्रह्मविदां – ब्रह्मतत्त्वाचे ज्ञाते

अन्वय –चिन्मात्रं सर्वगं नित्यं संपूर्णं अव्ययं सुखं साक्षाद् ब्रह्म एव न अन्यः अस्ति इति एवं ब्रह्मविदां स्थितिः ।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ– चैतन्यमात्र असणारे, सर्वत्र विचरण करणारे, नित्य असणारे, पूर्णरूप असणारे, सुख, अव्यय असे हे साक्षात् ब्रह्माचे स्वरूप आहे. त्यापेक्षा अन्य कोणी नाही अशी स्थिती ब्रह्म जाणणाऱ्यांची असते. (ब्रह्माचे यथार्थ स्वरूप जाणणाऱ्यांना सर्वत्र ब्रह्माची प्रचिती होते. त्यापेक्षा अन्य कोणते तत्त्व नाही हे त्यांना ज्ञात असते.)

वैशिष्ट्य–ब्रह्मज्ञानाने युक्त साधकाला 'सर्वं ब्रह्मैव' असे यथार्थ ज्ञान झाले असल्याने, ब्रह्माशिवाय अन्य काहीच नाही याचा अनुभव आल्याने ते नित्य अद्वैतात परमानंदात मग्न असतात.

अज्ञस्य दुःखौघमयं ज्ञस्यानन्दमयं जगत् ।।22।।
अन्धं भुवनमन्धस्य प्रकाशं तु सुचक्षुषाम् ।

संधिविच्छेद –दुःखौघमयं – दुःख + ओघमयं । ज्ञस्यानन्दमयं – ज्ञस्य + आनन्दमयं । भुवनमन्धस्य – भुवनम् + अन्धस्य

शब्दार्थ –अज्ञस्य – अज्ञानी मनुष्यासाठी, दुःखौघ – दुःखाचा ओघ/प्रवाह, ज्ञस्य – ज्ञानी मनुष्यासाठी, भुवनम् – जगत, सुचक्षुषाम् – चांगली दृष्टी असणा–याला

अन्वय –जगत् अज्ञस्य दुःखौघमयं, ज्ञस्य आनन्दमयं(यथा) अन्धस्य भुवनम् अन्धं प्रकाशं तु सुचक्षुषाम् ।

अर्थ–(ज्याप्रकारे) हे प्रकाशित विश्व अन्ध मनुष्यासाठी अंधकारमय असते तर तेच विश्व चांगली दृष्टी असणाऱ्यासाठी प्रकाशमय असते त्याप्रमाणे अज्ञानी मनुष्यासाठी हे जगत दुःखाची मालिका आहे तर ज्ञानीसाठी हेच जगत आनंदमय आहे.

वैशिष्ट्य–येथे अंध मनुष्याच्या दृष्टान्ताद्वारे प्रतिपादीत करण्यात आले की लख्ख प्रकाशमय जगत हे आंधळ्यांसाठी अंधकारयुक्त तर डोळसांसाठी प्रकाशयुक्त असते. तद्वत् ब्रह्म न जाणणा–यांसाठी हे जगत दुःखमय तर ब्रह्मवेत्यांसाठी हे जगत परमानंदाने ओतप्रोत भरलेले असते.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आत्मनिवस्तुतो बन्धमुक्त्यभावः

अनन्ते सच्चिदानन्दे मयि वाराहरूपिणि ।।23।।

स्थितेऽद्वितीयभावः स्यात् को बन्धः कश्च मुच्यते ।

संधिविच्छेद –स्थितेऽद्वितीयभावः – स्थिते + अद्वितीयभावः । कश्च– कः + च

शब्दार्थ –मयि – माझ्यामध्ये,वराहरूपिणि – वराहरूपातील,कश्च – कोण,मुच्यते – मुक्त होतो

अन्वय –अनन्ते सच्चिदानन्दे वराहरूपिणि मयि अद्वितीयभावः स्थिते कः बन्धः स्यात् कः च मुच्यते ।

अर्थ– अनन्तरूप असणाऱ्या, सत्–चित्–आनन्दमय असणाऱ्या माझ्या या वराहरूपावर अद्वैतभाव ठेवल्यास कोणाला बंधन राहिल आणि कोण मुक्त होईल. (अर्थात माझ्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान हे बंधन–मोक्ष या व्यावहारिक संकल्पनांना दूर करणारे आहे.)

वैशिष्ट्य–सत्–चित् आणि आनंदरूप असलेल्या ब्रह्माच्या ठीकाणी अद्वैताचे भान असणाऱ्या साधकाला जो पारमार्थिक सत्तेत पोहचला आहे त्यासाठी व्यावहारिक सत्तेतील बंध–मोक्ष स्वप्नवत् मिथ्या होतो. त्याच्यासाठी बंधन–मोक्ष या अवस्थांचे अस्तित्वच उरत नाही.

स्वस्वरूपं तु चिन्मात्रं सर्वदा सर्वदेहिनाम् ।।24।।

नैव देहादिसंघातो घटवद् दृशिगोचरः ।

संधिविच्छेद –चिन्मात्रं – चित् + मात्रं । नैव – न + एव ।

शब्दार्थ –सर्वदेहिनाम् – सर्व शरीर धारण करणाऱ्यांसाठी, देहादिसंघातो – देह इ. भोग्य पदार्थ, घटवत् – मडक्याप्रमाणे, दृशि – प्रमाता, गोचर–पहाणे

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –सर्वदेहिनां स्वस्वरूपं तु सर्वदा चिन्मात्रम् । घटवद् देहादिसंघ नैव दृशिगोचरः ।

अर्थ– सर्व देहात राहणाऱ्या आत्मतत्त्वांचे (देहींचे) निज स्वरूप हे नित्य चैतन्यमात्र आहे. घटाप्रमाणे दृष्टिगोचर असलेल्या देहादि समूहांप्रमाणे (जड) नाही.

वैशिष्ट्य–देहादि सर्व पदार्थ जड असून आत्मतत्त्व चैतन्यमय आहे.

स्वात्मनोऽन्यतया भातं चराचरमिदं जगत् ।।25।।

स्वात्ममात्रतया बुद्धया तदस्मीति विभावय ।

संधिविच्छेद –स्वात्मनोऽन्यतया – स्व + आत्मनः + अन्यतया । चराचरमिदं– चर + अचरम् + इदं । स्वात्ममात्रतया – स्व + आत्ममात्रतया । तदस्मीति – तद् + अस्मि + इति ।

शब्दार्थ –भातम् – प्रकाशित, बुद्ध्या – बुद्धिने, तदस्मि – ते मी आहे,विभावय – भावना कर

अन्वय –चराचरम् इदं जगत् स्वात्मनः अन्यतया भातम्, बुद्ध्या स्वात्ममात्रतया तदस्मि इति विभावय ।

अर्थ– हे चराचर जगत् आत्मतत्त्वाचे अन्य रूपाने भासीत होणारे विभ्रम आहेत त्यालाही आत्मबुद्धीने जाणून, तेथेही मीच आहे (माझेच अस्तित्व आहे) अशी भावना कर.

वैशिष्ट्य–जो जाणतो तो ब्रह्म व जे जाणले जात आहे तेथेही ब्रह्माचेच अधिष्ठान आहे. ब्रह्मरूप असलेला मी चराचरात व्यापून आहे असे तू जाण असा उपदेश येथे केला आहे.

स्वस्वरूपं स्वयं भुङ्क्ते नास्ति भोज्य पृथक् स्वतः ।।26।।

अस्ति चेदस्तितारूपं ब्रह्मैवास्तित्वलक्षणम् ।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संधिविच्छेद –चेदस्तितारूपं – चेत् + अस्तितारूपं । ब्रह्मैवास्तित्वलक्षणम् – ब्रह्म + एव + अस्तित्वलक्षणम् ।

शब्दार्थ –भुङ्क्ते – भोग घेतो, भोज्य – भोग्य वस्तु, पृथक् – वेगळे

अन्वय –स्वयं स्वस्वरूपं भुङ्क्ते भोज्यः स्वतः पृथक् नास्ति। अस्तितारूपं अस्ति चेत् ब्रह्म एव अस्तित्वलक्षणम्

अर्थ– हे तत्त्व स्वतः स्वतःच्याच स्वरूपाचा आस्वाद घेत असते. त्याला सोडून अन्य कोणतेच उपभोग्य पदार्थ नाहीत. (जे आहे ते सर्व आत्मतत्त्वच आहे असा भाव) आणि जर अन्य उपभोग्य वस्तूंचे अस्तित्व मानले तर ते ब्रह्मतत्त्वाला सोडून नाही कारण कोणत्याही पदार्थाचे अस्तित्व हे ब्रह्माश्रित आहे. अस्तित्व (सत्) हेच ब्रह्माचे लक्षण आहे.

वैशिष्ट्य–''आत्मनि आत्मना तुष्टः'' या भगवद्गीतेतील उपदेशाची आठवण या श्लोकाद्वारे होते. भोगल्या जाणाराही तोच, भोग घेणाराही तोच कारण त्याच्याशिवाय अन्य काहीच नाही असं व्यावहारीक रूपात म्हणता येईल. पारमार्थिकरूपात तर हे आत्मतत्त्व 'निरूपभोग' आहे.

ब्रह्मविज्ञानसंपन्नः प्रतितमखिलं जगत् ।।27।।
पश्यन्नपि सदा नैव पश्यति स्वात्मनः पृथक् ।।
मत्स्वरूपपरिज्ञानात् कर्मभिर्न स बध्यते ।।28।।

संधिविच्छेद –प्रतिमखिलं – प्रतितम् + अखिलं । पश्यन्नपि – पश्यन् + अपि । स्वात्मनः – स्व + आत्मनः । कर्मभिर्न – कर्मभिः + न ।

शब्दार्थ –ब्रह्मविज्ञानसंपन्नः – ब्रह्मज्ञानी,प्रतितम् – अनुभवास येणार,अखिलम् – संपूर्ण, मत्स्वरुपपरिज्ञानात् – माझ्या स्वरुपाचे ज्ञान झाल्याने, कर्मभिः – कर्माद्वारे

अन्वय –प्रतितम् अखिलं जगत् ब्रह्मविज्ञानसंपन्नः सदा स्वात्मनः पृथक् नैव पश्यति । मत्स्वरुपपरिज्ञानात् सः कर्मभिः न बध्यते।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ– प्रतीत होणारे हे संपूर्ण विश्व ब्रह्मविज्ञानाने युक्त आहे असे नित्य पाहणारा स्वात्मरूपाला त्यापासून वेगळे पहात नाही (अर्थात् मी सुद्धा त्या ब्रह्माचाच अंश आहे हे तो अनुभवतो) अशाप्रकारे माझ्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान झालेला तो (साधक) कर्मांद्वारे कधीच बंधनात बद्ध होत नाही.

वैशिष्ट्य–ब्रह्मज्ञानी साधकाला कर्माचे बंधन राहत नाही. कर्मबंधनेची शृंखला अज्ञानीमनुष्यासाठी असते तर ज्ञान हे मुक्तीप्रद असते.

यः शरीरेन्द्रियादिभ्यो विहिनं सर्वसाक्षिणम् ।
परमार्थैकविज्ञानं सुखात्मानं स्वयंप्रभम् ।।29।।
स्वस्वरूपतया सर्वं वेद स्वानुभवेन यः ।
स धीरः स तु विज्ञेयः सोऽहं तत्त्वमृभो भव ।।30।।

संधिविच्छेद –शरीरेन्द्रियादिभ्यो – शरीर + इन्द्रियादिभ्यः । परमार्थैकविज्ञान – परमार्थ + एकविज्ञानं । सुखात्मानं – सुख + आत्मानं । स्वानुभवेन – स्व + अनुभवेन । सोऽहं + सः + अहं । तत्त्वमृभो – तत्त्वम् + ऋभो

शब्दार्थ –शरीरेन्द्रियादिभ्यो– शरीर व इंद्रियांनी,विहिनं – रहित असलेला, सर्वसाक्षिणम् – सर्वांचा साक्षीरूप असलेला, विज्ञेयः – जाणावा

अन्वय –शरीरेन्द्रियादिभ्यो विहिनं सर्वसाक्षिणं. परमार्थैकविज्ञानं सुखात्मानं स्वयंप्रभं स्वरूपतया स्वानुभवेन यः सर्वं वेद सः धीरः स तु विज्ञेयः सः अहं हे ऋभो ! तत्त्वं भव ।

अर्थ– शरीर, इन्द्रिये इत्यादिंपासून पूर्णतः भिन्न, सर्व तत्त्वांचा साक्षीरूप, परमार्थस्वरूप, ज्ञानस्वरूप, आनंदस्वरूप, चैतन्यस्वरूप, स्वतः प्रकाशित होणारे जो (साधक त्या आत्मतत्त्वाला) आपल्या स्वरूपज्ञानाने व स्वानुभवाने जाणतो तो धैर्यवान होय असे तू जाण. तो मीच होय. हे ऋभु तू सुद्धा तेच हो. (माझ्याशी एकरूप हो, ब्रह्ममय हो)

वैशिष्ट्य–सर्वांमध्ये व्यावपलेले पण त्यांच्यापेक्षाही व्यापक स्वरूप असलेले ते आत्मतत्त्व जाणून तू माझ्याशी एकरूप हो, असा ब्रह्मरूप हो असा उपदेश भगवंत या श्लोकात करतात.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अतः प्रपञ्चानुभवः सदा न हि
स्वरूपबोधानुभवः सदा खलु।
इति प्रपश्यन् परिपूर्णवेदनो
न बन्धमुक्तो न च बद्ध एव तु।।31।।

संधिविच्छेद –प्रपञ्चानुभवः – प्रपञ्च + अनुभवः । स्वरूपबोधानुभवः – स्वरूपबोध + अनुभवः ।

शब्दार्थ – प्रपञ्चानुभवः – संसाराचा अनुभव, स्वरूपबोधानुभवः – स्वरूपाचा बोध, प्रपश्यन्– पाहत,परिपूर्णवेदनो – पूर्णरूपाने जाणून

अन्वय –अतः प्रपञ्चानुभवः हि सदा न, स्वरूपबोधानुभवः खलु सदा (भवति) इति प्रपश्यन् परिपूर्णवेदनो तु बन्धमुक्तः न बद्धः च न।

अर्थ–म्हणूनच संसार (क्षणभंगूर असल्याने त्याचा) अनुभव कधीच नित्य राहत नाही. पण स्वात्मरूपाचे (ते नित्य असल्याने) ज्ञान आणि अनुभव येत राहतो असे पूर्णरूपाने जाणल्यावर व अनुभवल्यावर त्यास बंधन–मुक्ती राहत नाही. तो कधीच बद्ध होत नाही.

वैशिष्ट्य–''नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः'' यांना क्षणभंगूर संसार नित्य राहत नाही व नित्यरूप असलेले आत्मतत्त्व लोप पावत नाही. हा अनुभव साधकाला बंधन व मुक्तीच्या परे नेतो.

बन्धनिवृत्तये ब्रह्मात्मानुसंधानम्

स्वस्वरूपानुसंधानान्नात्यन्तं सर्वसाक्षिणम्
मुहूर्तं चिन्तयेन्मां यः सर्वबन्धैः प्रमुच्यते।।32।।

संधिविच्छेद –स्वस्वरूपानुसंधानान्नात्यन्तं – स्वस्वरूप + अनुसन्धानात् : न + अत्यन्तं । चिन्तयेन्मां – चिन्तयेत् + मां

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शब्दार्थ –स्वस्वरूपानुसंधानात्– स्वतःच्या रूपाचेच निरीक्षण करित राहिल्याने/ आत्मएकाग्रतेने, मुहुर्तं – क्षणमात्र, चिन्तयेत् – ध्यान केल्याने, सर्वबन्धैः – सर्व बंधनातून

अन्वय –स्वस्वरूपानुसंधानात् न अत्यन्तं सर्वसाक्षिणं मां यः मुहूर्तं चिन्तयेत् (सः) सर्वबन्धैः प्रमुच्यते ।

अर्थ– स्वतःच्या स्वरूपाचा ठाव घेण्यासाठी सर्व तत्त्वांचा साक्षीरूप असलेल्या माझे जो क्षणमात्र चिन्तन करतो तो (साधक) सर्वप्रकारच्या बंधनातून मुक्त होतो.

वैशिष्ट्य–ध्यान लावल्याने ध्याता जसा ध्येयरूप होतो तद्वत ब्रह्मावर ध्यान लावल्याने साधक ब्रह्मरूपच होईल यात शंका नाही व असा ब्रह्मवेत्ता बंधनात कसा राहील (तो मुक्तच होईल)

सर्वभूतान्तरस्थाय नित्यमुक्तचिदात्मने
प्रत्यक्चैतन्यरूपाय मह्यमेव नमोनमः ।।33।।
त्वं वाहमस्मि भगवोऽहं वै त्वमसि देवते ।
तुभ्यं मह्यमनन्ताय मह्यं तुभ्यं चिदात्मने ।।34।।
नमो मह्यं परेशाय नमस्तुभ्यं शिवाय च ।

संधिविच्छेद –सर्वभूतान्तरस्थाय – सर्वभूत + अन्तरस्थाय । नित्यमुक्तचिदात्मने – नित्यमुक्तचित + आत्मने । प्रत्यक्चैतन्यरूपाय – प्रत्यक् : चैतन्य + रूपाय । मह्यमेव – मह्यम् + एव । वाहमस्मि – वा + अहम् + अस्मि । भगवोऽहं – भगवः + अहं । त्वमसि – त्वम् + असि । मह्यमनन्ताय –मह्यम् + अनन्ताय

शब्दार्थ –सर्वभूतान्तरस्थाय – सर्व प्राणिमात्रात अधिष्ठाता रूपाने विद्यमान राहून, प्रत्यक्चैतन्यरूपाय – जीवात्मा रूपात असलेल्या, मह्यमेव – मलाच, त्वमसि – तूच आहेस, परेशाय – परमेश्वराला

अन्वय –सर्वभूतान्तरस्थाय नित्यमुक्तचिदात्मने प्रत्यक्चैतन्यरूपाय मह्यम् एव नमोनमः । त्वं वा अहम् अस्मि भगवः अहं वै त्वम् अस देवते । अनन्ताय तुभ्यं मह्यं चिदात्मने मह्यं तुभ्यं परेशाय मह्यं नमो तुभ्यं च शिवाय नमो ।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ– सर्व प्राणिमात्रांच्या अंतर्यामी स्थित असलेल्या, नित्यमुक्त असलेल्या, चैतन्यघन असलेल्या, जीवात्म रूपात असलेल्या मलाच नमस्कार असो. तू आणि मी (दोघेही) भगवंत आहोत. तू आणि मी दोघेही देवता आहोत. अनन्तरूप असलेल्या तुला आणि मला, चैतन्यघन असलेल्या तुला तु आणि मला (नमस्कार असो). परमेश्वर असलेल्या मला नमस्कार असो. शिवरूप असलेल्या तूला नमस्कार असो. (जीवात्मा आणि परमात्मा ही समान तत्त्वे होय.)

वैशिष्ट्य–''द्वौ सुपर्णो.........'' जीवात्मा आणि परमात्मा यांचे अद्वैतस्वरूप अत्यंत विलोभनीयरीत्या येथे वर्णिले आहे.

किं करोमि क्व गच्छामि किं गृह्णामि त्यजामि किम् । ।35 । ।

यन्मया पूरीतं विश्वं महाकल्पाम्बुना यथा ।

अन्तःसङ्गं बहिःसङ्गमात्मसङ्गं च यस्त्यजेत् ।

सर्वसङ्गनिवृत्तात्मा स मामेति न संशयः । ।36 । ।

संधिविच्छेद –यन्मया – यत् + मया । महाकल्पाम्बुना – महाकल्प + अम्बुना । बहिःसङ्गमात्मसङ्गं – बहिःसङ्गम् + आत्मसङ्गं । यस्त्यजेत् – यः + त्यजेत् । सर्वसङ्गनिवृत्तात्मा – सर्वसङ्गनिवृत्त + आत्मा । मामेति – माम् + एति

शब्दार्थ –क्व गच्छामि – कोठे जाऊ, किं गृह्णामि – काय घेऊ, यजामि कीं – कशाचा त्याग करू, महाकल्पाम्बुना – समुद्र पाण्याने (व्यापलेला असतो), सर्वसङ्गनिवृत्तात्मा – निंःसग असलेला आत्मा

अन्वय –यथा महाकल्पाम्बुना यत् विश्वं मया पूरितं (तत्र) किं करोमि, क्व गच्छाामि किं गृह्णामि किं त्यजामि । यः अनाः सङ्गं, बहिःसङ्गम् आत्मसङ्गं त्यजेत् सर्वसङ्गनिवृत्तात्मा सः माम् एति न संशयः ।

अर्थ– (ज्याप्रकारे) समुद्र सर्व बाजूंनी जलतत्त्वाने व्यापलेला असतो त्याप्रमाणे हे विश्व सर्वप्रकारे माझ्याद्वारे व्यापलेले आहे. त्यामुळे मी काय करावे? कोठे जावे? काय

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

घ्यावे व कशाचा त्याग करावा? (कारण जे जे आहे ते ते सर्व मीच आहे). जो साधक आंतरिक दृष्टीने असंग, बाह्यपदार्थांपासून असंग व स्वतःपासूनही असंग राहतो तो सर्वरूपाने संगरहित व क्रियारहित होऊन मलाच प्राप्त होतो यात शंकाच नाही.

वैशिष्ट्य–'सर्व' जर ब्रह्म आहे तर काय घ्यावे, कोणाला सोडावे, कुठे जावे हे प्रश्नच उरत नाही. समुद्राच्या आत आणि बाहेर केवळ जलच असते तसे हे आत्मतत्त्व सर्वांच्या आत व बाहेर ओतप्रोत रूपाने व्याप्त आहे.

अहिरिव जनयोगं सर्वदा वर्जयेद्यः
कुणपमिव सुनारी त्यक्तकामो विरागी।
विषमिव विषयादीन् मन्यमानो दुरन्तान्
जगति परमहंसो वासुदेवोऽहमेव।।37।।

संधिविच्छेद –अहिरिव – अहिः + इव । वर्जयेद्यः – वर्जयेत् + यः । कुणपमिव – कुणपम् + इव । विषमिव – विषम् + इव । वासुदेवोऽहमेव – वासुदेवः + अहम् + एव।

शब्दार्थ –अहिरिव – सापाप्रमाणे,जनयोग – लोकसंपर्क, वर्जयेत् – सोडावा, कुणपमिव – मृत देहाप्रमाणे, सुनारी – स्त्री,त्यक्तकाम – कामभावनेचा त्याग करूणारा

अन्वय –अहिरिव जनयोगं यः सर्वदा वर्जयेत्, कुपणम् इव सुनारी त्यक्तकामः, दुरन्तान् विषयादीन् विषम् एव मन्यमानः (सः) परमहंसः वासुदेवः अहम् एव (भवति)।

अर्थ– जो साधक जनसमुदायाला सापाप्रमाणे मानून नेहमी त्यांना दूर ठेवतो. स्त्रीला शवाप्रमाणे मानून कामभावाचा त्याग करून वैराग्यसंपन्न होतो, विषयांना विषाप्रमाणे घातक समजतो. तो या जगात परमहंस होतो, वासुदेव होतो, तो मीच होतो. (तो माझ्या रूपातच समाविष्ट होतो.)

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वैशिष्ट्य–बंधनात बांधणाऱ्या विषयांचा उल्लेख येथे केला आहे. हठयोगात वर्णिलेले योगमार्गातील बाधकतत्त्वांची येथे आठवण होते. जनसंग, कामवासना, विषयराग हे बंधनात टाकतात तर ज्ञान आणि वैराग्य साधकाला परमहंसपदी विराजीत करतात.

इदं सत्यमिदं सत्यं सत्यमेतदिहोच्यते।
अहं सत्यं परं ब्रह्म मत्तः किंचिन्न विद्यते।।38।।

संधिविच्छेद –सत्यमिदं – सत्यम् + इदं । सत्यमेतदिहोच्यते – सत्यम् + एतत् + इह + उच्यते । किचिन्न – किचिंत् + न

शब्दार्थ –किंचित् – काहीच,न विद्यते – राहत नाही

अन्वय –इदं सत्यम् इदं सत्यं इह एतत् सत्यम् उच्यते। अहं सत्यं परं ब्रह्म मत्तः किंचित् न विद्यते।

अर्थ– हेच सत्य आहे, हेच यथार्थ आहे. हेच परम सत्य या जगती सांगितले आहे. मी सत्य आहे. मीच परब्रह्म आहे. माझ्यापेक्षा अन्य दुसरे काहीच नाही.

वैशिष्ट्य–त्रिवार सत्याचे ज्ञान येथे करून देण्यात आले आहे. मीच ब्रह्म आहे व हे सर्व ब्रह्ममय आहे. हेच पारमार्थिक सत्य आहे. ज्याचा कधीच बाध होत नाही.

ब्रह्माप्तिसाधनभूतस्योपवास्य निर्वचनम्

उप समीपे यो वासो जीवात्मपरमात्मनोः
उपवासः स विज्ञेयो न तु कायस्य शोषणम्।।39।।
कायशोषणमात्रेण किं तत्र ह्यविवेकिनाम्।
वाल्मीकताडनादेव मृतः किं नु महोरगः।।40।।

संधिविच्छेद –ह्यविवेकिनाम् –हि + अविवेकिनाम् । वाल्मीकताडनादेव – वाल्मीकताडनात् + एव । महोरगः – महा + उरगः

शब्दार्थ –उप समीपे – जवळ राहणे, वसो – निवास, कायस्य – शरीराचे, शोषणम् – पीडा देणे,वाल्मीक – वारूळ, ताडनात् – मारल्याने, महोरगः – मोठा साप

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –कायस्य शोषणं तु न सः उपवासः विज्ञेयः। जीवात्मपरमात्मनोः उप समीपे यः वासः (सः उपवासः विज्ञेयः)। कायशोषणमात्रेण तत्र हि अविवेकिनां किं ? (यतो हि) वाल्मीकताडनात् एव किं नु महोरगः मृतः

अर्थ– (अन्नादि ग्रहण न करता) शरीराचे शोषण करणे, (शरीरास क्लेश देणे) म्हणजे काही उपवास नव्हे. तर जीवात्मा आणि परमात्मा यांनी एकमेकांजवळ राहणे (सामीप्य अनुभवणे) म्हणजे तो खऱ्या अर्थाने उप–वास होय असे जाणावे. अज्ञानी मनुष्य देहाचे शोषण (उपवासाच्या नावाने) करतात त्यातून काहीच साध्य होत नाही. केवळ वारूळालाच मारत बसलो तर त्याच्या आत राहणारा मोठा साप कसा काय मरेल?

वैशिष्ट्य–येथे उपवास शब्दाचा शास्त्रीय अर्थ प्रतिपादीत करण्यात आला आहे. जीवात्मा व परमात्मायांचे समीप राहणे म्हणजे उपवास. बऱ्याच अज्ञानी मनुष्यांना ' कडक उपवास' केल्याने भगवंत प्राप्ती होऊ शकते असे वाटते मात्र अशा उपवासाने केवळ शरीर पीडा होते. ईप्सीत ध्येय प्राप्त होत नाही हे आणखी स्पष्ट करून सांगण्यासाठी दृष्टांन्ताचा उपयोग करण्यात आला आहे. सापाला नष्ट करायचे तर सापावरच प्रहार करणे योग्य केवळ वारूळावर प्रहार केला तर साप मरणार नाही. तद्वत भगवंतरूप व्हायचे असेल तर त्याचे सान्निध्य अनुभावे ना की शरीरशोषण करावे.

जीवन्मुक्तिसाधनमपरोक्षज्ञानम्

अस्ति ब्रह्मेति चेद्वेद परोक्षज्ञानमेव तत्।
अहं ब्रह्मेति चेद्वेद साक्षात्कारः स उच्यते।।41।।
यस्मिन् काले स्वमात्मानं योगी जानाति केवलम्।
तस्मात् कालात् समारभ्य जीवन्मुक्तो भवेदसौ।।42।।
अहं ब्रह्मेति नियतं मोक्षहेतुर्महात्मनाम्।

संधिविच्छेद –ब्रह्मेति – ब्रह्म + इति । चेद्वेद – चेत् + वेद । परोक्षज्ञानमेव – परोक्षज्ञानम् + एव । स्वमात्मानं – स्वम् + आत्मानं । समारभ्य – सम् + आरभ्य । भवेदसौ – भवेत् + असौ । मोक्षहेतुर्महात्मनाम् – मोक्षहेतुः + महात्मनाम्

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शब्दार्थ –परोक्षज्ञान – अप्रत्यक्षज्ञान, समारभ्य – तेव्हापासून, नियतं – निश्चित, मोक्षहेतुः – मुक्तीचे कारण

अन्वय –ब्रह्म अस्ति इति वेद चेत् तत् परोक्षज्ञानमेव। अहं ब्रह्म इति वेद चेत् सः साक्षात्कारः उच्चते, योगी यस्मिन् काले केवलं स्वम् आत्मानं जानाति तस्मात् कालात् समारभ्य अयौ जीवन्मुक्तः भवेत्। अहं ब्रह्म इति महात्मं नियतं मोक्षहे

अर्थ–'ब्रह्म आहे' एवढेच जर जाणले असेल तर ते अप्रत्यक्ष ज्ञान होय (पण जर) 'मी ब्रह्म आहे' असे जाणले तर तोच खरा साक्षात्कार (प्रत्यक्ष अनुभूती) होय असे म्हटल्या जाते. ज्या काळी योगसाधक स्वतःला केवळ आत्मरूप असल्याचे जाणतो त्या क्षणापासून हा साधक जीवन्मुक्त होतो. 'मी केवळ ब्रह्म आहे' याची निश्चतरूपाने झालेली अनुभूती ही महनीय लोकांच्या मोक्षाचे कारण आहे.

वैशिष्ट्य–ब्रह्माला जाणणे आणि ब्रह्मरूपत्व अनुभवणे या दोन वेगवेगळ्या अवस्था आहे. पहीली अवस्था ही दुसऱ्या अवस्थेचे कारण (मोक्षहेतू) आहे तर दुसरी अवस्था पहील्या अवस्थेचे पूर्णत्व आहे.

बाह्यान्तश्चिन्तात्यागविधिः

द्वे पदे बन्धमोक्षाय निर्ममेति ममेति च।।43।।
ममेति बध्यते जन्तुर्निर्ममेति विमुच्यते।
बाह्यचिन्ता न कर्तव्या तथैवान्तरचिन्तिका।
सर्वचिन्ता समुत्सृज्य स्वस्थो भव सदा ऋभो।।44।।

संधिविच्छेद –निर्ममेति – निर् + मम + इति। ममेति – मम + इति । जन्तुर्निर्ममेति – जन्तुः + निर् + मम + इति । तथैवान्तरचिन्तिका – तथा + एव + आन्तरचिन्तिका । समुत्सृज्य – सम् + उत्सृज्य ।

शब्दार्थ –निर्मम – माझे नाही (ममतारहित),ममेति – माझेच (ममता),विमुच्यते – मुक्त करते, समुत्सृज्य – चांगल्या प्रकारे त्याग करून

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –निर्मम इति मम इति च बन्धमोक्षाय द्वे पदे जन्तुः मम इति बध्यते निर्मम इति विमुच्यते। हे ऋभो! बाह्यचिन्त तथैव आन्तरचिन्तिका न कर्तव्या। सर्वचिन्ता समुत्सृज्य सदा स्वस्थो भव।

अर्थ– दोन पद ही बन्धन आणि मोक्षास कारणीभूत आहे ती म्हणजे ममता आणि निर्ममता. प्राणिमात्रास ममता ही बंधनात टाकते तर निर्ममता ही मुक्त करते.

बाह्यविषयांबाबत कधीच चिंता करू नये तसेच आंतरिक विषयांबाबतही चिंता करू नये. अशाप्रकारे सर्व चिंतांचा त्याग करून (चिंतारहित होऊन) हे ऋभु, नित्य स्वस्थ हो. (स्वस्थ–स्वस्मिन तिष्ठ, स्वतःच्या स्वरूपातच रहा)

वैशिष्ट्य–ममत्व हे बंधनाचे कारण आहे तर निर्ममत्व हे मोक्षाचे कारण आहे. अहता व ममता गेल्या की सर्व चिंतांचाही आपोआप लय होतो कारण सर्व चिंतां या 'मी आणि माझं' याला धरूनच असतात.

भगवच्चिन्तनमेव सर्वचिन्तात्यागोपायः

संकल्पमात्रकलनेन जगत्समग्रं
संकल्पमात्रकलने हि जगद्विलासः।
संकल्पमात्रमिदमुत्सृज्य निर्विकल्प–
माश्रित्य मामकपदं हृदि भावयस्व।।45।।

संधिविच्छेद –जगद्विलासः – जगत् + विलासः । संकल्पमात्रमिदमुत्सृज्य – संकल्पमात्रम् + इदम् + उत्सृज्य । निर्विकल्पमाश्रित्य – निर्विकल्पम् + आश्रित्य ।

शब्दार्थ –उत्सृज्य – टाकून देऊन, निर्विकल्प – विकल्परहित,आश्रित्य – आश्रम घेऊन, हृदि – हृदयात

अन्वय –संकल्पमात्रकलनेन समग्रं जगत् (स्थितम्), संकल्पमात्रकलने हि जगद्विलासः (भवति)। संकल्पमात्रम् इदम् उत्सृज्य निर्विकल्पम् आश्रित्य मामकपदं हृदि भावयस्व।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ– (माझ्याद्वारे) संकल्पमात्र धारण केल्याने हे संपूर्ण विश्व स्थित आहे. संकल्पमात्र धारण केल्याने या विश्वाचा विलास आहे. संकल्पमात्र असलेल्या या (जगताची) भावना सोडून देऊन विकल्परहित असलेल्या माझ्या, अद्वितीयपदाचा आश्रय घेऊन त्याच (पदाची) आपल्या हृदयात (दृढ) धारणा कर.

वैशिष्ट्य–संकल्पयुक्त जगताचा त्याग करून दृढभावनेने निर्विकल्प तत्त्वात स्थित होण्याचा उपदेश येथे केला आहे.

मच्चिन्तनं मत्कथनमन्योन्यं मत्प्रभाषणम् ।
मदेकपरमो भूत्वा कालं नय महामते ।।46 ।।
चिदिहास्तीति चिन्मात्रमिदं चिन्मयमेव च ।
चित्त्वं चिदहमेते च लोकाश्चिदिति भावया ।।47 ।।
रागं निरागतां नीत्वा निर्लेपो भव सर्वदा ।

संधिविच्छेद –मच्चिन्तनं – मत् + चिन्तनं । मत्कथनमन्योन्यं– मत् + कथनम् + अन्यः +अन्यं । । मदेकपरमा – मत् + एकपरमो । चिदिहास्तीति – चित् + इह + अस्ति + इति । चिन्मात्रमिदं – चित् + मात्रम् + इदं । चिन्मयमेव – चित् + मयम् + एव । चिदहमेते – चित् + अहम् + एते । लोकाश्चिदिति – लोकाः + चित् + इति । निर्लेपः – निर् + लेपः ।

शब्दार्थ –मच्चिन्तनं – माझे चिंतन, अन्योन्यं– एकमेकांचे, कालं नय – कालयापीत कर, निरागतां – आसक्तीरहित

अन्वय –हे महामते ! मच्चिन्तनं मत्कथनम् अन्योन्यं मत्प्रभाषणम्, मदेकपरमो भूत्वा कालं नय । चित् इह अस्ति इदं चिन्मात्रं चिन्मयम् एव चित्त्वं च । अहं चित् एते लोकाः चित् इति भावया रागं निरागतां नीत्वा सर्वदा निर्लेप भव ।

अर्थ– हे बुद्धीमान (ऋभु), निरंतर माझेच चिंतन कर, माझ्याविषयीच कथन कर, इतरांशी माझ्याच स्वरूपाची चर्चा कर अशाप्रकारे नित्य माझ्याशीच एकनिष्ठ राहून तू

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तूझा काळ व्यतीत कर. या विश्वात जे आहे ते चैतन्यच आहे. मी चैतन्य आहे. हे सर्व लोक चैतन्यच आहे अशी (चराचर सृष्टीविषयी चैतन्याचीच) भावना कर. (सर्व चैतन्यमय असल्याने तुझ्या मनातील) आसक्ती ही निरासक्तीकडे नेऊन नित्य निर्लेपतेस प्राप्त हो. (कश्यातही गुंतू नकोस, कशानेही लिप्त होवू नकोस).

वैशिष्ट्य–''मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय।
निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः।।''
या भगवद्गीतेच्या बाराव्या अध्ययातही हाच आशय वर्णिला आहे.

सर्वकल्पनातीतं ब्रह्मैव चिन्तनीयम्

अज्ञानजन्यकर्त्रादिकारकोत्पन्नकर्मणा।।48।।
श्रुत्युत्पन्नात्मविज्ञानप्रदीपो बाध्यते कथम्।
अनात्मतां परित्यज्य निर्विकारो जगस्थितां।।49।।
एकनिष्ठतयान्तःस्थसंविन्मात्रपरोभव।

संधिविच्छेद –अज्ञानजन्यकर्त्रादिकारकोत्पन्नकर्मणा – अज्ञानजन्यकर्त्रादिकारक + उत्पन्नकर्मणा । श्रुत्युत्पन्नात्मविज्ञानप्रदीपः– श्रुति + उत्पन्न + आत्मज्ञानप्रदीपः । एकनिष्ठतयान्तःस्थसंविन्मात्रपरो – एकनिष्ठतया + अन्तःस्थसंवित् + मात्रपरः

शब्दार्थ –अज्ञानजन्य – अज्ञानातून निर्माण झालेले, श्रुत्युत्पन्ना– वेदादींमधून निर्माण झालेले, विज्ञानप्रदीपः – ज्ञानप्रकाश,अनात्मतां – आत्मरहितत्वम्, परित्यज्य – टाकून देऊन, निर्विकारः – विकार रहित

अन्वय –अज्ञानजन्यकर्त्रादिकारकोत्पन्नकर्मणा श्रुत्युत्पन्नात्मविज्ञानप्रदीप कथं बाध्यते। जगत्स्थिताम् अनात्मतां परित्यज्य निर्विकारः एकनिष्ठ अन्तःअन्तस्थसंविन्मात्रपरः भव।

अर्थ– कर्ता, कर्म इत्यादि कारकव्यवहार हा अज्ञानजन्य कर्मानी निर्माण केला आहे. वेदांच्या, शास्त्रांच्या अध्ययनातून प्रज्वलित झालेल्या ज्ञानाचा दीप कसा काय बाधित

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होऊ शकेल. (अर्थात ते ज्ञान अन्य कशाने खंडित होऊ शकत नाही.) त्यामुळे या जगात असलेल्या आत्मरहित (पदार्थांचा) त्याग करून विकार रहित असलेल्या, अन्तर्यामी स्थित असलेल्या त्या संविद् तत्त्वाशी (चैतन्याशी) नित्य एकनिष्ठेने युक्त रहा.

वैशिष्ट्य–आत्म व अनात्मायांविषयी विवेक हाच साधकाला मोक्षाप्रत नेतो. येथे अनात्मतत्त्व कोणते व आत्मतत्त्व कोणते, ते कसे जाणावे याचा उपदेश केला आहे.

घटाकाशमठाकाशौ महाकाशे प्रतिष्ठितौ ।।50।।
एवंमयि चिदाकाशे जीवेशौ परिकल्पितौ ।
या च प्रागात्मनो मे मा तथान्ते च तिरस्कृता ।।51।।
ब्रह्मवादिभिरुद्‌गीता सा मायेति विवेकतः ।
माया तत्कार्यविलये नेश्वरत्वं न जीवता ।।52।।
ततः शुद्धश्चिदेवाहं व्योमवन्निरुपाधिकः ।
जीवेश्वरादिरूपेण चेतनाचेतनात्मकम् ।।53।।

संधिविच्छेद –महाकाशे – महा + आकाशे । चिदाकाशे – चित् + आकाशे । जीवेशौ – जीव + ईशौ । प्रागात्मनो – प्राक् + आत्मनः । तथान्ते– तथा + अन्ते। ब्रह्मवादिभिरुद्‌गीता – ब्रह्मवादिभिः + उद्‌गीता । मायेति – माया + इति । नेश्वरत्वं – न + ईश्वरत्वम् । शुद्धश्चिदेवाहं – शुद्धः + चित् + एव +अहं। व्योमवन्निरुपाधिकः – व्योमवत् + निपाधिकः । जीवेश्वरादिरूपेण – जीव + ईश्वर + आदिरूपेण । चेतनाचेतनात्मकम् – चेतन + अचेतन + आत्मम् ।

शब्दार्थ – घटाकाश – मडक्यातील आकाश (मोकळी जागा), प्रतिष्ठितौ– स्थित आहे, चिदाकाशे – चैतन्याचे आकाश, जीवेशौ – जीव–ईश्वर, परिकल्पितौ –कल्पिले आहे, प्राक् – पूर्वी, कोमवत् – आकाशाप्रमाणे, निरुपाधिक – उपाधिरहित

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –महाकाशे घटाकाशमठाकाशौ प्रतिष्ठितौ। मयि चिदाकाशे एवं जीवेशौ परिकल्पितौ। आत्मनः प्राक् तथान्ते या तिरस्कृता सा माया इति ब्रह्मवादिभिः विवेकतः उद्गीता। माया तत्कार्यविलये ईश्वरत्वं न च जीवता (तिष्ठति)। ततः जीवेश्वरादिरूपेण चेतनाचेतनात्मकं चित् शुद्धः व्योमवत् निरूपाधिकः अहम् एव।

अर्थ– घटाकाश आणि मठाकाश हे दोनही त्या महाकाशात स्थित आहे. त्याप्रमाणे जीव आणि ईश्वर हे दोनही माझ्या चैतन्यकाशात कल्पित आहे. (अर्थात् घटातील आकाश व मठातील आकाश हे दोनही घट आणि मठ या उपाधी नष्ट होताच महाकाशात लीन होतात. तेव्हा त्यांचे महाकाशापेक्षा वेगळे अस्तित्व राहत नाही. त्याप्रमाणे देहादि उपाधी नष्ट होताच जीवात्मा व ईश्वर ही दोनही चैतन्य ब्रह्माच्या परमचैतन्यरूपात समाविष्ट होतात अर्थात् चैतन्याव्यतिरिक्त त्यांना अन्य ओळख राहत नाही.)

आत्मतत्त्वाच्या प्रारंभी जिचे अस्तित्व नाही व शेवटीही जिचे अस्तित्व नाकारल्या गेले आहे ते तत्त्व माया होय असे ब्रह्मतत्त्वाचे जाणकार आपल्या ज्ञानाद्वारे सांगतात. ही माया व तिच्याद्वारे निर्माण झालेल्या (जगतादि) कार्यांचा नाश झाल्यावर ईश्वरत्व व जीवत्व (या उपाधी) सुद्धा अवशिष्ट राहत नाही. (ही तत्त्व परब्रह्मरूप होतात.) त्यामुळे निरूपाधीक झालेले आकाश ज्याप्रमाणे शुद्ध असते त्याप्रमाणे चेतन–अचेतन रूपात जीव–ईश्वर इत्यादी रूपात विस्तारित झालेला मी सुद्धा शुद्धच चैतन्यमात्र राहतो.

वैशिष्ट्य–अज्ञानाधिष्ठित व्यवहाराने द्वैत आहे. अज्ञानाचे निराकरण केले की द्वैताचेही अस्तित्व राहत नाही. सर्वत्र अद्वैताचा साक्षात्कार होतो. हा आशय अधिक स्पष्ट व्हावा यास्तव घटाकाश व मठाकाश या उपाधियुक्त तत्त्वांचा दृष्टान्त देऊन निरूपाधिक महाकाशाचाच ते अंश असल्याने शेवटी ते महाकाशात लीन होतात. त्यांना वेगळे अस्तित्व राहत नाही. त्याप्रमाणे जीव व ईश्वर या उपाधी दूर झाल्यावर हे तत्वही निरूपाधिक ब्रह्मात एकरूप होतात.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ईक्षणादिप्रवेशान्ता सृष्टिरीशेन कल्पिता।

जाग्रतादिविमोक्षान्तः संसारो जीवकल्पितः।।54।।

संधिविच्छेद –ईक्षणादिप्रवेशान्ता – ईक्षण + आदिप्रवेश + अन्ता । सृष्टिरीशेन – सृष्टिः + ईशेन । जाग्रतादिविमोक्षान्तः – जाग्रत + आदिविमोक्ष + अन्तः

शब्दार्थ –ईक्षण – पहाणे, कल्पिता – अल्पिलेला, विमोक्षान्तः – मोक्षापर्यंत, जीवकल्पितः – जीवाद्वारे कल्पिलेला

अन्वय –ईक्षणादिप्रवेशान्ता सृष्टिः ईशेन कल्पिता। जाग्रतादिविमोक्षान्तः संसारः जीवकल्पितः।

अर्थ– ईक्षणादि करून या सृष्टीची उत्पत्ती आणि लय हा ईश्वराद्वारे कल्पित आहे तर जाग्रतादि अवस्थेपासून मोक्षापर्यंतचा संपूर्ण प्रपंच हा जीवकल्पीत आहे.

वैशिष्ट्य–समष्ठी सृष्टीचा आरंभ व अंत ईश्वरद्वारे तर व्यष्टिरूप जाग्रतादी अवस्थांचा आरंभ व अंत जीवाद्वारेच कल्पिलेला आहे.

त्रिणाचिकादियोगान्ता ईश्वरभ्रान्तिमाश्रिताः

लोकायतादिसांख्यान्ता जीवविभ्रान्तिमाश्रिताः।।55।।

तस्मान्मुमुक्षुभिर्नैव मतिर्जीवेशवादयोः।

कार्या किं तु ब्रह्मतत्त्वं निश्चलेन विचार्यताम्।।56।।

अद्वितीयब्रह्मतत्त्वं न जानन्ति यथा यथा।

भ्रान्ता एवाखिलास्तेषां क्व मुक्तिः क्व वा सुखम्।।57।।

संधिविच्छेद –त्रिणाचिकादियोगान्ता – त्रिणाचिक + आदियोग + अन्ताः । ईश्वरभ्रान्तिमाश्रिताः – ईश्वरभ्रान्तिम् + आश्रिताः । तस्मान्मुमुक्षुभिर्नैव – तस्मात् + मुमुक्षुभिः + न + एव । मतिर्जीवेशवादयोः – मतिः + जीव + +ईश + वादयोः । निश्चलेन – निः + चलेन । एवाखिलास्तेषां – एव + अखिलाः + तेषां ।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शब्दार्थ –लोकायत् – चार्वाक् दार्शनिक, मुमुक्षुभि – मुक्ती प्राप्तीची इच्छा करणाऱ्यांनी, विचार्यताम् – जाणून घ्यावी

अन्वय –त्रिणाचिकादियोगान्ताः ईश्वरभ्रान्तिम् अश्रिताः। लोकायतादिसांख्यान्ता जीवविभ्रान्तिम् अश्रिताः। तस्मात् मुमुक्षुभिः जीवेशवादयोः मतिः नैव कार्या, किन्तु ब्रह्मतत्त्वं निश्चलेन विचार्यताम्। (ये) ।अद्वितीयब्रह्मतत्त्वं न जानन्ति अखिला (जगत्) एव भ्रान्ताः तेषां क्व मुक्तिः क्व वा सुखम्।

अर्थ– (उपनिषदातील) त्रिणाचिकेतादि विद्यांपासून योगपर्यंत (सर्व शास्त्र) हे ईश्वरतत्त्वाधिष्ठित भ्रमावर आश्रित आहेत तर चार्वाकादि दर्शनांपासून सांख्यांपर्यंत (ही दर्शने) जीवाधिष्ठित भ्रमावर आश्रित आहेत. त्यामुळे जीव–ईश्वर तत्त्वांबाबत वाद करणाऱ्या शास्त्रावर मोक्षाची इच्छा करणाऱ्यांनी आपली बुद्धी ठेवू नये. (श्रद्धा ठेवू नये)

केवळ त्या परमब्रह्मतत्त्वाच्या स्वरूपाचे निश्चल मनाने चिंतन करत राहावे. हे अद्वितीय असलेले ब्रह्मतत्त्व जसेच्या तसे जे जाणत नाही ते सर्वत्र भ्रमयुक्त होऊन राहतात. त्यांना मुक्ती कुठे मिळेल? त्यांना सुख (आनंद) कसे मिळेल?

वैशिष्ट्य–विविध शास्त्रे, संप्रदाय यांच्या मोक्षविषयक संकल्पना व मार्ग भिन्न भिन्न असल्याने बरेच साधक गोंधळून जातात की कोणत्या मार्गाने स्वोन्नती साधावी त्या मुमुक्षुसाठी येथे स्पष्ट उपदेश करण्यात आला आहे की मार्ग भिन्न असले तरी गोंधळून न जाता त्या मार्गांनी दाखविलेला जीव–ईश्वर अभेद ओळखून परब्रह्मावर आपले ध्यान केंद्रित कर व आपले ईप्सित प्राप्त कर.

प्रत्यगभिन्नब्रह्म सर्वावस्थातीतम्

उत्तमाधमभावश्चेत् तेषां स्यादस्ति तेन किम्।
स्वप्नस्थराज्यभिक्षाभ्यां प्रबुद्धः स्पृश्यते खलु।।58।।

संधिविच्छेद –उत्तमाधमभावश्चेत – उत्तम + अधमभावः + चेत् ।स्यादस्ति – स्यात् + अस्ति

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शब्दार्थ –स्वप्नस्थ – स्वप्नातील, भिक्षाभ्यां – भिक्षेला, प्रबुद्धः –झोपेतून जागा झालेला, स्पृश्यते – हात लावणे

अन्वय –उत्तमाधमभावः चेत् तेषां स्यादस्ति तेन किम् ? स्वप्नस्थराज्यभिक्षाभ्यां प्रबुद्धः खलु स्पृश्यते (किम्) ?

अर्थ– (शास्त्राबाबत) हे उत्तम आहे, हे अधम आहे अशी जर ते भावना करीत असतील तर (ती त्याप्रमाणेच मिथ्या आहे ज्याप्रमाणे) स्वप्नात मिळविलेल्या राज्याला वा भिक्षेला झोपेतून उठणारा कधी स्पर्श करू शकत नाही.

वैशिष्ट्य–कोणतेच शास्त्र हे गौण किंवा मुख्य नसून ते आपापल्या स्थानी योग्यच असतात. शास्त्रांमध्ये असा भेद समजणे म्हणजे स्वप्नातील वस्तुंना खरे मानण्यासारखे आहे.

अज्ञाने बुद्धिविलये निद्रा सा भण्यते बुधैः।

विलीनाज्ञानतत्कार्ये मयि निद्रा कथं भवेत्।।59।।

बुद्धेः पूर्णविकासोऽयं जागरः परीकीर्त्यते।

विकारादिविहीनत्वाज्जागरो मे न विद्यते।।60।।

सूक्ष्मनाडिषु संचारो बुद्धेः स्वप्नः प्रजायते।

संचारधर्मरहिते मयि स्वप्नो न विद्यते।।61।।

संधिविच्छेद –विलीनाज्ञानतत्कार्ये – विलीन + अज्ञानतत्कार्ये । पूर्णविकासोऽयं – पूर्णविकासः + अयं । विकारादिविहीनत्वाज्जागरो – विकार + आदिविहीनत्वात् + जागरः।

शब्दार्थ –बुद्धिविलये – बुद्धित लय झाल्याने, भव्यते – म्हणतात, परीकीर्त्यते – प्रसिध्द आहे.

अन्वय –अज्ञाने बुद्धिविलये सा निद्रा (इति) बुधैः भण्यते। विलीनाज्ञानतत्कार्ये मयि निद्रा कथं भवेत्। बुद्धेः अयं पूर्णविकासः जागरः (इति) परीकीर्त्यते। विकारादिविहीनत्वात् मे जागरः न विद्यते। सूक्ष्मनाडिषु बुद्धेः संचारः स्वप्नः प्रजायते। संचारधर्मरहिते मयि स्वप्नः न विद्यते।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ– अज्ञानात (तमोगुणाश्रयाने) बुद्धीचा लय होणे म्हणजे निद्रा (सुषुप्ती) होय असे विद्वान सांगतात. पण माझ्यात जेव्हा या अज्ञानाचा व तत् निर्मित कार्यांचा लय होतो तेव्हा (माझी) निद्रा कशी संभवेल. (अर्थात् माझ्यात निद्रावस्था नाही.)

बुद्धीचा पूर्ण विकास म्हणजे जागृती अवस्था होय असे ख्यात आहे. पण विकाररहित असलेल्या माझ्या ठिकाणी जागृतावस्थाही राहत नाही.

बुद्धीचा सूक्ष्मनाडीत प्रवेश झाल्यास स्वप्नावस्था निर्माण होते. संचार धर्म नसलेल्या माझ्या ठिकाणी स्वप्नावस्थाही राहत नाही (अर्थात मी जाग्रत, स्वप्न, सुषुप्ती या तीन अवस्थांपलिकडे आहे)

वैशिष्ट्य–या श्लोकात परमात्मा हा तीनही जाग्रत, स्वप्न, सुषुप्ति या तीनही अवस्थांच्या परे आहे याचे अत्यंत सुंदर वर्णन केले आहे. बुध्दिचा विकास म्हणजे जाग्रतावस्था मात्र आत्मा विकाररहित असल्याने जाग्रतावस्थेच्या परे आहे, बुध्दीचा नाडयांमध्ये प्रवेश म्हणजे स्वप्नावस्था मात्र आत्मा संचाररहित असल्याने तो स्वप्नावस्थेच्या परे आहे तर तमोगुणप्रधान निद्रावस्था होय, आत्मा निर्गुण असल्याने सुषुप्तीच्या परे आहे.

निर्विशेषब्रह्मज्ञानेन ब्रह्मभावः

सुषुप्तिकाले सकले विलीने तमसावृते ।
स्वरूपं महदानन्दं भुङ्क्ते दृश्यविवर्जितः ।।62।।
अविशेषेण सर्वं तु यः पश्यति चिदन्वयात् ।
स एव साक्षाद्विज्ञानी स शिवः स हरिर्विधिः ।।63।।

संधिविच्छेद –तमसावृते – तमसा + आवृते । महदानन्दं – महत् + आनन्दं । चिदन्वयात् – चित् + अन्वयात् । साक्षाद्विज्ञानी– साक्षात् + विज्ञानी । हरिर्विधिः – हरिः + विधिः ।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शब्दार्थ –सुषुप्तिकाले – गाढ निद्रेत, सकले – संपूर्ण, दृश्यविवर्जितः – दिसणारे दृश्य जगताचे भान नसलेले, साक्षाद्विज्ञानी – खरा ज्ञानी

अन्वय –सुषुप्तिकाले सकले तमसावृते विलीने दृश्यविवर्जितः महदानन्दं स्वरूपं भुङ्क्ते । चिदन्वयात् यः तु अविशेषेण सर्वं पश्यति स एव साक्षाद्विज्ञानी सः शिवः सः हरिः विधिः (च)।

अर्थ– तमोगुणाच्या आवरणाने युक्त असलेल्या सुषुप्ती अवस्थेत सकल दृश्य पदार्थांचा लय झाल्यावर, दृश्यपदार्थांचे अस्तित्व नसल्याने या अवस्थेत (जीव) निज स्वरूपाचा परमानंद उपभोगतो. पण (सुषुप्ती इत्यादि) विशेषण रहित स्थितीत चैतन्याच्या सान्निध्याने जो सर्वतत्त्वांना चैतन्य स्वरूपात पहातो तोच खऱ्या अर्थाने प्रत्यक्ष विज्ञान संपन्न होतो. तोच शिव होतो. तोच विष्णु होतो. तोच विधाता होतो.

वैशिष्ट्य–तमोगुणप्रधान निद्रेत जीव स्वरूपात स्थित असतो पण जागा झाल्यावर त्यास हे दृश्यजगत सत्य प्रतीत होते मात्र जो साधक ज्ञानाद्वारे स्वरूपात होतो त्याचे स्वरूप ज्ञान कशानेच खंडीत होत नाही, तो ब्रह्मरूप होते.

जगद्विलापनपुरस्सरं ब्रह्मैकत्वचिन्तनम्

दीर्घस्वप्नमिदं यत्तद्दीर्घं वा चित्तविभ्रमम्।
दीर्घं वापि मनोराज्यं संसारं दुःखसागरम्
सुप्तेरुत्थाय सुप्त्यन्तं ब्रह्मैकं प्रविचिन्त्यताम्।।64।।

संधिविच्छेद –दीर्घस्वप्नमिदं – दीर्घस्वप्नम् + इदम् । यत्तद्दीर्घं – यत् + तत् + दीर्घं । वापि – वा + अपि । सुप्तेरुत्थाय – सुप्तेः + उत्थाय । सुप्त्यन्तं – सुप्ति + अन्तं । ब्रह्मैकं – ब्रह्म + एकं।

शब्दार्थ –दुःखसागरे – दुःखाचा सागर, दीर्घस्वप्नं – बराच काळ पाहिलेले स्वप्न, सुप्तेः –झोपलेले

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –दुःखसागरं संसारं यत्तत् दीर्घस्वप्नम् इदं दीर्घं वा चित्तविभ्रमं दीर्घं वा अपि मनोराज्यंम्। सुप्तेः उत्थाय सुप्त्यन्तं बह्मैकं प्रविचिन्त्यताम्।

अर्थ– या जगाचे भान दीर्घस्वप्नाप्रमाणे किंवा दीर्घ असलेल्या मनोविभ्रमाप्रमाणे किंवा दीर्घ अशा मनोराज्याप्रमाणे आहे आणि हे अनंत दुःखाचे स्थान आहे. या जगाच्या भावनेत झोपलेल्या जीवाने झोपेतून उठल्यावर त्या अवस्थेच्या पलीकडे असलेल्या ब्रह्माचे चिंतन करावे.

वैशिष्ट्य–संसार ही दुःखाची शृंखला आहे. स्वप्नात असे पर्यंत सर्व घटना सत्याप्रमाणे प्रतीत होतात व जागे होताच. त्यांचे अस्तित्व क्षणात नष्ट होते,तद्वत मनुष्याने या संसाराला व संसारातील दुःखाला स्वप्नवत पहात परमात्माच्या चिंतनात स्वतःला लीन करावे.

आरोपितस्य जगतः प्रविलापनेन
चित्तं मदात्मकतया परिकल्पितं नः।
शत्रून् निहत्य गुरुषट्कगणान्निपातात्
गन्धद्विपो भवति केवलमद्वितीयः।।65।।

संधिविच्छेद –मदात्मकतया – मत् + आत्मकतया। गुरुषट्कगणान्निपातात – गुरुषट्कगणान् + निपातात्। केवलमद्वितीयः – केवलम् + अद्वितीयः

शब्दार्थ –आरोपित – आरोपित केल्याचा, मदात्मकतया – माझ्या स्वरुपाशी एकरूप, निहत्य – मारून

अन्वय –प्रविलापनेन आरोपितस्य जगतः चित्तंमदात्मकतया न परिकल्पितम्। गुरुषट्कगणान् शत्रून् निहत्य गन्धद्विपः केवलम् अद्वितीयः भवतिः।

प्रत्यगभिन्नब्रह्मविषयको विद्वदनुभवः।

अद्यास्तमेतु वपुराशशितारमास्तां
कस्तावतापि मम चिद्वपुषो विशेषः।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कुम्भे विनश्यति चिरं समवस्थिते वा
कुम्भाम्बरस्य न हि कोऽपि विशेषलेशः ।।66।।
चतुर्विंशतितत्त्वानि तानि ब्रह्मविदो विदुः ।।4।।

संधिविच्छेद –अद्यास्तमेतु – अद्य + अस्तम् + एतु । वपुराशशितारमास्तां – वपुः + आशशितारम् + आस्तां । कस्तावतापि – कः + तावता + अपि । समवस्थिते – सम् + अवस्थिते । कुम्भाम्बरस्य – कुम्भ + अम्बरस्य । कोऽपि – कः + अपि । चिद्वपुषो – चित् + वपुषः ।

अन्वय –अद्यास्तमेतु वपुः आशशितारम् आस्तां तावता अपि मम चित् वपुषः कः विशेषः । चिरं समवस्थिते कुम्भे विनश्यति वा कुम्भाम्बरस्य कोऽपि नहि विशेषलेशः । तानि चतुर्विंशतितत्त्वानि ब्रह्मविदो विदुः ।

अहिनिर्ल्वयिनी सर्पनिर्मोको जीववर्जितः ।
वाल्मीके पतित्तस्तिष्ठेत्तं सर्पो नाभिमन्यते ।।67।।
एवं स्थूलं च सूक्ष्मं च शरीरं नाभिमन्यते ।
प्रत्यग्ज्ञानशिखिध्वस्ते मिथ्याज्ञाने सहेतुके ।
नेति नेतीति रूपत्वादशरीरो भवत्ययम् ।।68।।

संधिविच्छेद –नाभिमन्यते – न + अभिमन्यते । प्रत्यग्ज्ञानशिखिध्वस्ते – प्रत्यक् + ज्ञानशिखिध्वः + ते । नेति – न + इति । नेतीति – न + इति + इति । रूपत्वादशरीरो – रूपत्वात् + अशरीरः । भवत्ययम् – भवति + अयम् ।

शब्दार्थ –अहि – साप, वाल्मीके – वारूळात, सहेतुके – कारणासह,अशरीरो – शरीररहित

अन्वय –निर्ल्वयिनी अहि जीववर्जितः सर्पनिर्मोकः वाल्मीके पतित्तस्तिष्ठेत्तं सर्पः न अभिमन्यते। एवं स्थूलं सूक्ष्मं च शरीरं न अभिमन्यते, सहेतुके मिथ्याज्ञाने ते प्रत्यग्ज्ञानशिखिध्वः न इति न इति इति रूपत्वात् अयम् अशरीरः भवति।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शास्त्रेण नश्येत् परमार्थदृष्टिः
कार्यक्षमं नश्यति चापरोक्ष्यात्
प्रारब्धनाशात् प्रतिभाननाश
एवं त्रिधा नश्यति चात्ममाया।।69।।

संधिविच्छेद –परमार्थदृष्टिः – परम + अर्थदृष्टिः । चापरोक्ष्यात् – च + अपरोक्ष्यात्। चात्ममाया – च + आत्ममाया ।

शब्दार्थ –शास्त्रेण – शास्त्र अध्ययनाने , नश्येत् – नाश होतो
अपरोक्षात् – प्रत्यक्षात, प्रारब्धनाशात् – प्रारब्धकर्माच्या नाशामुळे

अन्वय –परमार्थदृष्टिः शास्त्रेण नश्येत् , अपरोक्षात् च कार्यक्षमं नश्यति प्रारब्धनाशात् प्रतिभाननाश एवं त्रिधा नश्यति च आत्ममाया

अर्थ– शास्त्राने परमार्थदृष्टि, अपरोक्षानुभवाने मायेची कार्यक्षमता आणि प्रारब्ध नष्ट झाल्याने जगाचा आभास नष्ट होतात. अश्याप्रकारे आत्ममाया तीन प्रकारांनी नष्ट होते.

वैशिष्ट्य–मायेमुळे निर्माण होणाऱ्या जगाचे भान नष्ट करावयाचे असेल तर प्रथम मायेलाच/अज्ञानाला नष्ट करणे हा एकमेव उपाय आहे. या श्लोकात मायेला तीन प्रकारे नष्ट करता येते असा उपदेश केला आहे. एक म्हणजे शास्त्र अध्ययनाने, दुसरे – प्रत्यक्षज्ञानाने आणि तिसरे म्हणजे प्रारब्ध कर्म नाशाने माया निवृत्त होऊ शकते.

ब्रह्मत्वे योजिते स्वस्मिन् जीवभावो न गच्छति।
अद्वैते बोधिते तत्त्वे वासना विनिवर्तते।

शब्दार्थ –ब्रह्मत्वे – ब्रह्मतत्वात, स्वस्मिन् – स्वतःत,योजिते – योजल्यास, बोधिते – ज्ञानाने, वासना – संस्कार, विनिवर्तते – निवृत्त होतात

अन्वय –स्वास्मिन् ब्रह्मत्वे योजिते जीवभावः न गच्छति ।बोधिते अद्वैते तत्त्वे वासना विनिवर्तते।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ– स्वतःवर (स्वरूपावर) ब्रह्मत्व भावना निर्माण झाल्यावर जीवभाव आपोआप निवृत्तीस प्राप्त होते. अद्वैताची पूर्ण अनुभूती आल्यावर सर्व वासना निवृत्त होतात.

वैशिष्ट्य–मी ब्रह्म आहे ही अनुभूती आधीच्या सर्व अज्ञानजन्य संस्कारांना समूळ नष्ट करते.

आरब्धान्ते देहहानिर्मायेत्थं क्षीयतेऽखिला।
अस्तीत्युक्ते जगत् सर्वं सद्रसं ब्रह्म तद्भवेत्।।71।।

संधिविच्छेद –आरब्धान्ते – आरब्ध + अन्ते । देहहानिर्मायेत्थं – देहहानिः + माया + इत्थं। क्षीयतेऽखिला– क्षीयते + अखिला । अस्तीत्युक्ते – अस्ति + इति + उक्ते । सद्रसं – सत् + रसं ।

शब्दार्थ –आरब्धान्ते – सुरवातीस व शेवटास, क्षीयते – क्षय होतो, सद्रसं – सताने परिपूर्ण

अन्वय –आरब्धान्ते देहहानिः इत्यं अखिला माया क्षीयते । अस्ति इति उक्ते सर्वं तद् जगत् सद्रसं ब्रह्म भवेत्।

अर्थ– प्रारब्धाच्या नाशावर देहनाश होऊन संपूर्ण माया नष्ट होते, तेव्हा अस्ति असे म्हटले जाणारे जग केवळ सद्–आनन्द रूपाचे ब्रह्म होईल.

वैशिष्ट्य–प्रारब्धनाश झाला की देहनाश होतो व माया व तज्जन्य कार्य निवृत्त होतात. पूर्वी प्रतीत होणारे हे जगत सत्–चित्–आनन्दरूप होते.

भातीत्युक्ते जगत् सर्वं भानं ब्रह्मैव केवलम्।
मरुभूमौ जलं सर्वं मरुभूमात्रमेव तत्।
जगत्त्रयमिदं सर्वं चिन्मात्रं स्वविचारतः।।72।।

संधिविच्छेद –भातीत्युक्ते – भाति + इति + उक्ते । ब्रह्मैव – ब्रह्म + एव । मरुभूमात्रमेव – मरुभूमात्रम् + एव । जगत्त्रयमिदं –जगत् + त्रयम् + इदं । चिन्मात्रं – चित् + मात्रं।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शब्दार्थ –भाति – प्रकाशने,भानं – भासीत होणारे, मरुभूमौ – वाळवंटात,चिन्मात्रं – चैतन्यमात्र

अन्वय –भाती इति उक्ते सर्वं जगत् केवल ब्रह्म एव भानम् । मरुभूमौ सर्वं जलं तत् मरुभूमात्रमेव एव सर्वम् इदं जगत्त्र्यं चिन्मात्रं स्वविचारतः।

अर्थ– नंतर 'भातिं म्हटले जाणारे जग ब्रह्म मात्र होऊन ज्याप्रमाणे मरुभूमिमध्ये भासणारे जल तत्त्वतः नसून मरुभूमीमात्रच असते तसेच तीनही लोक आत्मविचाराने चैतन्यमात्र होतात.

वैशिष्ट्य–येथे वाळवंटाचा दृष्टान्त दिला आहे, जसे वाळवंटात भासणारे मृगजळ दुसरे काही नसून वाळवंटच असतो त्याप्रमाणे भासणारे जगत दुसरे काही नसून चैतन्यरूप ब्रह्मरूपअसते.

अज्ञानमेव न कुतो जगतः प्रसङ्गो।
जीवेशदेशिकविकल्पकथातिदूरे।
एकान्तकेवलचिदेकरसस्वभावे
ब्रह्मैव केवलमहं परिपूर्णमस्मि।।73।।

संधिविच्छेद –अज्ञानमेव – अज्ञानम् + एव । जीवेशदेशिकविकल्पकथातिदूरे – जीव + ईशदेशिकविकल्पकथा + अतिदूरे । एकान्तकेवलचिदेकरसस्वभावे – एकान्तकेवलचित् + एकरसस्वभावे । परिपूर्णमस्मि – परिपूर्णम् + अस्मि।

शब्दार्थ –कुतो – कोठुन, परिपूर्णम् – पूर्णरूपाने, एकान्त – एकच

अन्वय –अज्ञानम् एव न, कुतः जगतः प्रसङ्गः, जीव–ईश–देशिक विकल्पकथा अतिदूरे। एकान्तकेवलचिदेकरसस्वभावे अहं केवलं ब्रह्म एव परिपूर्णम् अस्मि।

अर्थ– अज्ञानच नसतांना जगाचे भान कुठे होणार? तेव्हा जीव, ईश्वर, आचार्य इ. विकल्पांचा प्रसंगच दुरूनसुद्धा राहणार नाही. केवळ चैतन्य, आनन्द स्वरूपाचे अद्वितीय ब्रह्मच पूर्णतः मी आहे.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वैशिष्ट्य–अज्ञानच नष्ट झाले की तज्जनीत व्यवहारही नष्ट होतात, केवळ सदचिदानंदाचे तेवढे स्फुरण कायम राहते.

बोधचन्द्रमसि पूर्णविग्रहे
मोहराहुमुषितात्मतेजसि।
स्नानदानयजनादिकाः क्रिया
मोचनावधि वृथैव तिष्ठते।।74।।

संधिविच्छेद –मोहराहुमुषितात्मतेजसि – मोहराहुमुषित + आत्मतेजसि। स्नानदानयजनादिकाः – स्नानदानयजन + आदिकाः ।मोचनावधि – मोचन + अवधि । वृथैव – वृथा + एव

शब्दार्थ –बोध – ज्ञान,चन्द्रमसि – चंद्रामध्ये, मोचनावधि – मुक्तीपर्यंत, वृथा – उगाचच ।

अन्वय –पूर्णविग्रहेमोहराहुमुषितात्मतेजसि बोधचन्द्रमसि स्नान–दान यजनादिकाः क्रियाः मोचनावधि वृथा एव तिष्ठति ।

अर्थ– ज्ञानरूपाचा चन्द्र परिपूर्ण असूनही मोहरूपाने राहूने त्याचा प्रकाश लोप पावला तर स्नान, दान, यज्ञ इ. क्रिया मोक्षापर्यंत वृथाच होतील.

समाधिसाधनं नादानुसंधानम्

सलिले सैन्धवं यद्वत् साम्यं भजति योगतः।
तथात्ममनसोरैक्यं समाधिरिति कथ्यते।।75।।

संधिविच्छेद –यद्वत् – यत् + वत् । तथात्ममनसोरैक्यं – तथा + आत्ममनसोः + ऐक्यं ।समाधिरिति – समाधिः + इति ।

शब्दार्थ –सलिले – पाण्यात, सैन्धवं – मीठ, साम्यं – एकरूप

अन्वय –यद्वत् सलिले सैन्धवं योगतः साम्यं भजति तथा आत्ममनसोः ऐक्यं समाधिः इति कथ्यते ।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ– ज्याप्रमाणे पाण्यात मीठ एकरूप होऊन राहते. (मीठाचे वेगळे अस्तित्व राहत नाही व पाणीही सर्वांशाने खारट होते) त्याप्रमाणे योगाद्वारे आत्मा आणि मन यांचे एकरूपत्व होणे हीच समाधी होय.

वैशिष्ट्य–येथे समाधीचं म्हणजेच योगाच लक्षण दिलं आहे. पाण्यात जस मीठ एकरूप होतं,तस आत्मा व मनाची एकरूपता समाधी होय यास लययोग म्हणतात.

दुर्लभो विषयत्यागो दुर्लभं तत्त्वदर्शनम् ।
दुर्लभा सहजावस्था सद्गुरोः करुणां विना ।।76 ।।

संधिविच्छेद –सहजावस्था – सहजा + अवस्था

शब्दार्थ –दुर्लभो – प्राप्त करण्यास कठीण, विषयत्यागो – विषयवस्तूंचा त्याग करणेतत्त्वदर्शनम् – यथार्थाचा साक्षात्कार करणे, सहजावस्था – स्वाभाविक स्थिती, करूणा –कृपाप्रसाद

अन्वय –सद्गुरोः करुणां विना विषयत्यागः दुर्लभः, तत्त्वदर्शनं दुर्लभं, सहजा अवस्था दुर्लभा ।

अर्थ– सद्गुरूच्या करुणेशिवाय विषयांचा त्याग करणे कठीण आहे. तत्त्वांचे यथार्थ ज्ञान होणेही कठिण आहे. (तसेच) स्वाभाविक स्थिती प्राप्त करून घेणे दुष्कर आहे.

वैशिष्ट्य–सद्गुरुच्या कृपाप्रसादानेच अशक्य वाटणारे सर्व ज्ञान, अवस्था साधक प्राप्त करू शकतो. येथे गुरुमहिमा वर्णिला आहे.

उत्पन्नशक्तिबोधस्य त्यक्तनिःशेषकर्मणः ।
योगिनः सहजावस्था स्वयमेव प्रकाशते ।।77 ।।

संधिविच्छेद –स्वयमेव – स्वयम् + एव

शब्दार्थ –उत्पन्नशक्तिबोधस्य – उत्पन्न झालेल्या शक्तिचे ज्ञान
त्यक्तनिःशेषकर्मणः– सर्व प्रकारच्या कर्माचा त्याग करून

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –उत्पन्नशक्तिबोधस्य त्यक्तनिःशेषकर्मणः योगिनः सहजा अवस्था स्वयमेव प्रकाशते ।

अर्थ– सर्व प्रकारच्या कर्मांचा निःशेष रूपाने त्याग केल्यास आणि योगीच्या अंगी ज्ञानाचे सामर्थ्य उत्पन्न झाल्यास समाधी अवस्था आपोआपच प्रकट होते.

वैशिष्ट्य–कर्मत्याग व ज्ञानप्राप्ती या दोन साधनांनी साधक स्वरूपात स्थित होऊ शकतो असे येथे वर्णिले आहे.

रसस्य मनसश्चैव चञ्चलत्वं स्वभावतः ।
रसो बद्धो मनो बद्धं किं न सिध्यति भूतले ।।78 ।।

संधिविच्छेद –मनसश्चैव – मनसः + च + एव

शब्दार्थ –बद्धो – बांधल्यास, सिध्यति – साध्य होणे,भूतले – इहलोकात

अन्वय –रसस्य मनसः च एव चञ्चलत्वं स्वभावतः (भवति) ।
रसो बद्धो मनो बद्धं भूतले किं न सिध्यति ।

अर्थ– रस (आसक्ती) आणि मन हे स्वभावतःच चंचल आहेत. रसावर (आसक्तीवर) नियंत्रण मिळविल्यास व मनावर ताबा मिळविल्यास या जगतात काय साध्य होणार नाही.

वैशिष्ट्य–(आसक्ती) रागावर नियंत्रण व मनावर ताबा मिळविला तर साधकाला असाध्य असे काही राहणार नाही

मूर्च्छितो हरति व्याधिं मृतो जीवयति स्वयम् ।
बद्धःखेचरतां धत्ते ब्रह्मत्वं रसचेतसि ।।79 ।।

शब्दार्थ –मूर्च्छितो – मृच्छा आलेल्याच्या, व्याधि – विकार, रोग,मृतो – मेलेला, धत्ते – धारण करते.

अन्वय –रसचेतसि ब्रह्मत्वं मूर्च्छितः व्याधिं हरति, मृतः स्वयं जीवयति बद्धः खेचरतां धत्ते ।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ– (हृदयात) ब्रह्म रसाचे आंदोलन असेल तर मूर्च्छित मनुष्याच्या व्याधीही नष्ट होतात, मृत व्यक्ती पून्हा जीवन जगायला लागते, बद्ध व्यक्ती खेचरीविद्या प्राप्त करू शकते.

वैशिष्ट्य–ब्रह्मरसात लीन झालेला साधक व्याधी, मृत्यु, बंधनातून मुक्त होतो. शाश्वत पदावर आरूढ होतो.

इन्द्रियाणां मनो नाथो मनोनाथस्तु मारुतः।

मारुतस्य लयो नाथस्तन्नाथं लयमाश्रय।।80।।

संधिविच्छेद –मनोनाथस्तु – मनोनाथः + तु ।नाथस्तन्नाथं – नाथः + तत् + नाथं । लयमाश्रय – लयम् + आश्रय।

शब्दार्थ –मारुतः – वायू, लय – लययोग

अन्वय –इन्द्रियाणां नाथः मनः , मनोनाथः तु मारुतः , मारुतस्य लयः नाथः तन्नाथं लयम् आश्रय ।

अर्थ– इन्द्रियांचा स्वामी मन आहे. मनाचा स्वामी पवन (प्राण) आहे. प्राणांचा स्वामी लय आहे. त्यामुळे इन्द्रिय, मन व प्राण यांना नियंत्रीत करण्यासाठी (प्राणाचा नाथ असलेल्या) त्याच्या नाथाचा अर्थात् लययोगाचा आश्रय घे.

वैशिष्ट्य–इन्द्रिय मन आणि प्राण यांना स्थिर करण्याचा उपाय म्हणजे लययोग. ज्या साधकाचा लययोग सिध्द झाला तो मुक्तीचा अधिकारी होतो.

निश्चेष्टो निर्विकारश्च लयो जीवति योगिनाम्।

उच्छिन्नसर्वसंकल्पो निःशेषाशेषचेष्टितः।

स्वावगम्यो लयः कोऽपि मनसा वागगोचरः।।81।।

संधिविच्छेद –निश्चेष्टः – निस् + चेष्टः । निर्विकारश्च – निर्विकारः + च । उच्छिन्नसर्वसंकल्पः – उत् + च्छिन्नसर्वसंकल्पः ।निःशेषाशेषचेष्टितः – निस् + शेष + अशेषचेष्टितः ।स्वावगम्यो – स्व + अवगम्य ।कोऽपि – कः + अपि ।वागगोचरः – वाक् + अगोचरः ।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शब्दार्थ –निश्चेष्टो – चेष्टारहित, निर्विकार – विकाररहित, उच्छिन्नसर्वसंकल्पो – सर्व संकल्पांचा नाश केलेला, स्वावगम्यो – स्वतः अनुभवलेला/ज्ञान झालेलामनसा – मनाद्वारे, वागगोचर – वाणीद्वारे जाणणे

अन्वय –निश्चेष्टः निर्विकारश्च उच्छिन्नसर्वसंकल्पः निःशेषाशेषचेष्टितः योगिनां लयः जीवति। स्वावगम्य मनसा वागगोचरः कोऽपि लयः (जीवति)।

अर्थ–सर्व कार्याचा, विकारांचा, संकल्पांचा, सर्वप्रकारच्या कर्मांचा त्याग केलेल्या योगसाधकाचा लययोग सिध्द होतो. या लययोगाचा अनुभव प्राप्त झाल्याने पुन्हा त्यास मनाने, वाणीने दाखविण्याची गरजच राहत नाही.

वैशिष्ट्य–या श्लोकात लययोग हा अनुभूतीचा विषय आहे. इन्द्रियादिंनी अगम्य अनिर्वचनीय असा लय योग आहे, हे प्रतिपादीत केले आहे.

पुङ्खानुपुङ्खविषयेक्षणतत्परोऽपि
ब्रह्मावलोकनधियं न जहाति योगी।
संगीततालयवाद्यवशं गतापि
मौलिस्थकुम्भपरिरक्षणधीर्नटीव।।82।।

संधिविच्छेद –पुङ्खानुपुङ्खविषये – पुङ्ख + अनुपुङ्खविषय + ईक्षणतत्परोऽपि –ईक्षणतत्परः + अपि । ब्रह्मावलोकनधियं – ब्रह्म + अवलोकनधियं । मौलिस्थकुम्भपरिरक्षणधीर्नटीव– मौलिस्थकुम्भपरिरक्षणधीः + नटी + इव । गतापि – गता +अपि

अन्वय –पुङ्खानुपुङ्खविषयेक्षणतत्परः अपि योगी संगीततालयवाद्यवशं गतापि मौलिस्थपरिरक्षणधीः नटी इव ब्रह्मावलोकनधियं न जहाति।

अर्थ– खरा योगी असंख्या विषयांचे अवलोकन करतांनासुद्धा ब्रह्मावलोकनाची बुद्धी सोडत नाही. ज्याप्रमाणे कुशल नर्तकी डोक्यावर घट ठेऊन नाचतांना संगीत, ताल, लय वाद्यांचे ध्वनी ऐकूनही स्वतःची दृष्टी त्या घटावरून विचलित होऊ देत नाही.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वैशिष्ट्य–येथे डोक्यावर घट ठेऊन नृत्य करणाऱ्या नर्तकीचा दृष्टान्त दिला आहे. ताल, लय, गीत, वाद्य यांच्यावर लक्ष ठेवूनही नर्तकी आपली एकाग्रता घटाच्या ठिकाणी केंद्रित करते. तद्वत ज्ञानाचे अनेक विषय समोर असले तरी ब्रह्मज्ञानी आपले ध्यान ब्रह्मतत्त्वाखेरीज अन्य विषयावर जाऊ देत नाही.

सर्वचिन्तां परित्यज्य सावधानेन चेतसा।
नाद एवानुसंधेयो योगसाम्राज्यमिच्छता।।83।।

संधिविच्छेद –एवानुसंधेयो – एव + अनुसंधेयः । योगसाम्राज्यमिच्छता – योगसाम्राज्यम् + इच्छता ।

शब्दार्थ –सर्वचिंता – सर्व प्रकारच्या चिंता/विचार, परित्यज्य – सोडून देऊन, सावधानेन – एकाग्रतेने, अनुसंधेया – त्याचे ध्यान लावत.

अन्वय –योगसाम्राज्यम् इच्छता सर्वचिन्तां परित्यज्य सावधानेन चेतसा नाद एव अनुसंधेयः।

अर्थ– योग साम्राज्य (कैवल्य) प्राप्त करण्याची इच्छा करणाऱ्याने सर्व (बाह्य आणि आंतरिक) चिंतांचा त्याग करून एकाग्र चित्ताने नादानुसंधानाचा अभ्यास करावा.

वैशिष्ट्य–नादानुसंधानाने प्राप्त होणारा लययोग सिध्द करणाऱ्या साधकाला योगाचे फळ म्हणजे कैवल्य निश्चितच प्राप्त होते.

इति द्वितीयोऽध्यायः



CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तृतीयोऽध्यायः

अद्वितीयपरमात्मानुभवः

न हि नानास्वरूपं स्यादेकं वस्तु कदाचन।

तस्मादखण्ड एवास्मि तन्मदन्यन्न किंचन।।1।।

संधिविच्छेद –स्यादेकं – स्यात् + एकं । तस्मादखण्ड – तस्मात् + अखण्ड । एवास्मि – एव + अस्मि । तन्मदन्यन्न – तत् + मत् + अन्यत् + न

शब्दार्थ –नानास्वरूपम् – भिन्न भिन्न स्वरूपाची, किंचन – काहीच नाही

अन्वय –एकं वस्तु नानास्वरूपं हि कदाचन न । तस्मात् अखण्डः एव अस्मि, तत् मत् अन्यत् किंचन न।

अर्थ– वस्तू (सत्पदार्थ) ही कधीच भिन्नभिन्न स्वरूपाची नसते तर ती एकच असते. म्हणूनच मी (सत् वस्तू) अखण्ड आहे आणि माझ्यापेक्षा दुसरे कोणतेच तत्त्व अस्तित्वात नाही.

वैशिष्ट्य–मातीचे खेळणे, भांडे, घट इ. वस्तू आकाराने भिन्न भिन्न भासल्या तरी त्यांच्यातील मृन्मयत्व समान असते. तद्वत् संसारातील सर्व वस्तू भिन्न भिन्न भासंत असल्या तरी त्या सर्व सद्रूप आहेत. ब्रह्मरूंपच आहेत असे जाणावें

दृश्यते श्रूयते यद्यद् ब्रह्मणोऽन्यन्न तद्भवेत्।

नित्यशुद्धविमुक्तैकमखण्डानन्दमद्वयम्

सत्यं ज्ञानमनन्तं यत् परं ब्रह्म भवामि तत्।।2।।

संधिविच्छेद –यद्यद् – यत् + यत् । ब्रह्मणोऽन्यन्न – ब्रह्मणः + अन्यत् + न । नित्यशुद्धविमुक्तैकमखण्डानन्दमद्वयम् – नित्यशुद्धविमुक्त + एकम् + अखण्ड + आनन्दम् + अद्वयम् । ज्ञानमनन्तं – ज्ञानम् + अनन्तं ।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शब्दार्थ –दृश्यते – दिसते, श्रुयते – ऐकू येते, भवेत – होता, भवामि – मी होईल.

अन्वय –यद् यद् दृश्यते श्रूयते तत् ब्रह्मणः अन्यत् न भवेत् यत् नित्य–शुद्धविमुक्तैकम् अखण्डानन्दम् अद्वयं सत्यं अनन्तं ज्ञानं परं ब्रह्म तत् भवामि।

अर्थ– जे जे दिसते, जे जे ऐकू येते ते सर्व ब्रह्म होय. ब्रह्माला सोडून (दृश्य,श्राव्य) असे अन्य कोणते तत्त्व (अस्तित्वात नाही), नित्य, शुद्ध, विमुक्त, अखण्ड, आनंदमय, सत्य, ज्ञानस्वरूप व अनन्त असे जे पर ब्रह्म तत्त्व आहे तेच मी होणार आहे. (अर्थात् सत्यज्ञान अनंतादि असलेल्या ब्रह्मतत्त्वातच मी सामावून जाणार आहे.)

वैशिष्ट्य–जे जे जाणण्यास योग्य आहे ते ते ब्रह्म आहे. असे जाणून घेऊन स्वतः ब्रह्मरूप हो असा उपदेश येथे केला आहे.

आनन्दरूपोऽहमखण्डबोधः
परात्परोऽहं घनचित्प्रकाशः।
मेघा यथा व्योमं न च स्पृशन्ति
संसारदुःखानि न मां स्पृशन्ति।।3।।

संधिविच्छेद –आनन्दरूपोऽहमखण्डबोधः – आनन्दरूपः + अहम् + अखण्डबोधः । परात्परोऽहं – परात्परः + अहं ।

शब्दार्थ –मेघा –ढग, व्योम –आकाश, स्पृशन्ति– स्पर्श करणे

अन्वय –अखण्डबोधः आनन्दपरः अहं, परात्परः घनचित्प्रकाशः अहम् । यथा मेघाः व्योमं न स्पृशन्ति, संसारदुःखानि मां न स्पृशन्ति।

अर्थ– मी आनंदरूप, अखंड, ज्ञानरूप, परापररूप, चैतन्यघन व प्रकाशरूप असे तत्त्व आहे. ज्याप्रकारे ढग आकाशाला स्पर्श करीत नाही त्याप्रमाणे संसारातील सुख–दुःखे मला कधीच स्पर्श करीत नाही.

वैशिष्ट्य–येथे मेघ–आकाशाच्या दृष्टान्ताद्वारे स्पष्ट केले आहे की, आकाशात राहूनही मेघ त्यास स्पर्श करत नाही. तद्वत सुख–दुःखादि कधीच आत्म्याला स्पर्श करीत नाही. आत्मा हा निर्लिप्त आहे.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सर्वं सुखं विद्धि सुदुःखनाशात्

सर्वं च सद्रूपमसत्यनाशात् ।

चिद्रूपमेव प्रतिभानयुक्तं

तस्मादखण्डं मम रूपमेतत् ।।4।।

संधिविच्छेद –सद्रूपमसत्यनाशात् – सत् + रूपम् + असत्यनाशात् । चिद्रूपमेव – चित् + रूपम् + एव । तस्मादखण्डं – तस्मात् + अखण्डं । रूपमेतत् – रूपम् + एतत्

शब्दार्थ –सुदुःखनाशात् सर्वं सुखं, असत्यनाशात् सर्वं च सत् रूपं विद्धि। प्रतिभानयुक्तं चित्–रूपमेव तस्मात् एतत् मम अखण्डं रूपम्।

अन्वय –सुदुःखनाशात्– त्रिविध दुःखांच्या नाशानंतर, असत्यनाशात् – असत्पदार्थांच्या नाशाने, विद्धि – जाण

अर्थ– सर्व प्रकारच्या (आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक) दुःखाच्या 'नाशानंतर सर्व सुख आहे (आनंदच अवशिष्ट राहतो) हे जाण. असत् च्या नाशानंतर सर्व सत् राहते आणि प्रतिभान युक्त असे चैतन्यरूप राहते म्हणून माझे हे रूप अखण्ड असे आहे.

वैशिष्ट्य–दुःखाचा नाश म्हणजे परमानंदाची प्राप्ती, असताचा नाश म्हणजे सद्रुपाची प्राप्ती, सत् आणि आनंद म्हणजेच ब्रह्मप्राप्ती होय.

न हि जनिर्मरणं गमनागमौ

न च मलं विमलं न च वेदनम् ।

चिन्मयं हि सकलं विराजते

स्फुटतरं परमस्य तु योगिनः ।।5।।

संधिविच्छेद –जनिर्मरणं – जनिः + मरणं । गमनागमौ – गमन + आगमौ । चिन्मयं –चित् + मयं

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शब्दार्थ –जनिर्मरणं– जन्ममरण, गमनागमौ – जाणे–येणे, मलविमलं – शुध्दता–अशुध्दता, विराजते–शोभते

अन्वय –अस्य तु योगिनः जनिर्मरणं गमनागमौ हि न, न मलं च विमलं वेदनं च न । परं स्फुटतरं चिन्मयं सकलं हि विराजते।

अर्थ– योगीवर्यासाठी (या विश्वात) जन्ममृत्यु राहत नाही, गमन–आगमन राहत नाही, मल राहत नाही तसेच विमलता ही राहत नाही, कोणतीच जाणिव राहत नाही केवळ सर्वत्र व्यापलेले प्रकाशित असलेले असे चैतन्यमय (ब्रह्मतत्त्व त्याच्यासाठी) विराजित असते.

वैशिष्ट्य–जन्ममृत्यु, शुध्दता–अशुध्दता, गमनागमन इ. सर्व द्वंद्वातून साधक मुक्त होऊन द्वंद्वरहित ब्रह्मात एकरूप होतो.

चिन्मात्रभावापत्तिसाधनमौनविधिः

सत्यचिद्घनमखण्डमद्वयं सर्वदृश्यरहितं निरामयम्।
यत् पदं विमलमद्वयं शिवं तत् सदाहमिति मौनमाश्रय।।6।।

संधिविच्छेद –सत्यचिद्घनमखण्डमद्वयं –सत्यचित् + घनम् + अखण्डम् + अद्वयं । निरामयम् – निर् + आमयम् । विमलमद्वयं – विमलम् + अद्वयं । सदाहमिति – सदा + अहम् + इति । मौनमाश्रय – मौनम् + आश्रय

शब्दार्थ –सर्वदृश्यरहितम् – प्रमेयपदार्थ रहित असलेले,विमल – शुध्द, शिव – पवित्र

अन्वय –सत्य – चिद्घनम् अखण्डं अद्वयं सर्वदृश्यरहितं निरामयम् विमलं अद्वयं पदं यत् शिवं तत् सदा अहम् इति मौनम् आश्रय।

अर्थ– सत्य, चैतन्यघन, अखण्ड, अद्वितीय, सर्व दृश्यपदार्थ्यांव्यतिरिक्त, निरामय, शुद्ध असे जे एकच पद आहे ते शिव होय व नित्य मी त्या पदाचाच अंश आहे (असे जाणून) मुनिभावास प्राप्त कर (मुनिंच्या समतोल चित्तवृत्तीप्रमाणे स्वचित्त ठेव)

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वैशिष्ट्य–दृश्य पदार्थांना सोडून द्रष्ट्याच्या स्वरूपात स्थित हो, ते पद पवित्र अद्वैतरूपी आहे. या पदावर गेलेला वाचारंभविकारास बळी पडत नाही.

जन्ममृत्युसुखदुःखवर्जितं जातिनीतिकुलगोत्रदूरगम्।
चिद्विवर्तजगतोऽस्य कारणं तत् सदाहमिति मौनमाश्रय।।7।।

संधिविच्छेद –चिद्विवर्तजगतोऽस्य–चित् + विवर्तजगतः + अस्य
सदाहमिति – सदा + अहम् + इति । मौनमाश्रय – मौनम् + आश्रय

शब्दार्थ – विवर्त – भास

अन्वय – जन्ममृत्युसुखदुःखवर्जितं जाति–नीति–कुल–गोत्रदूरगं अस्य
चित्–विवर्तजगतः कारणं तत् सदा अहम् इति मौनम् आश्रय।

अर्थ– जन्ममृत्यु, सुख–दुःख, यांचा संबंध नसलेले, जाति, नीति, कूल, गोत्र यांपासून पूर्णतः दूर असलेले व विवर्तरूप असलेल्या जगताचे अधिष्ठान असलेले ते तत्त्व (ब्रह्मतत्त्व) नित्य मी आहे. (असे जाणून) मुनिभावास प्राप्त हो. (मुनिभावाचा आश्रय घे.)

वैशिष्ट्य–दोरीवर सापाचा आरोप करतांना दोरी अधिष्ठान व सर्प तीचा विवर्त आहे. अधिष्ठान खरं असते विवर्त मिथ्या असते त्याप्रमाणे ब्रह्म हे अधिष्ठान आहे व जगत् त्याचा विवर्त आहे. जो अधिष्ठानाचे ज्ञान प्राप्त करतो त्यास विवर्ताचे मिथ्यात्व पूर्ण प्रतीत होते. त्यामुळे 'ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या' ह्या ज्ञानाचा अनुभव घेतल्यावर जगताशी संबधीत जन्ममृत्यु इ. व्यवहारही मिथ्या होतात.

पूर्णमद्वयमखण्डचेतनं विश्वभेदकलनादिवर्जितम्।
अद्वितीयपरसंविदंशकं तत् सदाहमिति मौनमाश्रय।।8।।

संधिविच्छेद –पूर्णमद्वयमखण्डचेतनं–पूर्णम् + अद्वयम् + अखण्डचेतनं। विश्वभेदकलनादिवर्जितम् – विश्वभेदकलन + आदिवर्जितम्।अद्वितीयपरसंविदंशकं– अद्वितीयपरसंवित् + अंशकं। सदाहमिति सदा + अहम् + इति। मौनमाश्रय–मौनम् + आश्रय

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –पूर्णम् अद्वयम् अखण्डचेतनं विश्वभेदकलनादिवर्जितम् अद्वितीयपरसंवित्–अंशकं तत् सदा अहम् इति मौनम् आश्रय।

अर्थ– पूर्णरूप, अद्वय, अखंड, चेतनस्वरूप असलेले, वैश्विक भेदांच्या धारणेपासून पूर्णतः निर्लिप्त असलेले, (भेदरहित असलेले) असे अद्वितीय, परम, सविंद्‌चा अंश असलेले ब्रह्मतत्व नित्य मी आहे. (हीच नित्य माझी अवस्था आहे असे जाणून) मूनिभावास प्राप्त हो.

वैशिष्ट्य–येथे निर्गुण ब्रह्माच्या स्वरूपाचे वर्णन आले आहे. ब्रह्म हे पूर्ण–अद्वय–अखंड–चैतन्यमात्र–निर्लिप्त–अद्वितीय–संविद्रूप असे आहे.

भगवतः सच्चिदानन्दत्वम्

केनाप्यबाधितत्वेन त्रिकालेऽप्येकरूपतः।
विद्यमानत्वमस्त्येतत् सद्रूपत्वं सदा मम।।9।।
निरूपाधिकनित्यं यत् सुप्तौ सर्वसुखात् परम्।
सुखरूपत्वमस्त्येतदानन्दत्वं सदा मम।।10।।

संधिविच्छेद –केनाप्यबाधितत्वेन – केन + अपि + अबाधितत्त्वेन । त्रिकालेऽप्येकरूपतः – त्रिकाले + अपि + एकरुपतः । विद्यमानत्वमस्त्येतत् – विद्यमानत्वम् + अस्ति + एतत् । सुखरूपत्वमस्त्येतदानन्दत्वं – सुखरूपत्वम् + अस्ति + एतत् + आनन्दत्वं।

शब्दार्थ –अबाधितत्वेन – बाधितन होणारे, सुप्तौ – निद्रेत, निरूपाधिक – उपाधी रहित

अन्वय –केनापि अबाधितत्त्वेन त्रिकाले अपि एकरूपतः विद्यमानत्वम् एतत् सदा मम सत्–रूपत्वम् अस्ति, यत् निरूपाधिकनित्यं सुप्तौ सर्वसुखात् परं सुखरूपत्वम् एतत् सदा मम आनन्दत्वम् अस्ति।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ– कुठल्यातरी अबाधितत्वाने तिनही काळात एकरूप राहणारे व अस्तित्वात राहणारे असे माझे नित्य सद्‌रूपत्व आहे. उपाधिरहित, नित्य व सुषुप्तीपेक्षाही परम सुखानुभूती देणारे, असे सूखरूपत्व म्हणजे माझे नित्य आनंदत्व आहे. (अर्थात् मी नित्य सत् आणि आनंदरूप आहे. सद्रूपत्व व आनन्दत्व हा माझा (चैतन्याचा) स्वभाव आहे.

वैशिष्ट्य–येथे ब्रह्माचे सत्–चित–आनंद रूप स्वरूपलक्षणाचा उल्लेख केला आहे.

भगवद्‌भक्तिरेव मोक्षसाधनम्

दिनकरकिरणैर्हि शार्वर तमो
निबिडतरं झटिति प्रणाशमेति।
घनतरभवकारणं तमो
यद्धरिनिनकृत्प्रभया न चान्तरेण।।11।।

संधिविच्छेद –दिनकरकिरणैर्हि–दिनकरकिरणैः + हि । प्रणाशमेति– प्रणाशम् + इतियद्धरिनिनकृत्प्रभया–यत् + हरिनिनकृत्प्रभया । चान्तरेण– च + अन्तरेण।

शब्दार्थ – दिनकर – सूर्य, निबिडतरं – घनदाट, झटिति –लवकर

अन्वय –दिनकरकिरणैः हि शार्वर निबिडतर तमोझटिति प्रणाशम् एति न च हरिनिनकृत्प्रभया अन्तरेण यत् घनतरभवकारणंतमो + प्रणाशमेति।

अर्थ– (ज्याप्रकारे) सूर्याच्या किरणांद्वारे भयंकर घनदाट काळोख हा त्वरित नष्ट होतो. (त्याप्रमाणे) या जगतांचे कारण असलेल्या भयंकर अविद्येचा नाश त्या परमेश्वररूपी सूर्याच्या प्रभेने लवकरच होतो.

वैशिष्ट्य–ब्रह्म स्वयंप्रकाश आहे. जसा स्वयंप्रकाश सूर्याचा उदय होताच घनदाट अंधःकार क्षणात नाहिसा होतो तद्वत ब्रह्मज्ञान हे घनदाट आवरणरूप असलेल्या अविद्येला क्षणात नाहीसे करते व स्वतःचे स्वरूपाचे ही साक्षात दर्शन घडविते. जसे सूर्याला बघायला अन्य साधन लागत नाही तसेच साधनाची गरज भासत नाही, म्हणून ब्रह्म स्वयंप्रकाशित आहे.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मम चरणस्मरणेन पूजया च
स्वकतमसः परिमुच्यते हि जन्तुः।
न हि मरणप्रभवप्रणाशहेतुर्मम
चरणस्मरणादृतेऽस्ति किंचित्।।12।।

संधिविच्छेद –मरणप्रभवप्रणाशहेतुर्मम – मरणप्रभवप्रणाशहेतुः + मम।चरणस्मरणादृतेऽस्ति – चरणस्मरणात् + ऋते + अस्ति।

शब्दार्थ –चरणस्मरणेन – चरणकमलांच्या स्मरणमात्राने, परिमुच्यते – पूर्ण मुक्त होते, जन्तु – प्राणिमात्र, ऋते –शिवाय/व्यतिरिक्त

अन्वय – मम चरणस्मरणेन पूजया च जन्तुः स्वकतमसः परिमुच्यते, न हिमम चरणस्मरणात् ऋते मरणप्रभवप्रणाशहेतुः किंचित् अस्ति।

अर्थ– माझ्या चरणांच्या स्मरणमात्रेने व भक्तिने जीव स्वरूपाविषयक असलेल्या (अनादि) अविद्येतून मुक्त होतो. माझ्या भक्ती व्यतिरिक्त अन्य कोणताच उपाय त्वरित मृत्यूच्या चक्राचा नाश करणारा नाही.(भवचक्रातून शीघ्र मुक्त करणारे भक्ती हे एकमेव साधन आहे.)

वैशिष्ट्य–विद्वानांमध्ये मोक्षप्राप्तीच्या साधनात ज्ञान श्रेष्ठ की भक्ती श्रेष्ठ, असा मतभेद आढळतो. येथे मात्र ज्ञानोत्तर भक्तीची श्रेष्ठता प्रतिपादीत करण्यात आली आहे.

आदरेण यथा स्तौति धनवन्तं धनेच्छया।
तथा चेद्विश्वकर्तारं को न मुच्यते बंधनात्।।13।।

संधिविच्छेद –**ध**नेच्छया – धन + इच्छया । चेद्विश्वकर्तारं – चेत् + विश्वकर्तारं

शब्दार्थ – आदरेण – अत्यंत श्रध्देने, स्तौति – स्तवन करतो, धनवंत – धनाढ्याला, धनेच्छया – धनाच्या इच्छेने

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –यथा धनेच्छया धनवन्तं आदरेण स्तौति तथा चेत् विश्वकर्तारं (स्तौति) कः बंधनात् न मुच्यते।

अर्थ– ज्याप्रमाणे धनप्राप्तीची इच्छा असल्यास (याचक) धनवंतास अत्यंत आदराने आळवितो त्याप्रमाणे बंधनातून (भवचक्रातून) मुक्त व्हायचे असेल तर परमेश्वराला (तेवढ्याच श्रद्धेने व व्याकूळतेने आळवावयास हवे.)

वैशिष्ट्य–'जसा भाव तसे फळ' असे जे म्हणतात ते संयुक्तिक आहे. आपण ज्या भावाने दात्याला आळवतो तो तसे फळ आपल्याला प्रदान करतो. धनाची इच्छा करणाऱ्याला धन तर मुक्तीची इच्छा करणाऱ्याला मुक्ती मिळते.

ईश्वरस्य सर्वसमत्वम्

आदित्यसंनिधौ लोकश्चेष्टते स्वयमेव तु।
तथा मत्संनिधावेव समस्तं चेष्टते जगत्।।14।।

संधिविच्छेद –लोकश्चेष्टते – लोकः + चेष्टते । स्वयमेव – स्वयम् + एव । मत्संनिधावेव – मत्संनिधौ + एव

शब्दार्थ –आदित्य – सूर्य , चेष्टते – कार्य करतात.

अन्वय –(यथा) आदित्यसंनिधौ स्वयम् एव तु लोकः चेष्टते तथा मत्संनिधौ एव समस्तं जगत् चेष्टते।

अर्थ– सूर्याच्या सान्निध्यात प्रत्येकजण स्वतःहून व्यवहार करण्यास समर्थ होतो. त्याप्रमाणे माझ्या (आत्मतत्वाच्या) सान्निध्याने संपूर्ण विश्व व्यवहार करण्यास समर्थ आहे.

वैशिष्ट्य–सर्व क्रियांचे अधिष्ठान सूर्य आहे कारण दिवस उजाडला की व्यावहारीक क्रिया सुरू होतात, तद्वत सर्वच क्रियां कलापांचे अधिष्ठान हे आत्मतत्त्व आहे.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शुक्तिकायां यथा तारं कल्पितं मायया तथा।
महदादि जगन्मायेयं मय्येव केवलम्।।15।।

संधिविच्छेद –महदादि – महत् + आदि । जगन्मायेयं– जगत् + माया + इयं । मय्येव – मयि + एव

शब्दार्थ –शुक्तिकायां – शिंपल्यात, कल्पितं – कल्पना केलेले, महदादि – महत् पासून पृथिवी पर्यंतचे समस्त जगत्

अन्वय –यथा शुक्तिकायां मायया तारं कल्पितं तथा महदादि इयं जगन्माया केवलं मयि एव (कल्पिता)

अर्थ– ज्याप्रमाणे अज्ञानाने शिंपल्यावर चांदीची कल्पना केली जाते त्याप्रमाणे अज्ञानानेच या महदादिजगताची कल्पना केवळ माझ्यावर केली जाते.

वैशिष्ट्य–वस्तूवर अवस्तूचा आरोप करणे म्हणजे अध्यारोप होय. अधिष्ठानाच्या अज्ञानाने ज्याप्रमाणे शिंपल्यावर चांदीचा आरोप केल्या जातो त्याप्रमाणे सद्वस्तूवर (ब्रह्मावर) अविद्येने या जगताचा आरोप केल्या जातो. अधिष्ठानाच्या ज्ञानानंतर आरोपित वस्तू मिथ्या असल्याचा अनुभव येतो. म्हणून ब्रह्मज्ञानानंतरच या जगताचे मिथ्यात्व प्रतीत होते.

चण्डालदेहे पश्वादिस्थावरे ब्रह्मविग्रहे
अन्येषु तारतम्येन स्थितेषु न तथा ह्यहम्।।16।।

संधिविच्छेद –पश्वादिस्थावरे – पशु + आदिस्थावरे । ह्यहम् – हि + अहम्

शब्दार्थ –चण्डालदेहे – चण्डालाच्या देहात. स्थावरे – स्थिर देहात (पाषाणादि)

अन्वय –(यथा) तारतम्येन चण्डालदेहे पश्वादिस्थावरे ब्रह्मविग्रहे अन्येषु स्थितेषु न तथा हि अहम्।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ–चण्डालाच्या देहात, पशु इत्यादींच्या देहात, स्थावरांमध्ये, देवतादि विग्रहामध्ये वा अन्य कोणत्याही देहात ज्याप्रमाणे माझी स्थिती (देहीरूपाने) जशी भासित होते तसा वास्तविक रूपाने मी नाही. (माझी स्थिती वा स्वरूप या सर्वांपेक्षा आणखी निराळे आहे. ही चण्डालादि देहांमध्ये भासित होणारी स्थिती ही सोपाधिक आहे. व मी पूर्णतः निरूपाधिक असे तत्त्व आहे.)

वैशिष्ट्य–चराचर सृष्टित चैतन्य व्यापले आहे हे खरे असले तरी चराचर सृष्टि ही उपाधिने अर्थात नाम, रूप, आकार इ. ने युक्त आहे. ब्रह्म हे निरूपाधिक आहे त्यामुळे या श्लोकात ब्रह्म सर्वत्र व्यापलेलं असले तरी त्याचे स्वरूप यापेक्षा भिन्न आहे असे वर्णिले आहे.

विनष्टदिग्भ्रमस्यापि यथापूर्वं विभाति दिक् ।
तथा विज्ञानविध्वस्तं जगन्मे भाति तन्न हि ।।17।।
न देहो नेन्द्रियप्राणो न मनोबुद्ध्यहंकृतिः ।
न चित्तं नैव माया च न च व्योमादिकं जगत् ।।18।।
न कर्ता नैव भोक्ता च न च भोजयिता तथा
केवलं चित्सदानन्दब्रह्मैवाहं जनार्दनः ।।19।।

संधिविच्छेद –विनष्टदिग्भ्रमस्यापि – विनष्टदिक् + भ्रमस्य + अपि । जगन्मे – जगत् + मे । तन्न – तत् + न । नेन्द्रियप्राणो – न + इन्द्रियप्राणः । मनोबुद्ध्यहंकृतिः – मनोबुद्धि + अहंकृतिः । नैव – न + एव । व्योमादिकं – व्योम + आदिकं । चित्सदानन्दब्रह्मैवाहं – चित् + सत् + आनन्दब्रह्म + एव + अहं

शब्दार्थ –विनष्ट – नष्ट होऊन, दिग् – दिशा , भक्ति – प्रकाशित होणे,भोक्ता – भोग घेणारा, भोजयिता – भोग प्रदान करणारा

अन्वय –विनष्टदिग्भ्रमस्यापि यथापूर्वं दिक् विभाति तथा विज्ञानविध्वस्तं जगत् मे भाति तत् न हि। देहः न इन्द्रियप्राणः न मनोबुद्धि–अहंकृतिः चित्तं न माया नैव व्योमादिकं

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जगत् च न । कर्ता न भोक्ता च नैव च भोजयिता च न तथा केवलं जनार्दनः चित्–सत् आनन्दब्रह्म एव अहम्

अर्थ– मी (ब्रह्मतत्त्व) देह नाही, इन्द्रिय, प्राण, मन, बुद्धी, अहंकार, चित्त हेही नाही, मी माया नाही, हे आकाशादि जगत् ही मी नाही, मी कर्ता, भोक्ता किंवा भोग देणारा वा घेणाराही नाही. तर मी चित् रूप, सद् रूप असा जनार्दन केवल ब्रह्म आहे. (नेति नेति न्यायाने ब्रह्मस्वरूप येथे वर्णिले आहे.)

वैशिष्ट्य–ब्रह्मज्ञानासाठी 'नेति–नेति' न्यायाचा उपयोग करतात, जे ब्रह्म नाही त्याला 'हे नाही' 'हे नाही' करत जे राहणार ते ब्रह्म असे जाणणे म्हणजे 'नेति नेति' न्याय म्हणतात. येथे इन्द्रियादि सर्व तत्त्व म्हणजे ब्रह्म नव्हे याचे वर्णन केले आहे.

चित्तमेव संसारकारणम्

जलस्य चञ्चलादेव चञ्चलत्वं यथा रवेः।

तथाहंकारसंबन्धादेव संसार आत्मनः।।20।।

संधिविच्छेद –चञ्चलादेव – चञ्चलात् + एव । तथाहंकारसंबन्धादेव– तथा + अहंकार + संबंधात् + एव।

शब्दार्थ –चञ्चलात्– चंचलता/क्रियाशिलता, अहंकारसंबंधात् एव संसारः–अहंकार तत्त्वाशी तादात्म्यामुळे

अन्वय –जलस्य चञ्चलात् एव यथा रवेः चञ्चलत्वं तथा आत्मनः अहंकारसंबन्धात् एव संसारः ।

अर्थ– ज्याप्रमाणे पाण्याच्या तरंगांमुळे प्रतिबिंबित सूर्य (स्थिर असूनही) हेलकावे खात असल्याचे भासीत होते त्याप्रमाणे अहंकार तत्त्वाच्या संपर्कामुळे या ब्रह्मतत्त्वावर (सुखदुःखात्मक) संसाराची कल्पना केली जाते. (संसार हा त्रिगुणात्मक अहंकारामुळे सुखदुःखात्मक भासतो तर ब्रह्मतत्त्व हे निर्गुण आहे.)

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वैशिष्ट्य–सूर्य आकाशात स्थिर असला तरी पाण्यातील तरंगामुळे सूर्याचे प्रतिबिंब हेलकावे खात असल्याचे जाणवते. तद्वत अहंकार तत्त्वाशी संबंध आल्याने प्रतिबिंबत ब्रह्म संसारयुक्त भासतो. '' अहंकार विमूढोऽत्मा कर्ता अहम् इति मन्यते'' (भ.गी.)

चित्तमूलं हि संसारस्तत्प्रयत्नेन शोधयेत् ।
हन्त चित्तमहत्तायां कैषा विश्वासता तव ।।21 ।।

संधिविच्छेद –संसारस्तत्प्रयत्नेन – संसारः + तत् + प्रयत्नेन । कैषा – का + एषा ।

शब्दार्थ –शोधयेत्– शुध्द करावे ।

अन्वय –चित्तमूलं हि संसारः तत् प्रयत्नेन शोधयेत् । हन्त चित्तमहत्तायां तव का एषा विश्वासता ।

अर्थ– हा संसार मनावर आधारित आहे. (संसाराचे मूळ मन आहे) आणि ते मत प्रयत्नाने शुद्ध करावे. अहो मनाच्या महत्त्वावर तुला हा विश्वास कशाला?

वैशिष्ट्य–चित्त शुध्द करण्याचा उपदेश सर्व शास्त्रांनी केला आहे. चित्ताच्या कल्पनेतून विश्वाचे अस्तित्व आहे. चित्तातील अविद्याजन्य मल दूर झाल्यावर चित्त स्फूटिकमण्याप्रमाणे शुध्द होते व त्यात समाधी अवस्थेत स्वरूपाचे प्रतिबिंब जसेच्या तशे प्रतिबिंबीत होते म्हणून ''प्रयत्नेन शोधयेत'' असा उपदेश येथे केला आहे.

क्व धनानि महीपानां ब्राह्मणः क्व जगति
प्राक्तनानि प्रयातानि गताः सर्गपरंपरा ।।22 ।।
कोट्यो ब्राह्मणां याता भूपा नष्टाः परागवत् ।
स चाध्यात्माभिमानोऽपि विदुषोऽप्यासुस्त्वतः ।।23 ।।
विदुषोऽप्यासुरश्चेत् स्यान्निष्फलं तत्त्वदर्शनम् ।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संधिविच्छेद –चाध्यात्माभिमानोऽपि च + अध्यात्म + अभिमानः + अपि । विदुषोऽप्यासुरस्त्वतः – विदुषः + अपि + आसुरः + तु + अतः । विदुषोऽप्यासुरश्चेत – विदुषः + अपि + आसुरः । चेत् । स्यान्निष्फलं – स्यात् + निष्फलं ।

अन्वय –क्व महीपानां धनानि, क्व ब्राह्मणः जगति, प्राक्तनानि प्रयातानि गताः सर्गपरंपरा। ब्राह्मणां कोट्यः भूपाः परागवत् नष्टाः याताः। विदुषः च चाध्यात्माभिमानः अपि सः तु आसुरः अतः विदुषः अपि आसुरः चेत तत्त्वदर्शनं निष्फलं स्यात् ।

अर्थ– महाराजांचे धन, ब्राह्मण (त्यांची विद्वत्तता) या भूतलावर कुठे गेली. (कुठे लोप पावली) कारण हे सर्व आपल्या प्राक्तनानुसार येतात व जातात. हीच या सृष्टीची परंपरा आहे. कोटी ब्राह्मण, राजे या भूतलावर आले आणि परागकणांप्रमाणे नष्ट झाले. विद्वान ज्याला आपल्या आध्यात्मिक ज्ञानाचा अभिमान आहे तो विद्वान असूनही प्रत्यक्ष असूरासमान आहे. त्यामुळे ज्ञानाने विद्वान असूनही अभिमानाने जर तो असूरासमान असेल तर त्याचे संपूर्ण तत्त्वज्ञान हे निष्फल ठरते.

वैशिष्ट्य–अर्जित केलेल्या सर्व उपाधि या संसारातून उत्पन्न होतात व संसारासोबत लय पावतात. जसे पाण्याचे बुडबुडे. मात्र निरुपाधिक तत्त्व तेवढेच शाश्वत व पूर्ण राहते.

अनात्मनि रागाद्यनुभवो विद्वल्लक्षणम्

उत्पाद्यमाना रागाद्या विवेकज्ञानवह्निना।।24।।
यथा तदैव दह्यन्ते कुतस्तेषां प्ररोहणम्।

संधिविच्छेद –तदैव – तदा + एव । कुतस्तेषां – कुतः + तेषां

शब्दार्थ –उत्पाद्यमाना – उत्पन्न होणारे, रागाद्या – राग, लोभ इत्यादि, विवेकज्ञानवह्निता – विवेकरूप ज्ञान अग्नित, दह्यन्ते – जाळून टाकतात,प्ररोहणम् – वरती उठणे

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –यथा विवेकज्ञानवह्निना उत्पाद्यमानाः रागाद्याः दह्यन्ते तदा एव कुतः तेषां प्ररोहणम् ।

अर्थ– (मनात) उत्पन्न होणाऱ्या रागादि भावनांना आपल्या विवेकज्ञानरूपी अग्नीने जशाच्या तशा दग्ध केल्यास पुन्हा त्या प्रभावी होत नाही. (उत्पन्न होत नाही)

वैशिष्ट्य–अंधाराचा नाश करण्याचे सामर्थ्य जसे प्रकाशात आहे तसेच अविद्येचा नाश हा विद्येनेच होता. म्हणून विवेक अग्नित अविद्याजनित तत्त्वांना दग्ध केल्यास त्या दग्धबीजाप्रमाणे पुन्हा संसार निर्मितीला कारणीभूत होत नाहीत.

यथा सुनिपुणः सम्यक् परदोषेक्षणे रतः ।।25।।
तथा चेन्निपुणः स्वेषु को न मुच्येत बन्धनात् ।

संधिविच्छेद –परदोषेक्षणे – परदोष + ईक्षणे । चेन्निपुणः – चेत् + निपुणः

शब्दार्थ –सुनिपुणः – कुशल, रतः – मग्न, स्वेषु – स्वतःमध्ये

अन्वय –यथा परदोष–ईक्षणे सुनिपुणः सम्यक् रतः तथा चमत् स्वेषु निपुणः बन्धनात् कः न मुच्यते ।

अर्थ– ज्याप्रमाणे (आपण) दुसऱ्यांच्या ठिकाणी वर्तमान दोषांना शोधण्यात निपूण असतो, मग्न असतो. त्याप्रमाणे (आपण) स्वतःतील दोष शोधले तर मग कोण बंधनातून मुक्त होऊ शकणार नाही.

वैशिष्ट्य–आपण स्वतःला नेहमी पूर्ण समजतो पण जेव्हा उपाधियुक्त अशा आपल्यातील अपूर्णत्वाचा बोध होतो तेव्हा आपला प्रवास ब्रह्मतत्त्वाकडे (पूर्णत्वाकडे) व्हायला लागतो.

अनात्मविदमुक्तोऽपि सिद्धिजालानि वाञ्छति ।।26।।
द्रव्यमन्त्रक्रियाकालयुक्त्याप्नोति मुनीश्वर ।
नात्मज्ञस्यैष विषय आत्मज्ञो ह्यात्ममात्रदृक् ।।27।।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संधिविच्छेद –अनात्मविदमुक्तोऽपि – अनात्मविद् + अमुक्तः + अपि। द्रव्यमन्त्रक्रियाकालयुक्त्याप्नोति – द्रव्यमन्त्रक्रियाकालयुक्त्या + आप्नोति । मुनीश्वर – मुनि + ईश्वरः । नात्मज्ञस्यैष – न + आत्मज्ञस्य + एष । ह्यात्ममात्रदृक् – हि + आत्ममात्रदृक् ।

शब्दार्थ –अनात्मविद– आत्मतत्त्वाचे ज्ञान नसणारा,वाच्छति – इच्छा करतो, आत्मज्ञ – आत्मज्ञानी

अन्वय –अनात्मविद् अमुक्तोऽपि द्रव्यमन्त्रक्रियाकालयुक्तिसिद्धजालानि वाञ्छति । हे मुनीश्वर ! आत्मज्ञस्य विषयः न, आत्मज्ञः हि आत्ममात्रदृक् (भवति) ।

अर्थ– आत्मतत्त्वाला न जाणणारे द्रव्य, मन्त्र, क्रिया, काव्ययुक्ती इत्यादि सिद्धींची (व त्याद्वारे प्राप्त विषयांची) इच्छा करतात. पण आत्मज्ञानासाठी मात्र (द्रव्यादि सिद्धी) हे इष्ट विषय राहत नाही. तर आत्मज्ञानी हा आत्ममात्र (आत्म्यातच तल्लीन) होऊन राहतो.

वैशिष्ट्य–आत्मज्ञान हे द्रव्य मंत्रादि वर अवलंबून नाही ते सिध्द आहे. ते आत्मस्वरूपाच्या ज्ञानावर अवलंबून आहे.

आत्मनात्मनि संतृप्तो नाविद्यामनुधावति ।
ये केचन जगद्भावास्तानविद्यामयान् विदुः ।।28 ।।
कथं तेषु किलात्मज्ञस्त्यक्ताविद्यो विमज्जति ।

संधिविच्छेद –आत्मनात्मनि – आत्मना + आत्मनि । नाविद्यामनुधावति – न + अविद्याम् + अनुधावति । जगद्भावास्तानविद्यामयान् – जगद्भावाः + तान् + अविद्यामयान् । किलात्मज्ञस्त्यक्ताविद्यो – किल + आत्मज्ञः + त्यक्त + अविद्यः ।

शब्दार्थ –आत्मना – स्वतःला, आम्तनि – स्वतःमध्ये

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –आत्मना आत्मनि संतृप्तः अविद्यां न अनुधावति। ये केचन जगद्भावाः तान् अविद्यामयान् विदुः। आत्मज्ञः त्यक्ताविद्यः किल तेषु कथं विमज्जति।

अर्थ– जो (आत्मज्ञानी) आत्म्याद्वारे आत्म्यातच संतुष्ट राहतो, तो कधी अविद्येमागे (व तत्जन्य विषयांच्या मागे) धावत नाही. या विश्वात जे काही जगतादिभाव विद्यमान आहेत ते अविद्याजन्य आहे असे जाणावे. आत्मज्ञानी व्यक्तीने, जिने अविद्येचा त्याग केला आहे ती पुन्हा कशी काय अविद्याजन्य विषयांमध्ये गुरफटणार?

वैशिष्ट्य–''आत्मना आत्मनि तुष्टः'' असे वर्णन भगवद्गीतेतही केले आहे.

द्रव्यमन्त्रक्रियाकालयुक्तयः साधुसिद्धिदाः।।29।।
परमात्मपदप्राप्तौ नोपकुर्वन्ति कश्चन।
सर्वेच्छाकलनाशान्तावात्मलाभोदयाभिधः।।30।।
स कथं सिद्धिवाञ्छायां कथमर्हत्यचित्तकः।।

संधिविच्छेद –परमात्मपदप्राप्तः – परम + आत्मपदप्राप्तः । नोपकुर्वन्ति – न + उपकुर्वन्ति । काश्चन – काः + चन + । सर्वेच्छाकलनाशान्तावात्मलाभोदयाभिधः – सर्व + ईच्छा + आकलन + अशान्त + आत्मलाभ + उदय + अभिधः । कथमर्हत्यचित्तकः – कथम् + अर्हति + अचित्तकः

शब्दार्थ –सिद्धिदाः – सिद्धिप्राप्त करून देणाऱ्या, नोपकुर्वन्ति – उपयुक्त नाही.

अन्वय –द्रव्य–मन्त्र–क्रिया–कालयुक्तयः साधुसिद्धिदाः परमपदप्रप्तौ काश्चन न उपकुर्वन्ति। सर्वेच्छाकननाशन्तावात्मलाभोदयाभिधः सः सिद्धिवाञ्छायां अचित्तकः कथम् अर्हति ।

अर्थ– द्रव्य, मन्त्र, क्रिया, काल, युक्ती या उत्तम सिद्धी व फल प्राप्त करून देणाऱ्या असल्या तरी परमात्मा पदप्राप्ती करून देण्यात कोणीच सहाय्यक नाही.

वैशिष्ट्य–द्रव्य मन्त्र आदि साधने इहलौकिक व पारलौकिक सिध्दी प्रदान करून देण्यात समर्थ असले तरी आत्मज्ञान प्राप्तीत त्यांचे काहीच योगदान होत नाही.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चतुर्थोऽध्यायः

1. ब्राह्मणम्

सप्तभूमिकासु जीवन्मुक्तिभूमिकाचतुष्टयम्

अथ ह ऋभुं भगवन्तं निदाघः पप्रच्छ जीवन्मुक्तिलक्षणमनुब्रूहीति।।1।। तथेति स होवाच। सप्तभूमिषु जीवन्मुक्ताश्चत्वारः।।2।। शुभेच्छा प्रथमा भूमिका भवति। विचारणा द्वितीया। तनुमानसी तृतीया। सत्त्वापत्तिस्तुरीया। असंसक्तिः पञ्चमी। पदार्थभावना षष्ठी। तुरीयगा सप्तमी।।3।।

संधिविच्छेद –जीवन्मुक्तिलक्षणमनुब्रूहीति – जीवन्मुक्तिलक्षणंम् + अनुब्रूहि + इति । तथेति – तथा + इति । होवाच – ह + उवाच । जीवन्मुक्ताश्चत्वारः – जीवन्मुक्ताः + चत्वारः । सत्त्वापत्तिस्तुरीया– सत्त्व + आपत्तिः + तुरीया

शब्दार्थ –पप्रच्छ –विचारता झाला, चत्त्वारः – चार

अर्थ– त्यानंतर निदाघने भगवान ऋभूला जीवन्मुक्तीचे लक्षण कथन करण्यास सांगितले. (भगवान्) ठीक आहे (असे म्हणाला), त्याने (जीवनमुक्तीचे लक्षण) सांगितले. सप्तभूमिंमध्ये चार भूमि जीवन्मुक्तीप्रदायक आहेत. त्यापैकी शुभेच्छा ही पहिली भूमिका होय. दुसरी विचारणा होय. तनुमानसी ही तिसरी (भूमिका) होय. चतुर्थ भूमिका सत्त्वापत्ति (ही होय) पाचवी भूमिका असंसक्ती होय. सहावी पदार्थभावना होय. सातवी (भूमिका) तुरीयगा होय.।।3।।

वैशिष्ट्य–येथे सप्तज्ञानभूमिंची नावे देण्यात आली आहेत. या भूमी क्रमशः मुक्ती प्राप्त करून देणाऱ्या आहेत.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रणवविकृत्यकारादेः चातुर्विध्यम्

प्रणवात्मिका भूमिकाः अकारोकारमकारार्धमात्रात्मकाः ।।4।।

स्थूलसूक्ष्मबीजसाक्षिभेदेनाकारादयश्चतुर्विधा ।।5।।

संधिविच्छेद – प्रणवात्मिका – प्रणव + आत्मिका । अकारोकारमकारार्धमात्रात्मकाः – अकार + उकारमकार + अर्धमात्रा + आत्मकाः। स्थूलसूक्ष्मबीजसाक्षिभेदेनाकारादय – श्चतुर्विधा – स्थूलसूक्ष्मबीजसाक्षिभेदेन + अकारादयः + चतुर्विधा ।।5।।

अन्वय – अकार–उकार–मकार–अर्धमात्रात्मिकाः प्रणवात्मिकाः भूमिकाः । स्थूल–सूक्ष्म–बीज–साक्षिभेदेन अकारादयः चतुर्विधाः ।

अर्थ– प्रणवात्मिक भूमीका ह्या अकार, उकार, मकार व अर्धमात्रायुक्त आहेत. या अकारादी भूमिका स्थूल, सूक्ष्म, बीज, साक्षी या भेदाने चार प्रकारच्या होतात.

वैशिष्ट्य– येथे ॐ काराच्या मात्रांचे वर्णन केले आहे, तो अकार, उकार, मकार आणि अर्धमात्रायुक्त आहे व त्या स्थूल सूक्ष्म, बीज, साक्षी भेदाने चार प्रकारच्या होतात. प्रणव म्हणजे ''प्रकर्षेण नूयते स्तूयते इति''

अकारस्थूलादीनामध्यक्षाः

तदावस्था जाग्रत्स्वप्नसुषुप्तितुरीयाः ।।6।। अकारस्थूलांशे जाग्रद्विश्वः। सूक्ष्मांशे तत्तैजसः। बीजांशे तत्प्राज्ञः। साक्ष्यंशे तत्तुरीयः ।।7।। उकारस्थूलांशे स्वप्नविश्वः। सूक्ष्मांशे तत्तैजसः। बीजांशे तत्प्राज्ञः। साक्ष्यंशे तत्तुरीयः ।।8।। मकारस्थूलांशे सुषुप्तविश्वः। सूक्ष्मांशे तत्तुरीयः ।।9।। अर्धमात्र। स्थूलांशे तुरीयविश्वः। सूक्ष्मांशे तत्तैजसः। बीजांशे तत्प्राज्ञः। साक्ष्यंशे तुरीयतुरीयः ।।10।।

संधिविच्छेद – तदावस्था – तत् + अवस्था । जाग्रद्विश्वः – जाग्रत् + विश्वः । सूक्ष्मांशे – सूक्ष्म + अंशे । तत्तैजसः – तत् + तैजसः । बीजांशे – बीज + अंशे । साक्ष्यंशे – साक्षि + अंशे । स्थूलांशे – स्थूल + अंशे ।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मात्रा	स्थुल	सूक्ष्म	बीज	साक्षी
अकार	जाग्रत/विश्व	तैजस	प्राज्ञ	तुरीय
उकार	स्वप्न/विश्व	तैजस	प्राज्ञ	तुरीय
मकार	सुषुप्ती/विश्व	तैजस	प्राज्ञ	तुरीय
अर्धमात्र	तुरीय/विश्व	तैजस	प्राज्ञ	तुरीय

अर्थ– त्यांच्या जाग्रत, स्वप्न, सुषुप्ती आणि तुरीया या अवस्था होत.

अकारभूमीच्या स्थूलांशात जागृतावस्थेत विश्व राहते, सूक्ष्मांशात तैजस् राहते. बीजांशात प्राज्ञ, साक्ष्यांशात तुरीयचैतन्य राहते.

उकार मात्रेच्या स्थूलांशात विश्व स्वप्नावस्थेत राहते. सूक्ष्मांशात तैजस्तत्त्व, बीजांशात् प्राज्ञ, साक्ष्यांशात तुरीयचैतन्य राहते.

मकारमात्रेच्या स्थूलांशात विश्व सुषुप्तावस्थेत राहते, सूक्ष्मांशांत तैजस्, बीजांशात प्राज्ञ, साक्ष्यांशात तुरीय चैतन्य राहते.

अर्धमात्रेच्या स्थूलांशात विश्व तुरीयावस्थेत राहते. सूक्ष्मांशात तैजस्, बीजांशात प्राज्ञ, साक्ष्यांशात तुरीय तुरीय राहते.

वैशिष्ट्य–येथे प्रणवाच्या मात्रा व त्यांची स्थूल सूक्ष्मादी अवस्थामध्ये कोणकोणते तत्त्व राहतात याचे विवेचन केले आहे.

प्रणवावयवशः भूमिकाभेदाः

अकारादितुरीयांशाः प्रथमद्वितीयतृतीयभूमिकाः। उकारतुरीयांशाः चतुर्थी भूमिका। मकारतुरीयांशाः पञ्चमी। अर्धमात्राप्रविभक्तप्रथमद्वितीयतृतीयांशाः षष्ठी भूमिका। तदतीता सप्तमी भूमिका।।11।

संधिविच्छेद –अकारादितुरीयांशाः – अकार + आदितुरीय + अंशाः ।

तदतीता – तत् + अतीता।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शब्दार्थ –तुरीयांशाः – चवथा भाग प्रविभक्त – वेगळे करून
तदतीता – त्यापेक्षा वेगळी, त्याच्या परे असलेली

अर्थ– अकारादि मात्रांच्या चार अंशाने प्रथम, द्वितीय आणि तृतीय भूमिका होतात. उकाराच्या चार अंशाने युक्त चतुर्थ भूमिका होय. मकाराच्या चार अंशाने पाचवी भूमिका होते. अर्धमात्रेचा पहिला, दुसरा, तिसरा अंश वेगळा केल्यास सहावी भूमिका होते व या सर्वांच्या परे सातवी भूमिका आहे.

वैशिष्ट्य–अकारादी मात्रेचे चार अंश – प्रथम, द्वितीय, तृतीय भूमिका
उकारादी मात्रेचे चार अंश – चतुर्थ भूमिका
मकारादी मात्रेचे चार अंश – पाचवी भूमिका
अर्धमात्रेचा पहिला + दुसरा + तिसरा अंश – सहावी भूमिका
या सर्वांच्या परे असलेली – सातवी भूमिका

चतुर्विधाः जीवन्मुक्ताः ।

भूमित्रयेषु विहरन् मुमुक्षुर्भवति । तुरीयभूम्यां विहरन् ब्रह्मविद्भवति । पञ्चभूम्यां विहरन् ब्रह्मविद्वरो भवति । षष्ठभूम्यां विहरन् ब्रह्मविद्वरीयान् भवति । सप्तमभूम्यां विहरन् ब्रह्मविद्वरिष्ठो भवति ।।12 ।।

संधिविच्छेद –मुमुक्षुर्भवति– मुमुक्षः + भवति । ब्रह्मविद्वरिष्ठो – ब्रह्मविद् + वरिष्ठः

शब्दार्थ –विहरन् – विचरण करणारा
मुमुक्षु – मोक्षाची इच्छा असणारा
ब्रह्मविद् – ब्रह्माचा जाणकार
ब्रह्मविद्वरो – ब्रह्माच्या जाणकारातील ज्ञाता
ब्रह्मविद्वरीयान्– ब्रह्मज्ञानींमध्ये उत्तमज्ञाता
ब्रह्मविद्वरिष्ठो – ब्रह्मज्ञानीमध्ये सर्वश्रेष्ठ

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ– पहिल्या तीन भूमिंमध्ये राहणारा मुमुक्षु होतो. चतुर्थ भूमित राहणारा ब्रह्मविद् होतो. पाचव्या भूमित विहरणारा ब्रह्मविद्वर होतो. सहाव्या भूमित राहणारा ब्रह्मविद्वरीयान होतो. सातव्या भूमित राहणारा ब्रह्मविद्वरिष्ठ होतो.

वैशिष्ट्य –प्रथम + द्वितीय + तृतीय भूमिकेत राहणारा – मुमुक्षु
चतुर्थ भूमिकेत राहणारा – ब्रह्मविद्
पाचव्या भूमिकेत राहणारा – ब्रह्मविद्वर
सहाव्या भूमिकेत राहणारा – ब्रह्मविद्वरीयान्
सातव्या भूमिकेत राहणारा – ब्रह्मविद्वरिष्ठ

2 – मन्त्र

सप्तभूमिकानिर्देशः।

ज्ञानभूमिः शुभेच्छा स्यात् प्रथमा समुदीरिता।
विचारणा द्वितीया तु तृतीया तनुमानसी।।1।।
सत्त्वापत्तिश्चतुर्थी स्यात् ततोऽसंसक्तिनामिका।
पदार्थभावना षष्ठी सप्तमी तुर्यगा स्मृता।।2।।

संधिविच्छेद –समुदीरिता – सम् + उदीरिता । सत्त्वापत्तिश्चतुर्थी – सत्त्व + आपत्तिः + चतुर्थी । ततोऽसंसक्तिनामिका– ततः + असंसक्तिनामिका।

शब्दार्थ –समुदीरिता – सांगितली आहे. स्मृता – जाणल्या गेली आहे.

अन्वय –शुभेच्छा प्रथमा ज्ञानभूमिः स्थात्, विचारणा द्वितीया, तनुमानसी तु तृतीया समुदीरिता। सत्त्वापत्तिः चतुर्थी स्यात् ततः असंसक्तिनामिका, पदार्थभावना षष्ठी सप्तमी तुर्यगा स्मृता।

अर्थ– शुभेच्छा ही प्रथम ज्ञानभूमी सांगितली आहे. दुसरी विचारणा तर तिसरी तनुमानसी होय. चवथी सत्त्वापत्ती, तर असंसक्ति नावाची पाचवी होय. पदार्थभावना सहावी तर तुर्यगा सातवी सांगितली जाते.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वैशिष्ट्य—सप्तज्ञानभूमिका

भूमिका	नाव
प्रथम	शुभेच्छा
द्वितीय	विचारणा
तृतीय	तनुमानसी
चतुर्थ	सत्त्वापत्ती
पंचम	असंसक्ती
षष्ठ	पदार्थभावना
सप्तम	तुर्यगा

सप्तभूमिकाविवरणम्

स्थितः किं मूढ एवास्मि प्रेक्ष्योऽहं शास्त्रसज्जनैः
वैराग्यपूर्वमिच्छेति शुभेच्छेत्युच्यते बुधैः ।।3।।

संधिविच्छेद —एवास्मि – एव + अस्मि । प्रेक्ष्योऽहं – प्र + ईक्ष्यः + अहं ।वैराग्यपूर्वमिच्छेति – वैराग्यपूर्वम् + इच्छा + इति । शुभेच्छेत्युच्यते – शुभेच्छा + इति + उच्यते ।

शब्दार्थ —स्थितः – राहिलेला, मूढ– मूर्ख, प्रेक्ष्य – बघत, उच्यते – म्हणतात, बुधै – विद्वानांनी

अन्वय —अहं किं मूढः एव स्थितः अस्मि, शास्त्रसज्जनै (अहं) प्रेक्ष्यः वैराग्यपूर्वम् इच्छा इति शुभेच्छा इति बुधैः उच्यते ।

अर्थ— मी मूर्खाप्रमाणे असाच राहिलो. शास्त्र आणि सज्जनांनी माझ्यावर दृष्टीपात करावा अशी वैराग्यपूर्वक इच्छा 'शुभेच्छा' म्हटली जाते.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वैशिष्ट्य–या प्रथम ज्ञानभूमिकेत साधकाला आतापर्यंत आपण जीवन व्यर्थ घालवले आहे याची जाणीव होऊन वैराग्याचे प्रथम बीज त्याच्या चित्तात रोवले जाते व पुढील साधना प्रवासाचा आरंभ करण्यास त्याची इच्छा जागृत होते म्हणून या भूमिकेला 'शुभ+इच्छा' शुभेच्छा असे म्हणतात.

शास्त्रसज्जनसंपर्कवैरागाभ्यासपूर्वकम् ।
सदाचारप्रवृत्तिर्या प्रोच्यते सा विचारणा ।।4।।

संधिविच्छेद –शास्त्रसज्जनसंपर्कवैरागाभ्यासपूर्वकम् – शास्त्र + सज्जनसंपर्क + वैराग + अभ्यासपूर्वकम् । सदाचारप्रवृत्तिर्या – सदाचारप्रवृत्तिः + या । प्रोच्यते – प्र + उच्यते ।

शब्दार्थ –वैरागाभ्यासपूर्वकम् – वैराग्याच्या अभ्यासाने युक्त, प्रोच्यते – सांगितल्या जाते.

अन्वय – शास्त्रसज्जनसंपर्कवैरागाभ्यासपूर्वकं या सदाचारप्रवृत्तिः सा विचारणा(भूमिका) उच्यते ।

अर्थ– शास्त्रांचे परिशीलन, संतसमागम आणि वैराग्याच्या अभ्यासाने युक्त अशी जी सदाचाराची प्रवृत्ती उत्पन्न होते, त्या स्थितीलाच विचारणा भूमिका म्हणतात. (विचारणाभूमीत इच्छेचे क्रियेत रूपांतर होते)

वैशिष्ट्य–वैराग्याचे बीज ज्याच्या मनात रूजायला लागले आहे, अशा साधकात शास्त्र अध्ययनाने, सतसंगतीने व वैराग्याने सदाचाराची प्रवृत्ती विकसित होते. हीच दुसरी विचारणा नावाची ज्ञानभूमी होय. यात ईच्छा तीव्र होत जाऊन साधना क्रियेत तो प्रवृत्त होतो.

विचारणाशुभेच्छाभ्यामिन्द्रियार्थेषु रक्तता ।
यत्र सा तनुतामेति प्रोच्यते तनुमानसी ।।5।।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संधिविच्छेद –विचारणाशुभेच्छाभ्यामिन्द्रियार्थेषु – विचारणाशुभेच्छाभ्याम् + इन्द्रिय + अर्थेषु । तनुतामेति – तनुताम् + एति । प्रोच्यते – प्र + उच्यते।

शब्दार्थ –इन्द्रियार्थेषु– इन्द्रियांच्या विषयांमध्ये, यत्र – जेथे, तनुताम – कृश होणे, एति – होते.

अन्वय –विचारणाशुभेच्छाभ्याम् इन्द्रियार्थेषु रक्तता (भवति)। सा (रक्तता) यत्र तनुताम् एति(सा) तनुमानसी प्रोच्यते।

अर्थ– विचारणा आणि शुभेच्छा या भूमिंद्वारे इन्द्रियांच्या विषयांमध्ये आसक्ती राहते. जिथे हीआसक्ती कृश व्हायला लागते तीच तनुमानसी भूमी होय.

वैशिष्ट्य–प्रथम व द्वितीय ज्ञानभूमीत साधकाला साधनेची इच्छा उत्पन्न होते व तो त्याप्रती क्रियाशीलही होतो तरी त्यच्यातील इन्द्रिय व इन्द्रियांच्या विषयातील आसक्ती कमी झाली नसते. जेव्हा ती आसक्ती तनु म्हणजे कृश/क्षीण व्हायला लागते ती तीसरी ज्ञानभूमी तनुमानसी म्हणविल्या जाते.

भूमिकात्रितयाभ्यासाच्चित्तेऽर्थविरतेर्वशात् ।
सत्त्वात्मनि स्थिते शुद्धे सत्त्वापत्तिरुदाहृता ।।6।।

संधिविच्छेद –भूमिकात्रितयाभ्यासाच्चित्तेऽर्थविरतेर्वशात् – भूमिकात्रितय + अभ्यासात् + चित्ते + अर्थविरतेः + वशात् । सत्त्वात्मनि – सत्त्व + आत्मनि। सत्त्वापत्तिरुदाहृता – सत्त्व + आपत्तिः + उदाहृता।

शब्दार्थ –भूमिकात्रितयाभ्यासात् – प्रथम तीन भूमिकांच्या अभ्यासाने, चित्तेऽर्थविरते – चित्तातील विषयासक्ती विरम पावल्याने, उदाहृता– सांगितली आहे.

अन्वय – भूमिकात्रितयाभ्यासात् चित्ते अर्थविरतेः वशात् शुद्धे सत्त्वात्मनि स्थिते सत्त्वापत्तिः उदाहृता।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ– (पहिल्या) तीन भूमिकांच्या अभ्यासाने चित्तामध्ये विषयांबाबत अनासक्त भाव निर्माण झाल्यावर शुद्ध, अशा आत्मस्वरूपात स्थित राहणे याच अवस्थेला सत्त्वापत्ती भूमिका म्हणतात.

वैशिष्ट्य–प्रथम तीन भूमिकांचा अभ्यास दृढ झाल्याने साधकाच्या मनातील विषयासक्ती दूर होऊन सत्त्वाचा उदय व्हायला लागतो म्हणून चतुर्थ ज्ञानभूमिला सत्त्व + आपत्ति सत्त्वापत्ति असे नाव आहे.

दशाचतुष्टयाभ्यासादसंसर्गफला तु या।
रूढसत्त्वचमत्कारा प्रोक्तासंसक्तिनामिका।।17।।

संधिविच्छेद –दशाचतुष्टयाभ्यासादसंसर्गफला – दशाचतुष्टय + अभ्यासाद् + असंसर्गफला । प्रोक्तासंसक्तिनामिका – प्रोक्ता + असंसक्तिनामिका।

शब्दार्थ –असंसर्गफल – फळाबाबत निरासक्त, रूढसत्त्वचमत्कार – सत्त्वगुणाच्या उदयाने निश्चित रूपाने प्राप्त होणाऱ्या सिध्दी, प्रोक्ता – सांगितल्या आहेत.

अन्वय –दशाचतुष्टयाभ्यासाद् या तु संसर्गफला रूढसत्त्वचमत्कारा(सा) असंसक्तिनामिका (इति) प्रोक्ता ।

अर्थ– (पहिल्या) चार भूमिंच्या अभ्यासाने फलाविषयी जी असंगता निर्माण होते व रूढसत्त्वचमत्कार अर्थात् नुसत्या संकल्पस्फुरणाने घटना घडून येतात ती असंसक्ती नामक भूमिका होय.

वैशिष्ट्य–चवथ्या भूमिचा अभ्यास दृढझाल्याने या साधकात केवळ विषयवैराग्यच नाही तर फळाबाबतचेही पूर्ण वैराग्य (निरासक्ती) उत्पन्न होते व सत्त्वगुणाच्या उत्कर्षाने संकल्पस्फुरणाने सिध्दता प्राप्त होते असे असूनही तो त्यात असंसक्त म्हणजे निरासक्त असतो म्हणून पाचव्या भूमिला असंसक्ती म्हणतात.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भूमिकापञ्चकाभ्यासात् स्वात्मारमतयाभृशम् ।
आभ्यन्तराणां बाह्यानां पदार्थानामभावनात् ।।8।।
परयुक्तेन चिरं प्रयत्नेनावबोधनम् ।
पदार्थभावना नाम षष्ठी भवति भूमिका ।।9।।

संधिविच्छेद –भूमिकापञ्चकाभ्यासात् – भूमिकापञ्चका + अभ्यासात् । स्वात्मारमतया – स्व + आत्मारमतया । पदार्थानामभावनात् – पदार्थानाम् + अभावनात् । प्रयत्नेनावबोधनम् – प्रयत्नेन + अवबोधनम् ।

शब्दार्थ –भृशम् – खूप, पुष्कळ, आभ्यन्तराणाम् – आतील

अन्वय –भूमिकापञ्चकाभ्यासात् भृशं स्वात्मारमतया आभ्यन्तराणां बाह्यानां पदार्थानाम् अभावनात्। परयुक्तेन प्रयत्नेन चिरम् अवबोधनम् (एषा) पदार्थभावना भूमिका नाम षष्ठी (भूमिका) भवति ।

अर्थ–(पहिल्या) पाच भूमिकांच्या अभ्यासाने पूर्णतः स्वात्मरूपात रममाण झाल्याने जो आंतरीक पदार्थांच्या वा बाह्यपदार्थांच्या (व्यावहारिक) भावनेतून मुक्त राहतो, क्वचित् प्रसंगी अन्य पदार्थांशी युक्त झाल्यास प्रयत्नपूर्वक पुन्हा बोधावस्था प्राप्त करतो/अन्तर्मुखता प्राप्त करतो ती पदार्थभावना नावाची सहावी भूमिका होय.

वैशिष्टय–प्रथम पाचही भूमिकांचा अभ्यास दृढतर झाल्याने साधक अंःतस्थ व बहिःस्य सर्व विषयांपासून अनासक्त होतो व स्वरूपात लीन राहतो. व्युत्थानात जर पदार्थांशी संपर्क आला तरी तो त्यातून प्रयत्नपूर्वक दूर होऊन परमतत्त्वावरच आपले ध्यान केंद्रित करतो. त्याची ही (अंतरस्थ व बहिरस्थ) पदार्थ भावना पूर्ण क्षीण होते. ती आत केवळ पदावर केंद्रित होत नाही तर तो त्याच्या आतील अर्थावर केंद्रित होतो. पद + अर्थ + भावना – पदार्थभावना

भूमिषट्कचिराभ्यासाद्भेदस्यानुपलम्भनात् ।
यत्स्वभावैकनिष्ठत्वं सा ज्ञेया तुर्यगा गतिः ।।10।।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संधिविच्छेद –भूमिषट्कचिराभ्यासाद् – भूमिषट्कचिर + अभ्यासाद्। भेदस्यानुपलम्भनात् – भेदस्य + अनुपलम्भनात् । यत्स्वभावैकनिष्ठत्वं – यत् + स्वभाव + एकनिष्ठत्वं।

शब्दार्थ –भूमिषट्कचिराभ्यासात् – सहाही भूमिंचा निरंतर अभ्यास केल्याने, स्वभावैकनिष्ठत्वं – स्वरूपात एकनिष्ठ राहणे, ज्ञेया – जाणल्या गेली

अन्वय –भूमिषट्कचिराभ्यासाद् भेदस्य अनुपलम्भनात् यत् स्वभावैकनिष्ठत्वं सा तुर्यगा गतिः ज्ञेया।

अर्थ– सहाही भूमिकांचा निरंतर अभ्यास केल्याने व तो सिद्ध झाल्याने आपल्या स्वरूपात एकनिष्ठ राहणे, हीच तुर्यगा नावाची भूमिका जाणली गेली आहे.

वैशिष्ट्य–सहाही भूमिंच्या निरंतर अभ्यासाने साधकाच्या द्वैतदृष्टिचा लोप होऊन तो स्वरूपात एकरूपत्व प्राप्त करतो. अद्वैतानुभूतीचा तो अधिकारी होतो. हीच तुर्यगा – 'तुर्य' म्हणजे सर्व अवस्थांच्या परे असलेल्या भूमित 'गा' गमन करतो म्हणून या भूमिला तुर्यगा म्हणतात.

सप्तभूमिकासु बद्धयवस्थाभेदनिरूपणम्

शुभेच्छादित्रयं भूमिभेदाभेदयुतं स्मृतम्।
यथावद्वेद बुद्धयेदं जगज्जाग्रति दृश्यते।।11।।

संधिविच्छेद –शुभेच्छादित्रयं – शुभेच्छा + आदित्रयं। भूमिभेदाभेदयुतं – भूमिभेदा + अभेदयुतं। यथावद्वेद – यथावत् + वेद । बुद्धयेदं – बुद्धया + इदं । जगज्जाग्रति – जगत् + जाग्रति।

शब्दार्थ – भेदाभेदयुते–भेद–अभेदाचे ज्ञान असलेली, यथावद् – जसे,जाग्रति– जाग्रतावस्थेत, दृश्यते – दिसते

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –शुभेच्छादि भूमित्रयं भेद–अभेदयुतं स्मृतम्। जाग्रति जगत्दृश्यते यथावत् बुद्ध्या इदं वेद।

अर्थ–पहिल्या तीन शुभेच्छादि भूमिका या भेद–अभेदाच्या ज्ञानाने युक्त असतात असे मानल्या गेले आहे. (या भूमिंमध्ये) जाग्रतावस्थेत जसे जगत् प्रतीत होते त्याप्रमाणेच बुद्धीद्वारे तसे ते जाणले जाते.

वैशिष्ट्य–प्रारंभिक तीन अवस्थेत साधकाची दृष्टी ही व्यावहारीक राहते. जे बुध्दीला जाणल्या जाते तेच व्यावहारीक जगत त्याच्या ज्ञानाचा विषय होतो. त्याच्या पारमार्थिक दृष्टीचा विकास अजून झालेला नसतो. द्वैत व अद्वैताचे संमिश्रीत ज्ञान तो घेत असतो.

अद्वैते स्थैर्यमायाति द्वैते च प्रशमं गते।
पश्यन्ति स्वप्नवल्लोकं तुर्यभूमिसुयोगतः।।12।।

संधिविच्छेद –स्थैर्यमायाति – स्थैर्यम् + आयाति। स्वप्नवल्लोकं – स्वप्नवत् + लोकं

शब्दार्थ –अद्वैते – अद्वैतात, स्थैर्यं – स्थिरता,आयाति – आल्यावर, तुर्यभूमि – चवथ्या भूमिमुळे, प्रशयं – विरम झाल्याने, स्वप्नवल्लोकं – स्वप्नाप्रमाणे जगत्

अन्वय –अद्वैते स्थैर्यम् आयाति द्वैते च प्रशमं गते। तुर्यभूमिसुयोगतः लोकं स्वप्नवत् पश्यन्ति।

अर्थ–चवथ्या (सत्त्वापत्ती) भूमीच्या योगाने (साधकाच्या ठिकाणी) जेव्हा द्वैताचे ज्ञान लीन होते व अद्वैतज्ञान दृढ व्हायला लागते तेव्हा तो जगताला स्वप्नाप्रमाणे मिथ्या पहायला लागतो.

वैशिष्ट्य–चतुर्थ भूमित प्रविष्ट झालेल्या साधकाची द्वैतबुध्दी लयाला जाऊन अद्वैत दृष्टी विकसित होते. प्रथम तीन भूमित त्याला सर्व पदार्थ जाग्रतावस्थेप्रमाणे सत्य वाटतात मात्र चवथ्या भूमित त्याला हे विषय स्वप्नाप्रमाणे मिथ्या असल्याचा अनुभव येतो.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विच्छिन्नशरदभ्रांशविलयं प्रविलीयते।

सत्त्वावशेष एवास्ते हे निदाघ दृढीकुरु।।13।।

संधिविच्छेद –विच्छिन्नशरदभ्रांशविलयं – विच्छिन्नशरद + अभ्र + अंशविलयं । सत्त्वावशेष – सत्त्व + अवशेष । एवास्ते – एव + आस्ते।

शब्दार्थ –शरदभ्रांशविलयं – शरदऋतुतील ढगांप्रमाणे विलय प्राप्त होणे, सत्त्वावशेष – केवळ सत्त्व अवशिष्ट राहते,निदाघ– निष्पाप

अन्वय –हे निदाघ ! विच्छिन्नशरद् अभ्रांशविलयं प्रविलीयते सत्त्वावशेष एव आस्ते (तत्) दृढीकुरु।

अर्थ – हे निदाघ, ज्याप्रमाणे शरदऋतुमध्ये विखुरलेले मेघाचे अंश सुद्धा पूर्णतः लीन होतात त्याप्रमाणे केवळ सत्त्वमात्र अशी ही भूमी आहे, हे पक्के जाण.

वैशिष्ट्य–शरद ऋतुत आकाश निरभ्र असते. त्याप्रमाणे या भूमित विषयरूपी ढग साधकाच्या चित्ताकाशातून पूर्णपणे लीन होतात व चित्तशुध्द होते.

पञ्चभूमिं समारुह्य सुषुप्तिपदनामिकाम्।

शान्ताशेषविशेषांशस्तिष्ठत्यद्वैतमात्रके।।14।।

संधिविच्छेद –शान्ताशेषविशेषांशस्तिष्ठत्यद्वैतमात्रके –शान्त + अशेषविशेष + अंशः + तिष्ठति + अद्वैतमात्रके।

शब्दार्थ –समारुह्य – आरूढ होऊन

अन्वय –सुषुप्तिपदनामिकां पञ्चभूमिं समारुह्य शान्त–अशेष–विशेषांशः अद्वैतमात्रके तिष्ठति ।

अर्थ– सुषुप्ती अवस्थेपर्यंत घेऊन जाणाऱ्या पाचव्या (असंसक्ती नावाच्या) भूमीवर आरूढझाल्यावर (साधक) शांत, पूर्णरूप आणि वैशिष्ट्यपूर्ण अशा अद्वैतमात्र रूपात स्थित होतो.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वैशिष्ट्य–ज्याप्रमाणे सुषुप्ती अवस्थेत जीव स्वरूपात लीन असतो त्यास जाग्रत–स्वप्न इ. अवस्थांचे भानही उरत नाही तद्वत् पाचव्या ज्ञानभूमित साधक अद्वैतात पूर्ण लीन झाला असतो.

अन्तर्मुखतया नित्यं बहिर्वृत्तिपरोऽपि सन् ।
परिश्रान्ततया नित्यं निद्रालुरिव लक्ष्यते ।।15 ।।

संधिविच्छेद –बहिर्वृत्तिपरोऽपि –बहिः + वृत्तिपरः + अपि । निद्रालुरिव –निद्रालुः + इव ।

शब्दार्थ –अन्तर्मुखतया – अन्तर्मुख झाल्याने, परिश्रान्ततया – अत्यंत थकलेल्याने, लक्ष्यते – दिसतो

अन्वय –अन्तर्मुखतया नित्यं बहिर्वृत्तिपरः अपि सन् परिश्रान्ततया नित्यं निद्रालुः इव लक्ष्यते ।

अर्थ – (साधकाचे) चित्त अंतर्मुख आत्मस्थित असल्याने, बाह्यतः तो जगद्व्यवहार करीत असल्याचे दिसले तरी अत्यंत थकलेला मनुष्य जसा गाढ निद्रेत असतो त्याप्रमाणे तो साधक आपले व्यवहार अद्वैतभानानेच करतो.

वैशिष्ट्य–परिश्रमाने दमलेल्या व झोपेत असलेल्या व्यक्तीकडून घडणारे व्यवहार झोपेतच घडतात. तद्वत पूर्णतः अन्तमुर्ख असलेला साधक जरी बाह्य व्यवहार करीत असल्याचे दिसत असेल तरी त्याची अन्तर्मुखता ढळत नाही. ''बोले चाले हिंडे परि समाधी न खंडे'' अशी त्याची अवस्था असते.

कुर्वन्नभ्यासमेतस्यां भूम्यां सम्यग्विवासनः ।
सप्तमी गूढसुप्त्याख्या क्रमप्राप्ता पुरातना ।।16 ।।
यत्र नासान्न सद्रूपो नाहं नाप्यनहंकृतिः ।
केवलं क्षीणमनन आस्तेऽद्वैतेऽतिनिर्भयः ।।17 ।।

संधिविच्छेद –कुर्वन्नभ्यासमेतस्यां – कुर्वन् + अभ्यासम् + एतस्यां । सम्यग्विवासनः – सम्यक् + विवासनः । गूढसुप्त्याख्या – गूढसुप्ति + आख्या । नासान्न – न +

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असत् + न । सद्रूपो – सत् + रूपः । नाप्यनहंकृतिः – न + अपि + अनहंकृतिः । आस्तेऽद्वैतेऽतिनिर्भयः – आस्ते + अद्वैते + अतिनिर्भयः।

अन्वय –विवासनः एतस्यां भूम्यां सम्यक् अभ्यासं कुर्वन् गूढसुप्त्याख्या पुरातना सप्तमी क्रमप्राप्ता । यत्र असत् न सत् रूपः न अपि न अनहंकृतिः अपि न, केवलं अद्वैते क्षीणमनने अतिनिर्भयः आस्ते।

अर्थ– (आधीच्या सर्व) भूमिंना चांगल्याप्रकारे पार करणाऱ्या (साधकाने) (सहाव्या भूमिमध्ये) भूमीमध्ये दृढता प्राप्त करण्याचा अभ्यास करीत राहिल्यास (त्याला) प्राचीन, गूढ, सुप्त आणि क्रमाने येणारी सातवी भूमी (प्राप्त होते).

जिथे असत् राहत नाही, सत् राहत नाही, अहं नाही वा अहंकार नाही. केवळ अद्वैताचे नाममात्र मनन अत्यंत निर्भयतेने चालू राहते.

वैशिष्ट्य–सातवी भूमि ही सर्व भूमिंपेक्षा वेगळी आहे कारण यात अहं–इदं भाव नाही सर्वत्र अद्वैताच्या अनुभूतीचे साम्राज्य आहे. साधक या भूमीद्वारे अभयात प्रवेश करतो त्यामुळे त्यासाठी भयाचे अस्तित्वच राहत नाही.

केवलब्रह्मात्मभावनाविधिः।

अन्तःशून्यो बहिःशून्य शून्यकुम्भ इवाम्बरे।
अन्तपूर्णो बहिःपूर्णः पूर्णकुम्भ इवार्णवे।।18।।

संधिविच्छेद –इवाम्बरे – इव + अम्बरे । इवार्णवे – इव + अर्णवे।

शब्दार्थ –अन्तःशून्य – आतमध्ये रिक्त, बहिःशून्य – बाहेरही रिक्त, अन्तपूर्णो – आत परिपूर्ण, बहिःपूर्णः – बाहेरही परिपूर्ण, पूर्णकुम्भः – पूर्ण काठोकाठ भरलेल्या घराप्रमाणे, अर्णवे – सागरात

अन्वय –शून्यकुम्भ अम्बरे इव (साधकः) अन्तःशून्यो बहिःशून्य, पूर्णकुम्भ अर्णवे इव (साधकः) अन्तपूर्णो बहिःपूर्णः (भवति)

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ – घटाची उपाधी नष्ट होताच घटाकाश जसे महाकाशात शून्यरूपाने राहते तसेच साधक अर्न्तमुखात शून्यता व बहिर्मुखात शून्यता (अनुभवतो) समुद्रात टाकल्यावर घट जसा (जलाने) परिपूर्ण होतो तसेच साधक अन्तर्मुख परिपूर्ण व बर्हिमुख परिपूर्ण (राहतो).

वैशिष्ट्य–घट आकाशात असतांना घटाच्या आत व बाहेर आकाश असते तरी तो रिक्त असतो उलट समुद्रात घट असेल तर घटाच्या आत पाणी व घटही पाण्यातच असतो. अन्तर्बाह्य तो पाण्याने पूर्ण असतो तस ब्रह्मज्ञानी आत व बाहेर सर्व बाजूंनी ब्रह्ममयतेचा अनुभव घेतो.

मा भव ग्राह्यभावात्मा ग्राहकात्मा च मा भव।
भावनामखिलां त्यक्त्वा यच्छिष्टं तन्मयो भव।।19।।

संधिविच्छेद –ग्राह्यभावात्मा – ग्राह्यभाव + आत्मा । ग्राहकात्मा – ग्राहक + आत्मा । भावनामखिलां – भावनाम् + अखिलां । यच्छिष्टं – यत् + शिष्टं । तन्मयो – तत् + मयः ।

शब्दार्थ –मा भव – होऊ नको,ग्राहकाला – ग्रहण करणारा,भावनामखिलां – सर्व प्रकाराच्या भावना, यच्छिष्टं– जे उरले आहे ते.

अन्वय –ग्राह्यभावात्मा मा भव, ग्राहकात्मा च मा भव। अखिलां भावनां त्यक्त्वा यत् शिष्टं तन्मयः भव।

अर्थ – ग्राह्य पदार्थांना जाणणारा होऊ नकोस, ग्राहकालाही जाणणारा होऊ नकोस. सर्व भावनांचा त्याग केल्यावर जे अवशिष्ट राहते त्या (चैतन्याशी) माझ्याशी एकरूप हो.

वैशिष्ट्य–ग्राह्य–ग्रहणयांच्या परेअसलेल्या चैतन्य तत्त्वाशी म्हणजे परमात्म्याशीच एकरूप हो असा उपदेश येथे केला आहे.

द्रष्टृदर्शनदृश्यानि त्यक्त्वा वासनया सह।
दर्शनप्रथमाभासमात्मानं केवलं भज।।20।।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संधिविच्छेद –दर्शनप्रथमाभासमात्मानं – दर्शनप्रथम + आभासम् + आत्मानं ।

शब्दार्थ –द्रष्टृः – पहाणारा, दर्शन – ज्याद्वारे पाहिल्या जाते, दृश्य – पहाण्यासयोग्य, वासनया – संस्कारांनी

अन्वय –द्रष्टु–दर्शन–दृश्यानि वासनया सह त्यक्त्वा केवलं दर्शनप्रथमाभासम् आत्मानंभज।

अर्थ – द्रष्टा, दर्शन, दृश्य या सर्वांचा वासनेसह (त्यांच्या संस्कारांसह त्याग करून) ह्या सर्वांच्या अस्तित्वाला प्रकाशित करणाऱ्या त्या आत्मतत्त्वाचे चिंतन कर.

वैशिष्ट्य–द्रष्टा, दर्शन, दृश्य किंवा आधिच्या श्लोकाप्रमाणे ग्रहिता, ग्रहण व ग्राह्य या त्रिपुटींना सोडून केवळ शुध्द आत्मतत्त्वाचेच चिंतन करावे.

जीवन्मुक्तलक्षणम्

यथास्थितमिदं यस्य व्यवहारवतोऽपि च।
अस्तंगतं स्थितं व्योम स जीवन्मुक्त उच्यते।।21।।

संधिविच्छेद –यथास्थितमिदं – यथास्थितम् + इदं ।व्यवहारवतोऽपि – व्यवहारवतः + अपि ।जीवन्मुक्त – जीवत् + मुक्तः ।

शब्दार्थ – अस्तंगतं – मावळलेले, व्योम – आकाश, जीवनमुक्त – जीवन जगतांनाच मुक्त होणे

अन्वय –यस्य व्यवहारवतः अपि यथास्थितम् इदं अस्तंगतं व्योम स्थितं सः जीवनमुक्तः उच्यते।

अर्थ – हा सर्व व्यवहार पूर्ववत् चालू असतांनाही हे जग ज्याला नाहीसे वाटते आणि जो आकाशाप्रमाणे राहतो तो जीवन्मुक्त म्हटला जातो.

वैशिष्ट्य–जगाचा व्यवहार जसाच्या तसा चालु राहतो पण ब्रह्मज्ञानी झालेल्या साधकाला मात्र तो संसार अंस्तगत झाल्याप्रमाणे जाणवतो,तो या संसारात असला तरी त्यातनिर्लिप्तच राहतो जसे आकाश. आकाश सर्वत्र व्यापलेले असले तरी ते कशातच लिप्त होत नाही. त्याप्रमाणे या जीवन्मुक्ताची स्थिती असते.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नोदेति नास्तमायाति सुखे दुःखे मनःप्रभा।
यथाप्राप्तस्थितिर्यस्य स जीवन्मुक्त उच्यते।।22।।

संधिविच्छेद –नोदेति – न + उदेति । नास्तमायाति – न + अस्तम् + आयाति । यथाप्राप्तस्थितिर्यस्य – यथाप्राप्तस्थितिः + यस्य । जीवन्मुक्तः – जीवत् + मुक्त

शब्दार्थ –नोदेति – उदयास न येणे, नास्तम् – अस्त न होणे

अन्वय –मनः प्रभा सुखे दुःखे न उदेति न अस्तम् आयाति। यस्य यथाप्राप्तस्थितिः सः जीवन्मुक्तः उच्यते।

अर्थ – (ज्या साधकाच्या) मनातील भाव सुखप्राप्त झाल्यास उदीत होत नाही (आनंदित होत नाही) किंवा दुःखामध्ये अस्तंगत होत नाही (खिन्न होत नाही) प्राप्त स्थिती जशी आहे त्यात जो विचलीत होत नाही तो जीवमुक्त म्हटल्या जाते.

वैशिष्ट्य–सुख दुःख, इ. द्वव्द्वांच्या परे गेलेला आणि त्यांच्या परिणामांनी विचलित न होणारा साधक जीवन्मुक्त होय. याला भगवद्गीतेत 'स्थितधीः'' म्हटले आहे.

यो जागर्ति सुषुप्तिस्थो यस्य जाग्रन्न विद्यते।
यस्य निर्वासनो बोधः स जीवन्मुक्त उच्यते।।23।।

संधिविच्छेद –जाग्रन्न – जाग्रत् + न । जीवन्मुक्तः – जीवत् + मुक्तः

शब्दार्थ –सुषुप्तिस्थ – सुषुप्ति अवस्थेत राहणारा, जागर्ति – जागतो.

अन्वय –सुषुप्तिस्थः यः जागर्ति यस्य जाग्रत् न विद्यते। यस्य निर्वासनः बोधः सः जीवन्मुक्तः उच्यते।

अर्थ – जो सुषुप्ती अवस्थेत जागतो, ज्याची जाग्रतावस्था राहत नाही. (जाग्रतावस्थेपासून जो पूर्णतः दूर राहतो) ज्याला आपण कोठे राहतो याची वासनाशून्य जाणीव्च राहते तो जीवन्मुक्त होय.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वैशिष्ट्य–ब्रह्मज्ञानी निरंतर आत्मतत्त्वाशी एकरूप राहतो. त्याला जाग्रतावस्था राहत नाही अर्थात् त्याला व्यावहारिक जगताचे भान राहत नाही. गीतेत या साधकाचे वर्णन

''या निशा सर्वभूतांना तस्यां जागर्ति संयमी।

यस्यं जागर्ति भूतानि सा निशा पश्यतोमुनि।।'' या श्लोकात आढळते.

रागद्वेषभयादीनामनुरूपं चरन्नपि।

योऽन्तर्व्योमवदत्यच्छः स जीवन्मुक्त उच्यते।।24।।

संधिविच्छेद –रागद्वेषभयादीनामनुरूपं – रागद्वेषभय + आदीनाम् + अनुरूपं। चरन्नपि – चरन् + अपि। योऽन्तर्व्योमवदत्यच्छः – यः + अन्तः + व्योमवत् + अति + अच्छः। जीवन्मुक्त – जीवत् + मुक्तः।

शब्दार्थ –चरन् – आचरणकरीत,व्योमवद् – आकाशप्रमाणे, अत्यच्छः – निर्मल

अन्वय –रागद्वेषभयादीनाम् अनुरूपं चरन् अपि यः अन्तर्व्योमवद् अत्यच्छः सः जीवन्मुक्तः उच्यते।

अर्थ – राग, द्वेष, भय इत्यादि भावनांनुसार तो व्यवहार करीत असला तरी जो अन्तर्यामी आकाशाप्रमाणे पूर्णतः निर्मल राहतो तो जीवन्मुक्त होय.

वैशिष्ट्य–व्यवहारात तो प्रवृत्त जरी झाला तरी व्यावहारिक कर्माने तो लिप्त होत नाही.

यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते।

कुर्वतोऽकुर्वतो वापि स जीवन्मुक्त उच्यते।।25।।

संधिविच्छेद –नाहंकृतो – न + अहंकृतः। बुद्धिर्यस्य – बुद्धिः + यस्य। कुर्वतोऽकुर्वतो – कुर्वतः + अकुर्वतः। वापि – वा + अपि।

शब्दार्थ –नाहंकृतो भाव – अहंकाररहितत्व,कुर्वतो – कार्य करणारा, अकुर्वतो – कार्य न करणारा

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –यस्य अहंकृतः भावः न, यस्य बुद्धिः न लिप्यते। कुर्वतः अकुर्वतः वा अपि सः जीवन्मुक्तः उच्यते।

अर्थ– ज्याच्या ठिकाणी अहंकाराचा भाव राहत नाही व ज्याच्या ठिकाणी बुद्धीतत्त्वाचा प्रभाव चालत नाही, तो काही कार्य करीत असला वा नसला (तरी कार्याद्वारे लिप्त न होणारा साधक) तो जीवन्मुक्त होय.

वैशिष्ट्य –प्रकृतीच्या तत्त्वांशी एकरूप असेल तर मनुष्य स्वतः अहंकारयुक्त व कर्ता होतो याऊलट ज्ञानप्राप्तीने तो प्रकृतीपासून वेगळा होऊन आत्मतत्त्वाशी एकरूप राहतो तेव्हा तो अहंकाररहित व निष्क्रिय होतो.

यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः।
हर्षामर्षभयोन्मुक्त स जीवन्मुक्त उच्यते।।26।।

संधिविच्छेद –यस्मान्नोद्विजते – यस्मात् + न + उद्विजते। लोकान्नोद्विजते – लोकात् + न + उद्विजते ।हर्षामर्षभयोन्मुक्तः – हर्ष + अमर्षभय + उन्मुक्त।

शब्दार्थ –उद्विजते – उद्विग्न होणे, हर्ष – आनंद, अमर्ष – दुःख

अन्वय –यस्मात् न उद्विजते लोकः लोकात् च यः न उद्विजते। हर्ष–अमर्ष–भयोन्मुक्तः सः जीवन्मुक्त उच्यते।

अर्थ – ज्याच्याद्वारे जनसमूह उद्विग्न होत नाही आणि जो जनसमूहाद्वारे उद्विग्न होत नाही, जो आनंद, दुःख, भय या भावनातून मूक्त आहे तो जीवन्मुक्त म्हटल्या जातो.

वैशिष्ट्य –भगवद्‌गीतेच्या दुसऱ्या अध्यायात स्थितप्रज्ञाचे लक्षण वर्णितांना श्लोक क्र. 15 व उपर्युक्त श्लोक जसाच्या तसा आहे. कारण आशय समान आहे. जीवन्मुक्त हाच स्थितप्रज्ञ असतो.

यः समस्तार्थजालेषु व्यवहार्यपि शीतलः।
परार्थेष्विव पूर्णात्मा स जीवन्मुक्त उच्यते।।27।।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संधिविच्छेद –समस्तार्थजालेषु – समस्त + अर्थजालेषु । व्यवहार्यपि – व्यवहरी + अपि। परार्थेष्विव – परार्थेषु + इव । पूर्णात्मा– पूर्ण + आत्मा

शब्दार्थ –समस्तार्थजालेषु – सर्व विषय समूह

अन्वय –समस्तार्थजालेषु व्यवहारी अपि यः परार्थेषु इव शीतलः सः पूर्णात्मा जीवन्मुक्तः उच्यते।

अर्थ –जो सर्व विषयांच्या जाळ्यांमध्ये (राहून) व्यवहार करीत असला तरी (ज्याच्या मनोवृत्ती) शांत राहतात, जणू हे विषयपाश स्वतःचे नसून दूसऱ्यांचे आहे (या भावनेने तो निर्लिप्त राहतो) असा पूर्णात्मा तो जीवन्मुक्त होय.

वैशिष्ट्य–अहंता व ममता दोनही त्याच्या ठिकाणी नसल्याने कोणाचे व कोणासाठी हे प्रश्नच या अवस्थेत रिते होतात हीच जीवन्मुक्ती होय.

प्रजहाति यदा कामान् सर्वांश्चित्तगतान् मुने।
मयि सर्वात्मके तुष्टः सः जीवन्मुक्त उच्यते।।28।।

संधिविच्छेद –सर्वांश्चित्तगतान् – सर्वान् + चित्तगतान् । सर्वात्मके – सर्व + आत्मके

शब्दार्थ –प्रजहाति – सोडून देतो, कामान् – इच्छांना, चित्तगतान्– मनात उत्पन्न होणाऱ्या

अन्वय –हे मुने ! यदा सर्वान् चित्तगतान् कामान् प्रजहाति, सर्वात्मके मयि तुष्टः सः जीवन्मुक्तः उच्यते।

अर्थ– हे मुनी, जेव्हा (तो साधक) आपल्या मनात उत्पन्न होणाऱ्या सर्व इच्छांचा त्याग करतो व सर्वांच्या अर्तर्यामी स्थित माझ्यावर समाधानी राहतो तो जीवन्मुक्त होय.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वैशिष्ट्य –मनातूनच सर्व इच्छा–आकांशा निर्माण होतात. ज्या अवस्थेत काही प्राप्त करण्यासारखे राहिले नाही, सर्वच प्राप्त झाले आहे, मन आत्मसाक्षाकाराने ओतप्रोत भरले आहे, त्या अवस्थेतील साधक पूर्ण समाधानाचा अधिकारी होते. ही त्याची जीवन्मुक्ती होय.

चैत्यवर्जितचिन्मात्रे पदे परमपावने

अक्षुब्धचित्तो विश्रान्तः सः जीवन्मुक्त उच्यते ।।29।।

संधिविच्छेद –चैत्यवर्जितचिन्मात्रे – चैत्यवर्जितचित् + मात्रे ।

शब्दार्थ –परमपावने – अत्यंत पवित्र, अक्षुब्धचित्तो – क्षोभरहित चित्त,विश्रान्तः – स्थिर होणे.

अर्थ – चित्तव्यापार नसलेल्या परमपवित्र चिन्मात्र पदामध्ये जो साधक क्षोभरहित झालेल्या आपल्या चित्ताला प्रविष्ट करतो. (चैतन्यमात्र पदाशी एकरूप होतो) तो जीवन्मुक्त होय.

वैशिष्ट्य –व्यावहारिक दशेत चित्ताचे अस्तित्व असते. पारमार्थिक अवस्थेत चित्ताचा अंश राहत नाही. चित्त क्षोभरहित, शांत होते व साधक परम–पवित्र चैतन्य पदात स्थिरावतो.

इदं जगदहं सोऽयं दृश्यजातमवास्तवम् ।

यस्य चित्ते न स्फुरति स जीवन्मुक्त उच्यते ।।30।।

संधिविच्छेद –जगदहं – जगत् + अहं । सोऽयं – सः + अयं । दृश्यजातमवास्तवम् – दृश्यजातम् + अवास्तवम् । जीवन्मुक्त – जीवत् + मुक्त

शब्दार्थ –सोऽयं – तो हाच आहे, दृश्यजातमवास्तवम् – दिसणारे सर्व मिथ्या आहे, स्फुरति –स्फुरित होणे

अन्वय –इदं जगत् अहं, सः , अयं (इति) अवास्तवं दृश्यजातं यस्य चित्ते न स्फुरति सः जीवमुक्तः उच्यते ।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ – हे जगत्, मी, तो, हा अशा अवास्तविक असलेल्या दृश्य पदार्थांबाबत ज्याच्या मनात कोणतेच स्फुरण होत नाही तो जीवन्मुक्त होय.

वैशिष्ट्य–अहं, इदं, या सर्व संज्ञा परमचैतन्याच्याच आहे. हे ज्ञानझाल्याने स्फुरण होणार ते कोणाचे? अर्थात् जे स्फूरीत हो तेही चैतन्यच आहे. हे ज्ञान होणे म्हणजेच जीवन्मुक्ती होय.

भूमब्रह्मनिष्ठाविधिः

सद्ब्रह्मणि स्थिरे स्फारे पूर्णे विषयवर्जिते।
आचार्यशास्त्रमार्गेण प्रविश्याशु स्थिरो भव।।31।।

संधिविच्छेद –प्रविश्याशु – प्रविश्य + आशु

शब्दार्थ –सद्ब्रह्मणि – सत् रूप असलेल्या ब्रह्मात,विषयवर्जिते – विषयरहित, प्रविश्य – प्रवेश करून, आशु – लवकर

अन्वय –विषयवर्जिते पूर्णे स्फारे सद्ब्रह्मणि स्थिरे आचार्यशास्त्रमार्गेण प्रविश्य आशु स्थिरः भव।

अर्थ – विषयांपासून पूर्णतः दूर असलेल्या, निश्चल असणाऱ्या, प्रकाशित असणाऱ्या, परिपूर्ण असणाऱ्या अशा सत् ब्रह्मतत्त्वामध्ये शीघ्र प्रविष्ट होऊन स्थिरत्व प्राप्त कर.

वैशिष्ट्य–विषयरहितत्व, निश्चिलत्व, परिपूर्णत्व, प्रकाशरूपत्व असं ब्रह्माचं लक्षण देऊन या ब्रह्मरूपात, शाश्वत पदात तू स्थिर हो असा उपदेश येथे केला आहे.

शिवो गुरुः शिवो वेदः शिवो देवः शिवः प्रभुः।
शिवोऽस्म्यहं शिवः सर्वं शिवादन्यन्न किंचन।।32।।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संधिविच्छेद –शिवोऽस्म्यहं – शिवः + अस्मि + अहं । शिवादन्यन्न – श्विात् + अन्यत् + न । किञ्चन – किम् + चन ।

शब्दार्थ –शिवोऽस्म्यहं – मी शिव आहे, शिवादन्यन्न – शिवापेक्षा दुसरे काहीच नाही.

अन्वय –शिवः गुरुः शिवः वेदः शिवः देवः शिवः प्रभुः । अहं शिवः अस्मि सर्वं शिवः शिवात् अन्यत् न किञ्चन

अर्थ – गुरु शिव आहे, वेदही शिव आहेत, देवता शिव आहे. ईश्वर शिव आहे. मी शिव आहे, हे सर्व (चराचरजगत्) शिव आहे. शिवाला सोडून अन्य काहीच नाही.

वैशिष्ट्य–शिव म्हणजे पवित्र, निर्मळ अर्थात मलरहित जे जे सत्य, सुंदर मंगळ आहे ते शिव आहे. गुरु, वेद, देवता, ईश्वर व चराचर जगत् हे सर्व मंगलरूप आहे. शिवरूप आहे. शिवाव्यतिरिक्त अन्य कोणतेच तत्त्व नाही.

तमेव धीरो विज्ञाय प्रज्ञां कुर्वीत ब्राह्मणः।
नानुध्यायाद् बहूञ्छब्दान् वाचो विलापनं हि तत्।।33।।

संधिविच्छेद –तमेव – तम् + एव । नानुध्यायाद् – न + अनुध्यायात् । बहूञ्छब्दान् – बहून् + शब्दान्

शब्दार्थ –विज्ञाय – जाणून घेऊन,नानुध्यायाद् – ध्यान न करता, बहूञ्छब्दान् – अनेक शब्दांचे जाळे

अन्वय –तमेव धीरः विज्ञाय ब्राह्मणः प्रज्ञां कुर्वीत, बहून शब्दान् न अनुध्यायात् वाचः विलापनं हि तत्।

अर्थ – त्या परमात्म्याचा अनुभव करून ब्रह्मज्ञानी आपली प्रज्ञा तयार करावी. अनेक शास्त्रशब्दांचे चिन्तन करू नये कारण ते केवळ शाब्दिकश्रम आहे.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वैशिष्ट्य–अनुभवाने प्राप्त झालेले ज्ञान यथार्थ होय. केवळ शब्दांचे जाळे विणत बसल्याने यथार्थज्ञान प्राप्त होत नाही म्हणून तर्कादिंचा त्याग करून अनुभवसिध्द परमात्म्याला जाण व खऱ्या अर्थाने प्रज्ञावंत हो असे येथे वर्णिले आहे.

विहंगमपिपीलिकामार्गविवेकः

शुको मुक्तो वामदेवोऽपि मुक्त–
स्ताभ्यां विना मुक्तिभाजो न सन्ति।
शुकं मार्गं येऽनुसरन्ति धीराः
सद्योमुक्तास्ते भवन्तीह लोके।।34।।

संधिविच्छेद –वामदेवोऽपि – वामदेवः + अपि । मुक्तस्ताभ्यां – मुक्तः + ताभ्यां । येऽनुसरन्ति – ये + अनुसरन्ति । सद्योमुक्तास्ते – सद्योमुक्ताः + ते। भवन्तीह – भवन्ति + इह ।

शब्दार्थ –अनुसरन्ति – अनुसरण करतात, धीराः – धैर्यवान्, सद्यः – तत्काळ, इह लोके – या लोकात

अन्वय –शुकः मुक्तः वामदेवः अपि मुक्तः ताभ्यां विना मुक्तिभाजः न सन्ति। ये धीराः शुकं मार्गम् अनुसरन्ति ते सद्योमुक्ताः इह लोके भवन्ति।

अर्थ – शुक मुक्त झाला, वामदेवही मुक्त झाला. यांच्याशिवाय अन्य कोणी मुक्तीप्राप्त करणारे नाहीत. जे धैर्यवान् पुरुष शुकमार्गाचे अनुसरण करतात ते त्वरित इहलोकातून मुक्त होतात.

वैशिष्ट्य–मुक्ती प्राप्त करून शाश्वतपदात स्थित झालेल्या शुक–वामदेवांचा येथे दृष्टान्त देऊन मुमुक्षु साधकांनी यांचे अनुसरण करून मोक्ष मिळवावा असा या श्लोकाचा आशय आहे.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वामदेवं येऽनुसरन्ति नित्यं

मृत्वा जनित्वा च पुनःपुनस्तत् ।

तेवै लोके क्रममुक्ता भवन्ति

योगैः सांख्यैः कर्मभिर्भक्तियुक्तैः ।।35 ।।

संधिविच्छेद –येऽनुसरन्ति – ये + अनुसरन्ति । पुनःपुनस्तत् – पुनःपुनः + तत् । कर्मभिर्भक्तियुक्तैः – कर्मभिः + भक्तियुक्तैः ।

शब्दार्थ –मृत्वा – मरून, जनित्व – जन्म घेऊन

अन्वय –ये वामदेवं नित्यम् अनुसरन्ति मृत्वा जनित्वा च पुनः पुनः तत् ते वै योगैः सांख्यैः भक्तियुक्तैः कर्मभिः लोके क्रममुक्ताः भवन्ति ।

अर्थ – जे वामदेवांच्या मोक्षमार्गाचे नित्य अनुसरण करतात ते इहलोकात मरून, पुन्हा जन्म घेवून वारंवार घडणाऱ्या या (जन्म–मृत्युरूपी चक्राच्या) क्रमातून मुक्त होतात. योगदर्शनाने, सांख्यदर्शनाने, कर्मानुष्ठानाने व भक्तीने ते क्रमाने कर्मबंधनातून मुक्त होतात.

वैशिष्ट्य–शुकमार्गाचे अनुसरण करणारे लगेच इहालोकातून मुक्त होतात तर वामदेवांच्या मार्गाचे अनुसरण करणाऱ्यांना जन्ममृत्युरूपी भवसागरातून मुक्त होण्यासाठी कर्म, ज्ञान आणि भक्ती ही तीन साधने क्रमशः उपयोगी पडतात.

शुकश्च वामदेवश्च द्वे सृती देवनिर्मिते ।

शुको विहङ्गमः प्रोक्तो वामदेवः पिपीलिका ।।36 ।।

संधिविच्छेद –शुकश्च – शुकः + च । वामदेवश्च – वामदेवः + चः ।

शब्दार्थ –सृती – मार्ग, विहङ्गमः – पक्षी, पिपीलिका – मुंगी

अन्वय –शुकः च वामदेवः च द्वे स्मृती देवनिर्मिते । शुकः विहङ्गमः वामदेवः पिपीलिका उक्तः ।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ – भगवंताद्वारे शुकाचा आणि वामदेवाचा असा द्विवीध (मोक्ष) मार्ग निर्मिला गेला आहे (त्यापैकी) विहंगम (पक्षी) मार्ग हा शुकाचा असून पिपीलिका (मुंगीचा) मार्ग हा वामदेव वर्णित आहे.

वैशिष्ट्य –शुकमार्ग त्वरित मुक्ती देणारा तर वामदेव मार्ग हळूहळू मार्ग क्रमणाने मुक्ती पर्यंत पोहचविणारा आहे म्हणून अनुक्रमे या दोन मार्गांना पक्षी व मुंगी यांच्या गतीचे नाव देण्यात आले आहे.

अतद्व्यावृत्तिरूपेण साक्षाद्विधिमुखेन वा।
महावाक्यविचारेण सांख्ययोगसमाधिना।।37।।
विदित्वा स्वात्मनो रूपमसंप्रज्ञासमाधितः
शुकमार्गेण विरजाः प्रयान्ति परमं पदम्।।38।।

संधिविच्छेद –साक्षाद्विधिमुखेन – साक्षात् + विधिमुखेन । स्वात्मनः – स्व + आत्मनः।
रूपमसंप्रज्ञासमाधितः – रूपम् + असंप्रज्ञासमाधितः

शब्दार्थ –विदित्वा – जाणून, प्रयान्ति – प्राप्त होते

अन्वय –शुकमार्गेण साक्षात् विधिमुखेन अतद्व्यावृत्तिरूपेण महावाक्यविचारेण सांख्ययोगसमाधिना असंप्रज्ञासमाधितः वा स्वात्मनः रूपं विदित्वा विरजाः परमं पदं प्रयान्ति।

अर्थ– शुकवर्णित मार्गाद्वारे वैराग्यसंपन्न साधक नेति नेति या न्यायाने किंवा प्रत्यक्ष विधि आचरणाने किंवा महावाक्यांच्या परिशीलनाने अथवा सांख्ययोग दर्शनात वर्णित समाधीने असंप्रज्ञातसमाधीद्वारे स्वतःच्या स्वरूपाला जाणून त्या परम पदाच्या (कैवल्याच्या) प्राप्तीसाठी प्रयत्न करतो.

वैशिष्ट्य–शुकमार्गाने प्राप्त होणाऱ्या असंप्रज्ञात समाधी पर्यंत पोहचण्याचे नाना उपाय येथे वर्णिले आहेत.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

1. नेति नेति न्याय –सर्व वस्तुंना ' हे नाही' यान्यायाने दूर करून अवशिष्ट ते ब्रह्म आहे असे जाणणे.
2. महावाक्यपरिशील –'तत्त्वमसि' या उपदेश वाक्याने गुरूने शिष्याला तो तू आहे असा बोध करून दिल्यावर ' अहं ब्रह्मास्मि' या महावाक्यात शिष्याने प्रत्यक्ष अनुभव प्राप्त करणे.
3. असंप्रज्ञात समाधी – निरालंबन समाधीने स्वरूपाला जाणणे व कैवल्यात स्थिर होणे.

यमाद्यासनजायासहठाभ्यासात् पुनः पुनः।
संजातविघ्नबाहुल्यः अणिमादिवशादिह।।39।।
अलब्ध्वापि फलं सम्यक् पुनर्भूत्वा महाकुले।
पूर्ववासनयैवायं योगाभ्यासं पुनश्चरन्।।40।।
अनेक जन्माभ्यासेन वामदेवेन वैपथा।
सोऽपि मुक्तिं समाप्नोति तद्विष्णोः परमं पदम्।।41।।

संधिविच्छेद –यमाद्यासनजायासहठाभ्यासात् – यम्+ आद्य + आसनजायासहठ + आभ्यासात् । अणिमादिवशादिह – अणिमा + आदिवशात् + इह । अलब्ध्वापि – अलब्ध्वा + अपि । पुनर्भूत्वा – पुनः + भुत्वा । पूर्ववासनयैवायं – पूर्ववासनया + एव + अयं । योगाभ्यासं – योग + अभ्यासं । पुनश्चरन् – पुनः + चरन् । जन्मोभ्यासेन –जन्म + अभ्यासेन। सोऽपि – सः + अपि। समाप्नोति – सम् + आप्नोति । तद्विष्णोः – तत् + विष्णोः ।

अन्वय –पुनः पुनः हठाभ्यासात् यमादि–आसनज–आयास संजातविघ्नबाहुल्यः अणिमादि वशात् इह स्मयक् फलम् अलब्ध्वापि महाकुले पुनर्भूत्वा पूर्ववासनया एव अयं योगाभ्यासं पुनः चरन् अनेक जन्माभ्यासेन वामदेवेन वै पथा सोऽपि मुक्तिं समाप्नोति (इति) तद्विष्णोः परमं पदम्

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ – हठयोगाच्या निरंतर अभ्यासाद्वारे यम, नियम, आसनादि सिद्ध झाल्यावर, योगमार्गातील अनेक अन्तरायांमुळे व अणिमादि अष्ट ऐश्वर्यांच्या वशामुळे जर इष्टफलप्राप्ती होत नसेल तर पुन्हा या विश्वात (जन्म घेवून) नित्य योगाभ्यासाचे आचरण करून, वासनांना नष्ट करण्याचा प्रयत्न योगाभ्यासाद्वारे (करावा). अनेक जन्मांनंतर हे सिद्ध झाल्यास तो वामदेवाचा मोक्ष मार्ग होय. या मार्गानेसुद्धा (क्रमशः हळूहळू) मुक्ती प्राप्त होते, हेच विष्णूचे श्रेष्ठ पद होय.

वैशिष्ट्य–येथे क्रमशः योगससाधना आपल्या अधिकारा नुसार करत राहावी असे सांगितले आहे. योगसाधनेत अनेक अडथळे येतील मात्र आपण आपली साधना श्रध्देने निरंतर चालू ठेवली तर निश्चितच साध्याप्रत पोहचू शकतो हा वामदेवाचा मोक्ष मार्ग होय.

द्वाविमावपि पन्थानौ ब्रह्मप्राप्तिकरौ शिवौ।
सद्योमुक्तिप्रदश्चैकः क्रममुक्तिप्रदः परः।।42।।

संधिविच्छेद –द्वाविमावपि – द्वौ + इमौ + अपि । सद्योमुक्तिप्रदश्चैकः – सद्योमुक्तिप्रद + एकः ।

शब्दार्थ –दौ – दोन, पन्थानौ – मार्ग, ब्रह्मप्रातिकरौ – ब्रह्मपदाची प्राप्ती करून देणारे,सद्योमुक्तिप्रदः – त्वरित मुक्ती मिळवून देणारा, क्रममुक्तिप्रदः – क्रमशः मुक्ती मिळवून देणारा

अन्वय –ब्रह्मप्राप्तिकरौ शिवौ इमौ द्वौ अपि पन्थानौ। सद्योमुक्तिप्रदः एक क्रममुक्तिपदः परः।

अर्थ – हे दोन्हीही मार्ग ब्रह्मतत्त्वाची प्राप्ती करून देणारे पवित्र असे मार्ग आहेत. यापैकी एक मार्ग (शुकमार्ग) हा त्वरित मुक्ती प्रदान करणारा आहे तर दुसरा मार्ग (वामदेवमार्ग) हा क्रमशः मुक्ती प्रदान करणारा आहे.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वैशिष्ट्य–शुकमार्ग व वामदेव मार्गाचे स्वरूप वर्णिल्यानंतर हे दोनही मार्ग ब्रह्मपदी पोहचविणारे आहेत. फरक एवढाच की शुकमार्ग त्वरित फलप्रद आहे तर वामदेवमार्ग क्रमाक्रमाने फलप्रद होतो.

ब्रह्मविद्दृष्टिप्रसरस्य पावनत्वम्

तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः ।
यस्यानुभवपर्यन्ता बुद्धिस्तत्त्वे प्रवर्तते ।।43।।

संधिविच्छेद –एकत्वमनुपश्यतः – एकत्वम् + अनुपश्यतः । यस्यानुभवपर्यन्ता – यस्य + अनुभवपर्यन्ता । बुद्धिस्तत्त्वे – बुद्धिः + तत्त्वे ।

शब्दार्थ –शोक – दुःख, प्रवर्तते – प्रवृत्त होते, अनुपश्यतः– पहाणारा

अन्वय –यस्य अनुभवपर्यन्ता बुद्धिस्तत्वे प्रवर्तते, एकत्वम् अनुपश्यतः (तस्य साधकस्य) तत्र कः मोहः कः शोकः ।

अर्थ – (साधकाच्या ठिकाणी) त्याच्या ठिकाणी अनुभव प्राप्त होईपर्यंत बुद्धीचे अस्तित्व (बुद्धिजनीन भेद) राहते. (अद्वैतज्ञान झाल्यावर) सर्वत्र अद्वैत पहाणाऱ्यासाठी कोणता मोह व कोणता शोक राहील?

वैशिष्ट्य–भेद पहाणे हा बुध्दीचा धर्म आहे. हे अभेदाचे ज्ञान अनुभूती झालेल्या साधकाला भेदज्ञान कसे राहील. त्यामुळे तो साधक सर्व द्वद्वांच्या परे जातो. अद्वैतात रममाण होतो.



CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पञ्चमोऽध्यायः

योगेच्छोः देहज्ञानमावश्यकम्

अथ हैनम ऋभुं भगवन्तं निदाघः पप्रच्छ योगाभ्यासविधिमनुब्रूहेति। तथेति स होवाच।

त्यानंतर त्या भगवान ऋभूला योगाभ्यासाची प्रक्रिया आपण सांगावी असे निदाघ म्हणाला. 'ठिक आहे' असे म्हणून (ऋभू भगवान) म्हणाले.

पञ्चभूतात्मको देहः पञ्चमण्डलपूरितः।
काठिन्यं पृथिवीमेकां (ह्येषां) पानीयं तद्द्रवाकृतिः॥1॥
दीपनं च भवेत् तेजः प्रचारो वायुलक्षणम्।
आकाशः सत्त्वतः सर्वं ज्ञातव्यं योगमिच्छता॥2॥

संधिविच्छेद – पञ्चभूतात्मको – पञ्चभूत + आत्मकः । पृथिवीमेकां – पृथिवीम् + एकां । ह्येषां – हि + एषां । तद्द्रवाकृतिः– तत् + द्रव + आकृतिः। योगमिच्छता–योगम् + इच्छता ।

शब्दार्थ – काठिण्य – घनता, पानीयं – द्रव्यता, ज्ञातव्यं – जाणावे

अन्वय – पञ्चमण्डलपूरितः देहः पञ्चभूतात्मकः। पृथिवीम् एकां काठिन्यं, द्रवाकृति तत् पानीयं, दीपनं च तेजः भवेत् । प्रचारः वायुलक्षणम् सत्त्वतः आकाशः (इति)योगम् इच्छता सर्वं ज्ञातव्यम् ।

अर्थ – देह हा पंच महाभूतात्मक आहे व पाच मंडलांनी युक्त आहे. घनरूप असलेली ती पृथिवी होय. द्रवरूप असलेले जलतत्त्व होय. प्रकाशशील तत्त्व अग्नी होय. संचार करणारा वायू असे वायूचे लक्षण आहे व सत्त्वरूप असे आकाश आहे. योगप्राप्तीची इच्छा असणाऱ्याने या सर्वांचे ज्ञान प्राप्त करावे.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वैशिष्ट्य –येथे पंचमहाभूतांचे सोपे लक्षण दिले आहे. घनरूप ती पृथिवी, द्रवरूप ते जल, प्रकाशरूप तो अग्नी, संचाररूप तो वायू आणि सत्त्वरूप ते आकाश.

श्वाससंख्या

षट्छतान्यधिकान्यत्र सहस्राण्येकविंशतिः।
अहोरात्रवहैः श्वासैर्वायुमण्डलघातकः।।3।।

संधिविच्छेद –षट्छतान्यधिकान्यत्र – षट् + शतानि + अधिकानि + अत्र । सहस्राण्येकविंशतिः – सहस्राणि + एकविंशतिः । श्वासैर्वायुमण्डलघातकः – श्वासैः + वायुमण्डलघातकः ।

अन्वय –अत्र षट्शतानि अधिकानि सहस्राणि एकविंशतिः अहोरात्रवहैः श्वासैः वायुमण्डलघातकः ।

अर्थ – या शरीरात 21,600 प्रमाणाने श्वास रात्री आणि दिवस वाहत असतात ज्याने वायुमंडलाचा आघात होतो.

वैशिष्ट्य–शरीरस्थ वायूची श्वास–प्रश्वासाची एक दिवसाची गती या उपनिषदाने 21,600 अशी नमूद केली आहे.

देहक्षयनिवारणाय भूतधारणविधिः

तत्पृथिवीमण्डले क्षीणे वलिरायाति देहिनाम्।
तद्वदापोगणापाये केशाः स्युः पाण्डराः क्रमात्।।4।।
तेजःक्षये क्षुधा कान्तिर्नश्यते मारुतक्षये।
वेपथुः संभवेन्नित्यं नाभसे नैव जीवति।।5।।
इत्थम्भूतक्षयान्नित्यं जीवितं भूतधारणाम्।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संधिविच्छेद –वलिरायाति – वलिः + आयाति । तद्वदापोगणापाये – तत् + वत् + आपोगण + अपाये । कान्तिर्नश्यते – कान्तिः + नश्यते। संभवेन्नित्यं – सम् + भवेत् + नित्यं। नैव – न + एव । इत्थम्भूतक्षयान्नित्यं – इत्थं + भूतक्षयात् + नित्यं।

शब्दार्थ –क्षीणे – क्षीण झाल्याने, वलि – सूरकूत्या, पाण्डराः – पांढरे

अन्वय –तत्पृथिवीमण्डले क्षीणे देहिनां वलिः आयाति । तद्वत् आपोगणापाये क्रमात् केशाः पाण्डराः स्युः । तेजःक्षये क्षुधा मारुतक्षये च कान्तिः नश्यते । नाभसे वेपथुः संभवेत् नैव जीवति। भूतक्षयात् नित्यं इत्थं भूतधारणं (तु) जीवितं (भवति)।

अर्थ – (पंच महाभूतांपैकी) पृथिवीमंडल क्षीण झाल्यास देहधारण केलेल्या (मनुष्यांच्या) शरीरावर सुरकूत्या पडायला लागतात. त्याप्रमाणे जल मंडलाचा क्षय झाल्यास केस हळूहळू पांढरे व्हायला लागतात. तेजतत्त्व क्षीण झाल्यास भूक मंदावते. तर वायूतत्त्वाच्या क्षयाने कांती नष्ट होते. आकाशतत्त्वाच्या क्षयाने शरीरात कंपन निर्माण होते व जीवन नष्ट होते. अशाप्रकारे पंचमहाभूताच्या क्षयाने शरीराची हानी होते तर याच महाभूतांना धारण केल्यास जीवन प्राप्त होते.

वैशिष्ट्य–पंचमहाभूतात्मक देहातील पंचमहाभूत जर क्षीण झाले तर होणारा देहावरील परिणाम येथे सांगितला आहे.

भूतधारणाय उड्याणबन्धाभ्यासः

उड्याणं कुरुते यस्मादविश्रान्तं महाखगः ।।6।।

उड्डियाणं तदेव स्यात् तत्र बन्धोऽभिधीयते

उड्डियाणो ह्यसौ बन्धो मृत्युमातङ्गकेसरी ।। 7 ।।

संधिविच्छेद –यस्मादविश्रान्तं – यस्मात् + अविश्रान्तं । बन्धोऽभिधीयते – बन्धः + अभिधीयते । ह्यसौ – हि + असौ ।

शब्दार्थ –उड्याणं – उडान भरणे, महाखगः – मोठा पक्षी, अविश्रान्तं – न थकता, निरंतर

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –महाखगः यस्मात् अविश्रान्तं उड्याणं कुरुते तदेव तत्र उड्डियाणं बन्धः अभिधीयते। असौ हि उड्डियाणः बन्धः मातङ्गमृत्युकेसरी।

तस्य भुक्तिस्तनोः कायात् तस्य बन्धो हि दुष्करः ।
अग्नौ तु चलिते कुक्षौ वेदना जायते भृशम् ।। 8 ।।
न कार्या क्षुधितेनापि नापि विण्मूत्रवेगिना ।
हितं मितं च भोक्तव्यं स्तोकं स्तोकमनेकधा ।। 9 ।।

लयमन्त्रहठाख्यास्त्रयो योगाः

मृदुमध्यममन्त्रेषु क्रमान्मन्त्रं लयं हठम्।
लयमन्त्रहठा योगा योगो ह्यष्टाङ्गसंयुतः।।10।।

संधिविच्छेद –क्रमान्मन्त्रं – क्रमात् + मन्त्रं । ह्यष्टाङ्गसंयुतः – हि + अष्टाङ्गसंयुतः

शब्दार्थ –हठम् – हठयोग ,अष्टाङ्गसंयुतः– आठ अंगांनीयुक्त

अन्वय –क्रमात् मृदुमध्यममन्त्रेषु मन्त्रं लयं हठम्। लयमन्त्रहठाः योगाः अष्टाङ्गसंयुतः हि योगः।

अर्थ – (योग तीन प्रकारचा आहे) यात क्रमाने लययोग हा मृदु स्वरूपाचा, हठयोग हा मध्यमस्वरूपाचा व (नादानुसंधान हे) मंत्र युक्त आहे. प्रथम लययोगाचा नंतर मन्त्राचा अर्थात् नादानुसंधानाचा व नंतर हठयोगाचा क्रमाने अभ्यास करावा. त्यापैकी हठयोग हा अष्टांगयुक्त आहे.

वैशिष्ट्य–येथे योगसंप्रदायांचा उल्लेख केला आहे. लययोग, हठयोग, मन्त्रयोग या योगप्रकाराचे स्थान मृदु, मध्य रूपाने वर्णिले आहे.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

योगाष्टाङ्गानि

यमश्च नियमश्चैव तथा चासनमेव च।
प्राणायामस्तथा पश्चात् प्रत्याहारस्तथा परम्।।11।।
धारणा च तथा ध्यानं समाधिश्चाष्टमो भवेत्।

संधिविच्छेद –यमश्च – यमः + च । नियमश्चैव – नियमः + च + एव। प्राणायामस्तथा – प्राणायामः + तथा । प्रत्याहारस्तथा – प्रत्याहारः + तथा । समाधिश्चाष्टमो – समाधिः + च + अष्टमः

शब्दार्थ –पश्चात् – त्यानंतर

अन्वय –यमः च नियमः च एव तथा प्राणायामः तथा पश्चात् प्रत्याहारः तथा धारणा तथा च ध्यानं च समाधिः अष्टमो भवेत्।

अर्थ – यम, नियम, आसन तसेच प्राणायाम व त्यानंतर प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी हे (हठयोगाचे) आठ अंग आहेत.

वैशिष्ट्य–येथे योगाच्या आठ अंगांचा क्रम वर्णिला आहे.

यमनियमभेदाः

अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यं दयार्जवम्।।12।।
क्षमा धृतिर्मिताहारः शौचं चेति यमा दश।
तपः संतोषमास्तिक्यं दानमीश्वरपूजनम्।।13।।
सिद्धान्तश्रवणं चैव ह्रीर्मतिश्च जपो व्रतम्।
एते हि नियमाः प्रोक्ता दशधैवं महामते।।14।।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संधिविच्छेद –सत्यमस्तेयं – सत्यम् + अस्तेयं । दयार्जवम् – दया + आर्जवम् । धृतिर्मिताहारः – धृतिः + मित + आहारः। संतोषमास्तिक्यं – सम् + तोषम् + आस्तिक्यं। दानमीश्वरपूजनम् – दानम् + ईश्वरपूजनम् । चैव – च + एव । ह्रीर्मतिश्च – ह्रीः + मतिः + च । दशधैवं – दशधा + एवम्।

शब्दार्थ –आर्जवम् – ऋजुतेचा भाव, धृति – धैर्य, आस्तिक्यं –श्रध्दाभं,ह्री–लज्जा, महामते – बुध्दिमंत्

अन्वय –हे महामते ! अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यं दयार्जवं क्षमा धृतिः मिताहारः शौचं इति यमा दश तपः संतोषम्–आस्तिक्यं दानम्–ईश्वरपूजनं सिद्धान्तश्रवणं च एव ह्रीः मतिः च जपः व्रतम् एते हि दशधा एवं नियमाः प्रोक्ता।

अर्थ – हे महामते, अहिंसा, सत्य, अस्तेय (चोरी न करणे), ब्रह्मचर्य, दया, आर्जव, क्षमा, धृति, मिताहार आणि शौच (शुद्धता) हे दहा यम आहेत. तप, संतोष, आस्तिक्य, दान, ईश्वरपूजा, सिद्धान्तश्रवण करणे, ह्री (लज्जा), मति, जप, व्रत हे दहा प्रकारचे नियम सांगितले आहेत.

वैशिष्ट्य–पातंजल योगात यम–नियमांची संख्या पाच–पाच दिली आहे. मात्र हठयोगात यम–नियम प्रत्येकी दहा प्रकारचे मानले आहे. हठयोगप्रदीपिकेतील यम–नियम विषयक श्लोक आशय साधर्म्यामुळे जसेच्या तसे येथे देण्यात आले असावेत.

एकादशासनानि

एकादशासनानि स्युश्चक्राद्या मुनिसत्तम।
चक्रं पद्मासनं कूर्मं मयूरं कुक्कुटं तथा।।15।।
वीरासनं स्वस्तिकं च भद्रं सिंहासनं तथा।
मुक्तासनं गोमुखं च कीर्तितं योगवित्तमैः।।16।।

CC-0. Ravikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संधिविच्छेद –एकादशासनानि – एकादश + आसनानि । स्युश्चक्राद्या – स्युः + चक्राद्या । पद्मासनं – पद्म + आसनं । वीरासनं – वीर + आसनं । सिंहासनं – सिंह + आसनं । मुक्तासनं – मुक्त + आसनं ।

शब्दार्थ –एकादश – अकरा, कीर्तितं – प्रसिध्द, योगवित्तम – योगीवर्य

अन्वय –हे मुनिसत्तम चक्राद्या एकादशासनानि स्युः । चक्रं पद्मासनं कूर्मं मयूरं कुक्कुटं तथा वीरासनं स्वस्तिकं च भद्रं सिंहासनं तथा मुक्तासनं गांमुखं च योगवित्तमैः कीर्तितम् ।

अर्थ – चक्र इत्यादी अकरा आसने हे मुनिश्रेष्ठ! आहेत. (ती आसने म्हणजे) चक्रासन, पद्मासन, कूर्मासन, मयूरासन, कुक्कुटासन तसेच वीरासन, स्वस्तिकासन, भद्रासन, सिंहासन, मुक्तासन आणि गोमुखासन ही अकरा आसने योगाच्या जाणकारांकडून सांगितल्या गेली आहेत.

वैशिष्ट्य–अनेक आसनांपैकी मुख्य अकरा आसने या उपनिषदात वर्णिली आहेत.

चक्रासनलक्षणम्

सव्योरू दक्षिणे गुल्फे दक्षिणं दक्षिणेतरे ।
निदध्यादृजुकायस्तु चक्रासनमिदं मतम् ।।17 ।।

संधिविच्छेद –सव्योरू – सव्य + ऊरू । दक्षिणेतरे – इक्षिण + इतरे । निदध्यादृजुकायस्तु – निदध्यात् + ऋजुकायः + तु । चक्रासनमिदं – चक्रासनम् + इदं ।

शब्दार्थ –सव्य – डावा, उरू – भांडी, गुल्फ – टाच, दक्षिण – उजवा

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –सव्योरू दक्षिणे गुल्फे दक्षिणं दक्षिणेतरे ऋजुकायः तु निदध्यात् इदं चक्रासनं मतम्।

अर्थ – हलके शरीर असलेल्या (साधकाने) डावी मांडी उजव्या पायाच्या टाचेवर व उजवी मांडी डाव्या पायाच्या टाचेवर दृढतेने स्थापित करावी. हे चक्रासन होय असे मानले जाते.

वैशिष्ट्य–अकरा आसनांपैकी केवळ चक्रासनाचाच विधी या उपनिषदा वर्णिला आहे.

प्राणायामः

पूरकः कुम्भकस्तद्वद्रेचकः पुरकः पुनः।
प्राणायामाः स्वनाडीभिस्तस्मान्नाडीः प्रचक्षते।।18।।

संधिविच्छेद –कुम्भकस्तद्वद्रेचकः – कुम्भकः + तद्वत् + रेचकः । प्राणायामाः – प्राण + आयामाः। स्वनाडीभिस्तस्मान्नाडीः – स्वनाडीभिः + तस्मात् + नाडीः।

अन्वय –पुरकः कुम्भकः तद्वत् पुनः रेचकः पुरकः प्राणयामाः स्वनाडीभिः तस्मात् नाडीः प्रचक्षते।

अर्थ – (प्राणवायूचे नासिकेद्वारे) पूरक करणे (श्वास घेणे), कुम्भक साधणे (श्वास रोखून धरणे), रेचक करणे, (प्रश्वास बाहेर टाकणे) व त्यानंतर पुन्हा पूरक करणे (या प्रक्रियेला) प्राणायाम म्हणतात. (हा प्राणायाम) शरीरस्थ नाड्यांमधून होतो म्हणून यास नाडी असेही म्हणतात.

वैशिष्ट्य–प्राणायामासाठी 'नाडी' असा शब्दप्रयोग येथे केल्याचे आढळते.

देहतदवयवमानानि

शरीरं सर्वजन्तूनां षण्णवत्यङ्गुलात्मकम्।
तन्मध्ये पायुदेशात्तु द्वयङ्गुलात् परतः परम्।।19।।
मेढ्रदेशादधस्तात्तु द्वयङ्गुलान्मध्यमुच्यते।
मेढ्रान्नवाङ्गुलादूर्ध्वं नाडीनां कन्दमुच्यते।।20।।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चतुरङ्गुलमुत्सेधं चतुरङ्गुलमायतम्।
अण्डाकारं परिवृतं मेदोमज्जास्थिशोणितैः।।21।।

संधिविच्छेद –षण्णवत्यङ्गुलात्मकम् – षट् + नवति + अङ्गुल + आत्मकम् । तन्मध्ये – तत् + मध्ये । पायुदेशात्तु – पायुदेशात् + तु । द्वयङ्गुलात् – द्वि + अङ्गुलात्। मेढ्रदेशादधस्तात्तु – मेढ्रदेशात् + अधस्तात् + तु। द्वयङ्गुलान्मध्यमुच्यते– द्वि + अङ्गुलात् + मध्यम् + उच्यते। मेढ्रान्नवाङ्गुलादूर्ध्वं – मेढ्रात् + नव + अङ्गुलात् + ऊर्ध्वं। कन्दमुच्यते – कन्दम् + उच्चते । चतुरङ्गुलमुत्सेधं – चतुर् + अङ्गुलम् + उत्सेधं । चतुरङ्गुलमायतम् – चतुर् + अङ्गुलम् + आयतम् । अण्डाकारं – अण्डा + आकारं । मेदोमज्जास्थिशोणितैः – मेदमज्जा + अस्थिशोणितैः।

अन्वय –सर्वजुन्तूनां शरीरं षण्णवत्यङ्गुलात्मकं (भवति)। तन्मध्ये पायुदेशात् तु द्वयङ्गुलात् परतः परं, मेढ्रदेशात् अधस्तात् तु द्वयङ्गुलात् मध्यम उच्यते, मेढ्रात् नवाङ्गुलात् ऊर्ध्वं चतुरङ्गुलम् उत्सेधं चतुरङ्गुलभ् आयतम् अण्डाकारं मेदो–मज्जा–अस्थिशोणितैः परिवृत्तं नाडीनां कन्दम् उच्यते।

अर्थ– सर्व प्राणिमात्राचे शरीर हे छहाण्णव बोटांच्या प्रमाणाचे (लांब) असते. त्या शरीरात नाड्यांचे जे कन्दस्थान आहे ते पायुपासून दोन बोटे बाजूला, मेढ्रस्थानाच्या खाली दोन बोटे मध्यबाजूला व मेढ्रस्थानाच्यानऊ बोटे वरच्या बाजूला मानले जाते. चारबोटे लांब असलेले चार बोटे रुंद असलेले व मेद, मज्जा, अस्थि आणि रक्त यांनी वेष्टित असलेले अण्डाकृती असे (नाडीचे कन्दस्थान) आहे.

वैशिष्ट्य–अनेक उपनिषदांमध्ये कंदस्थानाचे निश्चित स्थान सांगतांना आलेले वर्णन व उपर्युक्त श्लोकातील वर्णन सारखेच आहे. भेद आढळत नाही.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नाडीचक्रम्

तत्रैव नाडीचक्रं तु द्वादशारं प्रतिष्ठितम् ।
शरीरं ध्रियते येन वर्तते तत्र कुण्डली ।।22 ।।
ब्रह्मरन्ध्रं सुषुम्ना या वदनेन पिधाय सा ।
अलम्बुसा सुषुम्नायाः कुहूर्नाडी वसत्यसौ ।।23 ।।
अनन्तरारयुग्मे तु वारुणा च यशस्विनी ।
दक्षिणारे सुषुम्नायाः पिंगला वर्तते क्रमात् ।।24 ।।
तदन्तरारयोः पूषा वर्तते च पयस्विनी
सुषुम्ना याः चारे स्थिता नाडी सरस्वती ।।25 ।।
शङ्खिनी चैव गांधारी तदनन्तरयोः स्थिते ।
उत्तरे तु सुषुम्नाया इडाख्या निवसत्यसौ ।।26 ।।
अनन्तरं हस्तिजिह्वा ततो विश्वोदरी स्थिता ।
प्रदक्षिणक्रमेणैव चक्रस्यारेषु नाड्यः ।।27 ।।
वर्तन्ते ह्येता द्वादशानिलवाहकाः ।।

संधिविच्छेद –तत्रैव – तत्र + एव । द्वादशारं – द्वादश + अरं । कुहूर्नाडी – कुहुः + नाडी । वसत्यसौ – वसति + असौ । अनन्तरारयुग्मे – अनन्तराः + अयुग्मे । दक्षिणारे – दक्षिण + अरे । तदन्तरारयोः – तदन्तर + अरयोः । चैव – च + एव । इडाख्या – इडा + आख्या । निवसत्यसौ – निवसति + असौ । विश्वोदरी – विश्व + उदरी । प्रदक्षिणक्रमेणैव – प्रदक्षिणक्रमेण + एव । चक्रस्यारेषु – चक्रस्य + अरेषु । ह्येता – हि + एताः । द्वादशानिलवाहकाः – द्वादश + अनिलवाहकाः ।

शब्दार्थ –द्वादशारं – बारा आरे, ध्रियते – धारण करते, विधाय – बंद करून, अनिलवाहका – वायू वाहन करणाऱ्या (नाड्या)

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –येन शरीरं ध्रियते द्वादशारं नाडीचक्रं तु तत्रैव प्रतिष्ठितम्। ब्रह्मरन्धं सुषुम्नाया वदनेन पिधाय सा कुण्डलीतत्र वर्तते। अलम्बुसा सुषुम्नायाः असौ कुहूर्नाडी वसति। अनन्तराः तु अयुग्मे वारुणा च यशस्विनी च (वर्तते)। सुषुम्नायाः दक्षिणारे क्रमात पिङ्गला वर्तते । तदन्तर–अरयोः पूषा यशस्विनी च वर्तते। सुषुम्नायाः पश्चिमे च अरे सरस्वती नाडी स्थिता। तदनन्तरयोः गांधारी शङ्खिनी च एव स्थिते। सुषुम्नायाः उत्तरे तु इडाख्या असौ निवसति। अनन्तरं हस्तिजिह्वा ततः विश्वोदरी स्थिता। प्रदक्षिणक्रमेणैव चक्रस्य अरेषु हि एताः द्वादश अनिलवाहकाः नाड्याः वर्तन्ते।

अर्थ – ज्यांच्याद्वारे या शरीराला धारण करून ठेवल्या जाते त्या बारा नाड्यांचे नाडीचक्र तेथे स्थित आहे व तेथेच ब्रह्मरन्ध व सुषुम्नेचे मुख बंद करून (सुप्तावस्थेत) असलेली कुण्डलीनी विद्यमान आहे. (नाडीचक्राच्या मध्यस्थानी असलेल्या) सुषुम्नेच्या बाजूला अलम्बुसा आणि कुहू या नाड्या आहेत त्यानंतरच्या (नाडीचक्राच्या) दोन आऱ्यां म्हणजे वारूणी नाडी व यशस्विनी नाडी होय. सुषुम्नेच्या दक्षिण बाजूच्या आऱ्यावर पिंगला नाडीचे स्थान क्रमाने येते. त्यानंतर पुढील दोन आऱ्यांवर पूषा आणि पयस्विनी या नाड्या आहेत. सुषुम्नेच्या पश्चिम बाजूच्या आऱ्यावर सरस्वती नाडी स्थित आहे व तिच्या बाजूच्या आऱ्यांवर शंखिनी आणि गांधारी या नाड्या स्थित आहे. सुषुम्नेच्या उत्तर बाजूने इडा नावाची नाडी आहे व तिच्यानंतर हस्तिजिह्वा व नंतर विश्वोदरी या नाड्या क्रमाने आहेत.

अशाप्रकारे प्रदक्षिणाक्रमाने नाडीचक्राच्या आऱ्यांचे अर्थात् क्रमशः स्थित नाड्यांचे स्थान आहे. या बारा नाड्या असून बाराही नाड्या वायूचे वहन करणाऱ्या आहेत.

वैशिष्ट्य –येथे वायुचे वहन करणाऱ्या बारा नाड्यांचे स्थान सांगिले आहे. शाण्डिल्योपनिषद् इ. मध्ये चौदा नाड्यांचे वर्णन आढळते.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पटवत्संस्थिता नाड्यो नानावर्णाः समीरिताः ।।28।।

पटमध्यं तु यत्स्थानं नाभिचक्रं तदुच्यते।

नादाधारा समाख्याता ज्वलन्ती नादरूपिणी।।29।।

पररन्ध्रा सुषुम्ना च चत्वारो रत्नपूरिताः।

कुण्डल्या पिहितं शश्वद्ब्रह्मरन्ध्रस्य मध्यमम्।।30।।

एवमेतासु नाडीषु चरन्ति दश वायवः।

संधिविच्छेद –समीरिताः – सम् + ईरिताः। तदुच्यते – तत् + उच्यते। नादाधारा – नाद + आधारा। समाख्याताः – सम् + आख्याताः। एवमेतासु – एवम् + एतासु।

शब्दार्थ –पटवत् – वस्त्राप्रमाणे, नानावर्णाः – वेगवेगळ्या रंगाच्या, समाख्याता– सांगितल्या आहेत.

अन्वय –नानावर्णाः समीरिताः नाड्यः पटवत् संस्थिताः। पटमध्यं तु यत् स्थानं तत् नाभिचक्रम् उच्यते। नादाधारा समाख्याता ज्वलन्ती नादरूपिणीपररन्ध्रा च सुषुम्ना चत्वारः रत्नपूरिताः। ब्रह्मरन्ध्रस्य शश्वद् मध्यमम् कुण्डल्या विहितम्। एवम् एतासु नाडीषु दश वायवः चरन्ति।

अर्थ – (रंगबिरंगी) वस्त्राप्रमाणे या नाड्यासुद्धा विविध रंगांनी युक्त अशा आहेत. कपड्याचा जसा मध्यभाग (अत्यंत सुशोभित) असतो त्याप्रमाणे या नाडीचक्राच्या मध्य स्थानाला नाभिचक्र म्हणतात. नादाचा आधार असलेली, प्रकाशील, नादरूप, श्रेष्ठ नाडी असलेली सुषुम्ना ही चार रत्नांनी युक्त अशी आहे. ब्रह्मरन्ध्राचा मार्ग असलेल्या सुषुम्नेला कुण्डलीनी शक्तीने (आपल्या मुखाने) बंद केले आहे. अशाप्रकारे स्थित असलेल्या या नाड्यांमध्ये दहा प्रकारचा वायू संचारित होत असतो.

वैशिष्ट्य–हठयोगाचे अनेक रहस्यमय भाग येथे सुलभ रीतिने उलगडवून दाखविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तुरीयदर्शनाभ्यासविधिः

एवं नाडीगतिं वायुगतिं ज्ञात्वा विचक्षणः ।।31।।
समग्रीवशिरःकायः संवृतास्य सुनिश्चलः ।
नासाग्रे चैव हृन्मध्ये बिन्दुमध्ये तुरीयकम् ।।32।।
स्रवन्तममृतं पश्येन्नेत्राभ्यां सुसमाहितः ।

संधिविच्छेद –संवृतास्य – संवृता + अस्य । नासाग्रे –नासा + अग्रे । चैव – च + एव । हृन्मध्ये – हृत् + मध्ये । स्रवन्तममृतं – स्रवन्तम् + अमृतं । पश्येन्नेत्राभ्यां – पश्येत् + नेत्राभ्यां ।

शब्दार्थ –नाडीगतिं – नाड्यांची गती, समग्रीवशिरःकायः – ताठमान, शरीर, डोके असणारा, ज्ञात्वा – जाणून, स्रवन्तम् – पाझरणाऱ्या,सुसमाहितः – एकाग्रचित्त असलेला ।

अन्वय –एवं नाडीगतिं वायुगतिं ज्ञात्वा समग्रीवशिरःकायः सुनिश्चलः संवृतस्य विचक्षणः नासाग्रे हृन्मध्ये बिन्दुमध्ये च एव सुसमाहितः स्रवन्तम् तुरीयकम् अमृतं नेत्राभ्यां पश्येत् ।

अर्थ – अशाप्रकारे नाडीगती आणि त्यात संचारित होणाऱ्या वायुगतीला चांगल्याप्रकारे जाणून घेवून अत्यंत जागरूक असलेल्या (साधकाने) आपली मान, डोकं व शरीर समान स्थितीत, नियंत्रित करून स्थिर करावे नंतर नासाग्रावर किंवा हृदयात किंवा बिंदूमध्ये एकाग्रचित्त करून अमृताचे स्रवण करणाऱ्या तुरीय चैतन्याला नेत्रज्योतीने पहावे.

वैशिष्ट्य–हठयोगिक प्रक्रियेच्या अभ्यासाने तृरीय चैतन्याची साक्षात् अनुभूती साधकाला मिळते हा या श्लोकाचा आशय आहे.

कालवञ्चनोपायभूतो योगः ।

अपानं मुकूलीकृत्य पायुमाकृष्य चोन्मुखम् ।।33।।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रणवेन समुत्थाप्य श्रीबीजेन निवर्तयेत् ।

स्वात्मानं च श्रियं ध्यायेदमृतप्लावनं ततः ।।34।।

कालवञ्चनमेतद्धि सर्वमुखं प्रचक्षते ।

संधिविच्छेद –पायुमाकृष्य – पायुम् + आकृष्य। चोन्मुखम् – च + उन्मुखम्। समुत्थाप्य – सम् + उत्थाय। स्वात्मानं – स्व + आत्मानं। ध्यायेदमृतप्लावनं – ध्यायेत् + अमृतप्लावनं। कालवञ्चनमेतद्धि – कालवञ्चनम् + एतत् + हि।

शब्दार्थ –अपानं– अधोगामी वायू, पायुम – गुदस्थान, कालवञ्चनम् – काळाच्या बंधनातून

अन्वय –पायुम् आकृष्य अपानं मुकूलीकृत्य उन्मुखं च प्रणवेन समुत्थाप्य श्रीबीजेन निवर्तयेत्। ततः स्वात्मानं श्रियं च अमृतप्लावनं ध्यायेत्। एतत् हि कालवञ्चनं सर्वमुखं प्रचक्षते।

अर्थ – गुदस्थान आकुंचित करून अपानवायूला रोधून त्याला प्रणवाच्या जपासह उर्ध्वगामी करावे व श्रीबीजाने त्याला सोडून द्यावे. त्यानंतर अमृतमय असलेल्या स्वात्मतत्त्वाचे व श्रीतत्त्वाचे ध्यान करावे. ही प्रक्रिया काळाच्या बंधनातून मुक्त करणारी आणि सर्वश्रेष्ठ अशी विद्या मानली जाते. या विद्येद्वारे प्राप्त सिद्धींचे वर्णन पुढील श्लोकात केले आहे.

वैशिष्ट्य–साधकाने मूलबंध लावून प्रणव जपाने एकाग्र होत श्रीतत्त्वाची उपासना केल्याने अनेक सिध्दींचा तो अधिकारी होतो.

मनसा चिन्तितं कार्यं मनसा येन सिध्यति ।।35।।

जलेऽग्निज्वलनाच्छाखापल्लवानि भवन्ति हि

नाधन्यं जागतं वाक्यं विपरीता भवेत् क्रिया ।।36।।

संधिविच्छेद –जलेऽग्निज्वलनाच्छाखापल्लवानि – जले + अग्निज्वलनात् + शाखापल्लवानि। नाधन्यं – न + अधन्यं।

शब्दार्थ –चिन्तितं – ठरवलेले, सिध्यति – सिध्द होतात, विपरीता – विररिता

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –मनसा चिन्तितं कार्यं येन मनसा सिध्यति, अग्निज्वलनात् जले शाखापल्लवानि हि भवन्ति। अधन्यं जागतं वाक्यं विपरीता क्रिया न भवेत्।

अर्थ – त्याच्या सिद्धीने योगीला संकल्पसिद्धी होते. अग्नीने जळलेल्या झाडाला सुद्धा परत शाखा, पाने इ. होतील.

वैशिष्ट्य–साधक सिध्द पुरूष होतो. त्याचे सर्व संकल्प सिध्दीस जातात.

कायदार्ढ्यबलादिसाधनभूताः योगाः।

मार्गे बिन्दुं समाबध्य वह्निं प्रज्वाल्य जीवने।
शोषयित्वा तु सलिलं तेन कायं दृढं भवेत्।।37।।
गुदयोनिसमायुक्तमाकुञ्चत्येककालतः।
अपानमूर्ध्वगं कृत्वा समानेन नियोजयेत्।।38।।
स्वात्मानं च श्रियं ध्यायेदमृतप्लावनं तत्
बलं समारभेद्योगी मध्यमद्वारभागतः।।39।।
भावयेदूर्ध्वगत्यर्थं प्राणापानसुयोगतः।
एष योगवरो देहे सिद्धिमार्गप्रकाशकः।।40।।

संधिविच्छेद –गुदयोनिसमायुक्तमाकुञ्चत्येककालतः – गुदयोनिसम् + आयुक्तम् । आकुञ्चति + एककालतः। अपानमूर्ध्वगं – अपानम् + ऊर्ध्वगं। स्वात्मानं – स्व + आत्मानं। ध्यायेदमृतप्लावनं – ध्यायेत् + अमृतप्लावनं। समारभेद्योगी – सम् + आरभेत् + योगी। भावयेदूर्ध्वगत्यर्थं – भावयेत् + ऊर्ध्वगति + अर्थं। प्राणापानसुयोगतः – प्राण : अपानसुयोगतः।

शब्दार्थ –हिंन – अग्निला, प्रज्वाल्य – प्रज्वलित करून

अन्वय –एककालतः गुदयोनिसमायुक्तम् आकुञ्चति अपानम् ऊर्ध्वगं कृत्वा समानेन नियोजयेत, मध्यमद्वारभागतः स्वात्मानं श्रियं च तत् अमृतप्लावनं बलं योगी समारभेत्। प्राण–अपानसुयोगतः ऊर्ध्वगत्यर्थं भवयेत्। योगवरो देहे एषः सिद्धिमार्गप्रकाशकः (भवति)।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ – सुषुम्नेमध्ये बिंदूलास्थिर करून (मूलाधारचक्रात) अग्नी (जठराग्नी) प्रज्वालीत करून, प्राण (रोधून) धारण करून ठेवावा असे केल्यास (साधकाचे) शरीर दृढ व्हावयास लागते. त्यानंतर एकाचवेळी गुदस्थान व योनी यांना आकुंचित करून अपान वायूला उर्ध्वगामी करून समान वायुशी युक्त करावे. त्यानंतर अमृताचे स्थान असलेल्या स्वात्मतत्त्वाचे व ज्ञानश्रिचे ध्यान करून मध्यस्थानभूत सुषुम्नेत (साधकाने) आपल्या सामर्थ्यानुसार (कुंभक साधण्याचा) अभ्यास करावा. त्याद्वारे प्राण व अपानाच्या संयोगाने उर्ध्वगती असलेल्या (समान वायूसह) प्राणाची भावना दृढ करावी. (हा अभ्यास) योगीश्रेष्ठाच्या देहामध्ये योगसिद्धींचे प्रकाशन करणारा आहे.

वैशिष्ट्य–(ह) प्राण – (ठ) अपानाचा संयोग म्हणजे हठ होय. व तो योग प्राप्त करण्याचे विविध उपाय येथे वर्णिले आहे.

देहच्छायाज्ञानविधिः

यथैवापांगतः सेतुः प्रवाहस्य निरोधकः।

तथा शरीरगा च्छाया ज्ञातव्या योगिभिः सदा।।41।।

संधिविच्छेद –यथैवापां गतः – यथा + एव + अपांगतः।

शब्दार्थ –निरोधक – अडविणारा, ज्ञातव्या – जाणावे

अन्वय –यथा एव अपांगतः सेतुः प्रवाहस्य निरोधकः तथा शरीरगा च्छाया योगिभिः सदा ज्ञातव्या।

अर्थ – ज्याप्रकारे पाण्यावर घातलेला बांध हा पाण्याच्या प्रवाहाला थांबविणारा होतो त्याप्रमाणे (अनात्मतत्त्वाच्या विषय परंपरेवर) घातलेला चित् छायारूपी बांध हा (अनात्मपदार्थांपासून रोधणारा होतो) हे योगसाधकांनी नेहमी लक्षात ठेवावे.

वैशिष्ट्य–चित्ताला बांध घतला की चित्ताकडे येणारा विषय प्रवाह थांबतो व चित्त शुध्द होते. इथे वर्णिलेल्या या प्रक्रियेलाच पातंजल योगात चित्तवृत्ति निरोध रूपी योग म्हटले आहे.

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चतुष्पथबन्धोपायः संपुटयोगः

सर्वासामेव नाडीनामेष बन्धः प्रकीर्तितः।
बन्धस्यास्य प्रसादेन स्फुटीभवन्ति देवता।।42।।
एष चतुष्पथो बन्धो मार्गत्रयनिरोधकः
एवं विकासयन् मार्गं येन सिद्धाः सुसंगता।।43।।
उदानमूर्ध्वगं कृत्वा प्राणेन सह वेगतः।
बन्धोऽयं सर्वनाडीमूर्ध्वं याति निरोधकः।।44।।
अयं च संपुटो योगो मूलबन्धोऽप्ययं मतः।
बन्धत्रयमनेनैव सिद्ध्यत्यभ्यासयोगतः।।45।।

संधिविच्छेद –सर्वासामेव – सर्वासाम् + एव । नाडीनामेष – नाडीनाम् + एष। बन्धस्यास्य – बन्धस्य + अस्य। उदानमूर्ध्वगं – उदानम् + ऊर्ध्वंग। बन्धोऽयं – बन्धः + अयं। सर्वनाडीमूर्ध्वं – सर्वनाडीम् + ऊर्ध्वं। मूलबन्धोऽप्ययं – मूलबन्धः + अपि + अयं। बन्धत्रयमनेनैव – बन्धत्रयम् + अनेन + एव। सिद्ध्यत्यभ्यासयोगतः – सिद्ध्यति + अभ्यासयोगतः।

शब्दार्थ –चतुष्पथो– चार मार्गांचा

अन्वय –सर्वासाम् एव नाडीनाम् एष बन्धः प्रकीर्तितः। अस्य बन्धस्य प्रसादेन देवताः स्फुटीभवन्ति। एषः बन्धः चतुष्पथः, मार्गत्रयनिरोधकः, एवं मार्गं विकासयन् येन सिद्धाः सुसङ्गताः। प्राणेन सह वेगतः उदानम् उर्ध्वगं कृत्वा सर्वनाडीम् ऊर्ध्वं याति अयं बन्धः निरोधकः। अयं च संपुटः योगः मूलबन्धः अपि अयं मतः। अभ्यासयोगतः अनेन एव बन्धत्रयं सिद्धयति।

अर्थ – सर्व नाड्याच्या (ठिकाणी) बंध वर्णिला आहे. या बंधाच्या सिद्धीने प्रत्येक चैतन्याचे ज्ञान प्रकाशित होते. हा (सुषुम्ना, इडा, पिंगला आणि कुहू या नाड्यांची एकता म्हणजे) चतुष्पथ होय. (हा चतुर्मार्ग मूलाधाराच्या ठिकाणी स्थित आहे)(निरंतर

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अभ्यासाने) योगसाधक जेव्हा प्राणवायू, विकसित झालेल्या सुषुम्नेच्या मार्गाने नेण्यास सिद्ध होतात. तेव्हा मार्गत्रय म्हणजे (इडा, पिंगला आणि कूहू या नाड्यांचा मार्ग अवरूद्ध होतो) हा मूलबंध होय, जेव्हा योगाभ्यासाद्वारे प्राणासह उदानवायू उर्ध्वगामी अभ्यास केल्यास अर्थात् मूलबंधासोबत जालंधर बंधाचा अभ्यास केल्यास याद्वारे सर्व नाड्याचा मार्ग अवरूद्ध होतो. (तेव्हा प्राणवायू कुंडलीनी, मन, दृष्टी, अग्नी सह) सुषुम्नामार्गाने वरती सहस्रारचक्रापर्यंत पोहचते त्याला संपुट योग असे म्हणतात. या संपूट योगालाच मूलबन्ध असेही म्हणतात. अशाप्रकारे संपूटयोगाच्या अभ्यासाने (मूलबंध, उड्डियान, जालंधरबंध) बंधत्रय सिद्ध होतात.

वैशिष्ट्य –हठयोगप्रक्रियेत त्रिविध बंधाचा व त्याद्वारे होणाऱ्या महाबंधाचा लाभ येथे वर्णिला आहे.

संपुटाभ्यासेन ब्रह्मज्ञानप्राप्तिक्रमः

दिवारात्रमविच्छिन्नं यामे यामे यदा तदा।
अनेनाभ्यासयोगेन वायुरभ्यसितो भवेत्।।46।।
वायवभ्यसिते वह्निः प्रत्यहं वर्धते तनौ।
वह्नौ विवर्धमाने तु सुखमन्नादि जीर्यते।।47।।
अन्नस्य परिपाकेन रसवृद्धिः प्रजायते।
रसे वृद्धिं गते नित्यं वर्धन्ते धातवस्तथा।।48।।
धातुनां वर्धनेनैव प्रबोधो वर्धते तनौ।
दह्यन्ते सर्व पापानि जन्मकोट्यर्जितानि च।।49।।

संधिविच्छेद –दिवारात्रमविच्छिन्नं – दिवारात्रम् + अविच्छिन्नं। अनेनाभ्यासयोगेन – अनेन + अभ्यासयोगेन। वायुरभ्यसितो – वायुः + अभ्यसितः। वायवभ्यसिते – वायो + अभ्यसिते। प्रत्यहं – प्रति + अहं। सुखमन्नादि – सुखम् + अन्नादि। धातवस्तथा – धातवः + तथा। वर्धनेनैव – वर्धनेन + एव। जन्मकोट्यर्जितानि – जन्मकोटि + अर्जितानि।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शब्दार्थ –प्रत्यहं – दररोज, प्रबोधो – जागृती, तनौ – देहामध्ये,दह्यन्ते – जळतात

अन्वय –यामे यामे यदा तदा दिवारात्रम् अविच्छिन्नं अनेन अभ्यासयोगेन वायु अभ्यसितः भवेत्। अभ्यसिते वायो तनौ प्रत्यहं वह्निः वर्धते। विविर्धमाने वह्नौ तु सुखम् अन्नादि जीर्यते। अन्नस्य परिपाकेन रसवृद्धिः प्रजायते। रसे वृद्धिंगते तथा धातवः नित्यं वर्धन्ते। धातूंना वर्धनेन एव तनौ प्रबोधः वर्धते। जन्मकोट्यर्जितानिच सर्व पापानि दह्यन्ते।

अर्थ – दिवस–रात्र निरंतर किंवा प्रत्येक प्रहरात जसा शक्य आहे तसा योगाभ्यास केल्यास त्याद्वारे वायूचे नियमन होते. वायूच्या नियमनाच्या अभ्यासाने प्रत्येक दिवशी शरीरस्थ अग्नी वाढायला लागतो. जठराग्नी वाढल्याने ग्रहण केलेले अन्नादि सहजरित्या पचविले जातात. अन्न चांगल्याप्रकारे पचविल्याने शरीरातील रस वाढायला लागतात. नित्य होणारी रसवृद्धी ही धातूंच्या वृद्धीसाठी कारणीभूत होते. धातू वर्धित झाल्याने शरीरातील ज्ञानग्रहण क्षमता वाढीस लागते आणि ज्ञानाग्नीद्वारे कोटी जन्मांमध्ये अर्जित पाप आपोआप जळून जातात.

वैशिष्ट्य–प्राणायामाच्या अभ्यासाने पुढे कोणकोणते परिणाम होतात व शेवटी हा प्राणायामाचा अभ्यास इप्सितापर्यंत कसा पोहचवतो तो क्रम येथे वर्णिला आहे.

शिवशक्तिस्थाननिरूपणम्

गुदमेढ्रान्तरालस्थं मूलाधारं त्रिकोणम्।
शिवस्य बिन्दुरूपस्य स्थानं विद्धि प्रकाशकम्।।50।।
यत्र कुण्डलिनीनाम पराशक्तिः प्रतिष्ठिता।
यस्मादुत्पद्यते वायुर्यस्माद्वह्निः प्रवर्धते।।51।।
यस्मादुत्पद्यते बिन्दुर्यस्मान्नादः प्रवर्धते।
यस्मादुत्पद्ये हंसो यस्मादुत्पद्यते मनः।।52।।
मूलाधारादिषट्चक्रं शक्तिस्थानमुदीरितम्।
कण्ठादुपरि मूर्ध्नि शांभवं स्थानमुच्यते।।53।।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संधिविच्छेद –मूलाधारं – मूल + आधारं । तस्मादुत्पद्यते – तस्मात् + उत्पद्यते। वायुर्यस्माद्वह्निः – वायुः + यस्मात् + वह्नि। बिन्दुर्यस्मान्नादः – बिन्दुः + यस्मात् + नादः। मूलाधारादिषट्चक्रं – मूलाधार + आदिषट्चक्रं। शक्तिस्थानमुदीरितम् – शक्तिस्थानम् + उदीरितम्। कण्ठादुपरि – कण्ठात् + उपरि। स्थानमुच्यते – स्थानम् + उच्यते।

शब्दार्थ –विद्धि – जाण, प्रतिष्ठिता – स्थित आहे, प्रवर्धते – वाढते

अन्वय –गुदमेढ्रान्तरालस्थं त्रिकोणं प्रकाशकं मूलाधारं शिवस्य बिन्दुरूपस्य स्थानं विद्धि यत्र कुण्डलिनीनाम् पराशक्तिः प्रतिष्ठिता। यस्मात् वायुः उत्पद्यते यस्मात् वह्निः प्रवर्धते यस्मात् बिन्दुः उत्पद्यते यस्मात् नादः प्रवर्धते यस्मात् हंसः उत्पद्यते यस्मात् मनः उत्पद्यते । मूलाधारादिषट्चक्रं शक्तिस्थानम् उदीरितम् कण्ठादुपरि मूर्ध्नि शांभवं स्थानम् उच्यते।

अर्थ – गुदस्थान आणि मेढ्रकन्द यांच्या अंतभागी त्रिकोणाकृती असलेले, प्रकाशशील असलेले असे मूलाधार चक्र असून ते शिवाचे आणि बिंदूचे (शक्तिसह शिवाचे) स्थान होय हे तू जाण. येथेच पराशक्तीरूप असलेली कुण्डलिनी शक्ती स्थित आहे. यातूनच वायू उत्पन्न होतो, यातूनच वह्नीप्रज्वालित होतो. यातूनच बिंदू उत्पन्न होतो. यातूनच नाद प्रवर्धित होतो. यातून हंस निर्माण होतो. यातूनच मन निर्माण होते. मूलाधार इत्यादि सहा चक्र हे शक्तीचे स्थान असल्याचे सांगितले जाते तर कण्ठापासून मूर्धेपर्यंत शंभूचे स्थान सांगितले जाते.

वैशिष्ट्य–मुलाधार स्थित कुण्डलिनी ही वायु, वह्नि, बिन्दू, नाद, हंस, मन, षटचक्र इ. सर्वांचा आश्रय आहे.

ब्रह्मानुसंधानसहितप्राणायाम

नाडीनामाश्रयः पिण्डो नाड्यः प्राणस्य चाश्रयाः।
जीवस्य निलय प्राणो जीवो हंसस्य चाश्रयः ।।54।।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हंसः शक्तेरधिष्ठानं चराचरमिदं जगत्।

निर्विकल्पः प्रसन्नात्मा प्राणायामं समभ्यसेत्।।55।।

संधिविच्छेद –नाडीनामाश्रयः – नाडीनाम् + आश्रयः। चाश्रयाः – च + आश्रयाः। शक्तेरधिष्ठानं – शक्तेः + अधिष्ठानं। चराचरमिदं – चराचरम् + इदमं। निर्विकल्पः – निर् + विकल्पः ।प्रसन्नात्मा – प्रसन्न + आत्मा ।समभ्यसेत् – सम् + अभ्यसेत्।

शब्दार्थ –निलय – लय होणे, अधिष्ठानं – आश्रय, प्रसन्नात्मा – आनंदतत्वाशी युक्त आत्मा

अन्वय –पिण्डः नाडीनाम् आश्रयः नाड्यः च प्राणस्य आश्रयाः ।जीवस्य निलयः प्राणः जीवः च हंसस्य आश्रयः । शक्तेः अधिष्ठानं हंसः चराचर इदं जगत् निर्विकल्पः प्रसन्नात्मा प्राणायामं समभ्यसेत्।

अर्थ – शरीर हे नाड्यांचे आश्रयस्थान आहे तर नाड्या ह्या प्राणांचे आश्रयस्थान आहे. जीवाचा आश्रय प्राण आहे. जीव हंसाच्या (परमात्म्याच्या) आश्रयाने आहे. परमात्मा हा शक्तीचे अधिष्ठान आहे. हे चराचर जगत् मायाश्रित आहे. त्या विकल्परहित, आनंदमय असलेल्या परमात्म्याच्या (हंसाच्या) स्वरूपाला जाणण्यासाठी प्राणायामाचा अभ्यास करत राहावा.

वैशिष्ट्य–येथे सर्वांच्या अधिष्ठानाच्या आश्रयाचा क्रम वर्णिला आहे.

सम्यग्बन्धत्रयस्थोऽपि लक्ष्यलक्षणकारणम्।

वेद्यं समुद्धरेन्नित्यं सत्यसंधानमानसः।।56।।

रेचकं पूरकं चैव कुम्भमध्ये निरोपयेत्।

दृश्यमाने परे लक्ष्ये ब्रह्मणि स्वयमाश्रितः।।57।।

संधिविच्छेद –सम्यग्बन्धत्रयस्थोऽपि – सम्यक् + बन्धत्रयस्थः + अपि ।समुद्धरेन्नित्यं – सम् + उद्धरेत् + नित्यं। स्वयमाश्रितः – स्वयम् + आश्रितः।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शब्दार्थ –वेद्य – जाणण्यास योग्य,समुद्धरेत् – उध्दार करावा,निरोपयेत – आरोपित करावे, दृश्यमाने – दिसणाऱ्या

अन्वय –बन्धत्रयस्थोऽपि सत्यसंधानमानसः लक्ष्यलक्षणकारणं वेद्यं। रेचकं पूरकं च एव कुम्भमध्ये निरोपयेत्। दृश्यमाने परे ब्रह्मणि लक्ष्ये स्वयम् आश्रितः नित्यं उद्धरेत्।

अर्थ – (जालंधर, उड्डियाण आणि मूलबंध) हे तीन बंध चांगल्याप्रकारे दृढ करून लक्ष्य व लक्षणाचे कारण (असलेल्या) प्रत्यक् अभिन्न चैतन्याचे स्वरूप जाणून घ्यावे व नित्य स्वरूपाशी अनुसंधान ठेवावे. रेचक, पूरक यांना कुंभकामध्ये स्थापित करावे. दृश्यमान होणाऱ्या परम लक्ष्य असलेल्या ब्रह्मतत्त्वात स्वरूपाचा आश्रय घ्यावा.

वैशिष्ट्य–त्रिबंध युक्त प्राणायामाच्या अभ्यासाने स्वरूपाशी एकचित्त राहून ब्रह्मतत्त्वाचा साक्षात्कार करावा असा उपदेश येथे केला आहे.

स्वान्तस्थविषयं सर्वं रेचकः समुदाहृतः।
पूरकं शास्त्रविज्ञानं कुम्भकं स्वगतं स्मृतम्।।58।।
एवमभ्यासचित्तश्चेत् स मुक्तो नात्र संशयः।
कुम्भकेन सदारोप्य कुम्भकेनैव पूरयेत्।।59।।
कुम्भेन कुम्भयेत् कुम्भं तदन्तस्थः परं शिवम्।
पुनरास्फालयेदद्य सुस्थिरं कण्ठमुद्रया।।60।।
वायुनां गतिमावृत्य धृत्वा पूरककुम्भकौ।

संधिविच्छेद –स्वान्तस्थविषयं – स्व + अन्तस्थविषयं। समुदाहृतः – सम् + उदाहृतः। एवमभ्यासचित्तश्चेत् – एवम् + अभ्यासचित्तः + चेत्। नात्र – न + अत्र। सदारोप्य –

सदा – आरोप्य। कुम्भकेनैव – कुम्भकेन + एव। पुनरास्फालयेदद्य – पुनः + आस्फालयेत् + अद्य।

शब्दार्थ –स्वातंस्थ – स्वतःतील, सदारोप्य – नेहमी आरोपित करून, गतिमावृत्त्य – गतीला अवरूध्द करून

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –सर्वं स्वान्तस्थविषयं रेचकः (इति) समुदाहृतः। स्वगतं पूरकं शास्त्रविषयं कुम्भकं स्मृतम्। एवं चेत् अभ्यासचित्तः सः मुक्तः अत्र न संशयः। कुम्भकेन सदा आरोप्य कुम्भकेन एव पूरयेत्। कुम्भेन कुम्भं कुम्भयेत् तदन्तस्थः परं शिवम्। सुस्थिरं कण्ठमुद्रया पुनः आस्फालयेत्। वायुनां गतिम् आवृत्य पूरककुम्भकौ धृत्वा (अभ्यसेत्)।

अर्थ – आत स्थित सर्व विषय हे रेचक होत. शास्त्रविज्ञान हे पूरक होय. तर स्वगत सर्व विषय कुम्भक होय असे ख्यात आहे अश्याप्रकारचा चित्ताचा अभ्यास असलेला साधक मुक्तच होय यात शंकाच नाही. (प्राणाला) कुंभकाद्वारे नित्य आरोपित करून कुंभकानेच पूरक करावे व कुंभकाद्वारेच कुंभकाचे धारण करावे तेच अंतर्यामी स्थित परम शिवतत्त्व आहे. त्याचेच अनुसंधान करावे. जर चित्त पुन्हा बर्हिमुख होत असेल तर कण्ठमुद्रेद्वारे (जालंधरबंधाने) चित्तास हळूहळू स्थिर करावे. वायूची गति नियंत्रित करून पुन्हा पुरक व कुंभकाचा अभ्यास करावा.

वैशिष्ट्य –येथे रेचक पूरक व कुंभक यांना अनुक्रमे विषय, शास्त्रविज्ञान आणि स्वगत असे म्हटले आहे.

वेधकयोगाभ्यासक्रमः

समहस्तयुगं भूमौ समं पादयुगं तथा।।61।।
वेधकत्रययोगेन चतुष्पीठं तु वायुना।
आस्फालयेन्महामेरूं वायुवक्त्रे प्रकोटिभिः।।62।।
पुटद्वयं समाकृष्य वायुः स्फुरति सत्वरम्।
सोमसूर्याग्निसंबन्धात् जानीयादमृताय वै।।63।।
मेरुमध्यगता देवाश्चलन्ते मेरुचालनात्।
आदौ संजायते क्षिप्रं वेधोऽस्य ब्रह्मग्रन्थितः।।64।।

संधिविच्छेद –आस्फालयेन्महामेरूं – आस्फालयेत् + महामेरूं । समाकृष्य – सम् + आकृष्य । सोमसुर्याग्निसंबन्धात्– सोमसूर्य + अग्निसंबन्धात्। जानीयादमृताय – जानीयात् + अमृताय । देवाश्चलन्ते – देवा : +चलन्ते। वेधोऽस्य – वेधः + अस्य

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शब्दार्थ –वक्त्रे– मुखात,   सत्वरम् –लवकर,

अन्वय –भुमौ समहस्तयुगं तथा समं पादयुगं वायुना वेधक्त्रययोगेन तु चतुष्पीठं महामेरूं प्रकोटिभिः वायुवक्त्रे आस्फालयेत् । पुरद्वयं समाकृष्य सत्वरं वायुः स्फुरति सोमसूर्याग्निसंबन्धात् वै अमृताय जानीयात् मेरूचलन मेरूमध्यगताः देवाः चलन्ते ।अस्य ब्रम्हग्रन्थितः वेधः आदौ क्षिप्रं संजायते ।

अर्थ – (जो साधक भूमीवर पद्मासनात स्थित आहे व ज्याचे हात, पाय समानस्थितीत आहे अशा साधकाने एकाग्रचित्त होऊन प्राणाद्वारे (ब्रह्म, विष्णू आणि रुद्र या तीन ग्रंथीचे भेदन करून)

ब्रह्मग्रन्थिं ततो भित्वा विष्णुग्रन्थिं भिनत्त्यसौ ।
विष्णुग्रन्थिं ततो भित्वा रुद्रग्रन्थिं भिनत्त्यसौ ।।65 ।।
रुद्रग्रन्थिं ततो भित्वा छित्त्वा मोहमलं तथा ।
अनेकजन्मसंस्कारगुरुदेवप्रसादतः ।।66 ।।
योगाभ्यासात् ततो वेधो जायते तस्य योगिनः
इडापिंगलयोर्मध्ये सुषुम्नानाडिमण्डले ।।67 ।।
मुद्राबन्धविशेषेण वायुमूर्ध्वं च कारयेत् ।।

संधिविच्छेद –भिनत्त्यसौ – भिनत्ति + असौ । योगाभ्यासात् योग + अभ्यासात् इडापिंगलयोर्मध्ये– इडापिंगलयोः+मध्ये । वायुमूर्ध्वं – वायुम्+ ऊर्ध्वं ।

शब्दार्थ –भित्वा – भेदन करून, छित्वा – छेदन करून

अन्वय –ततः असौ ब्रह्मग्रन्थिं भित्वा विष्णुग्रन्थिंभिनत्ति । ततः रूद्रग्रन्थिं भित्वा तथा मोहमलं छित्त्वा अनेकजन्मसंस्कारगुरुदेवप्रसादतः ततः तस्य योगिनःयोगाभ्यासात् वेधः जायते ।इडापिंगलयोः मध्ये सुषुम्नानाडिमण्डले मुद्राबन्धविशेषेण वायुम् ऊर्ध्वं च कारयेत् ।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ – ब्रह्मग्रंथींचे भेदन करून ही ग्रंथी पुढे विष्णूग्रंथीचे भेदन करते. त्यानंतर रुद्रग्रंथीचे भेदन करून मोहरूपी मलाला नष्ट करावे. अशाप्रकारे अनेक जन्माचे संस्कार सद्‌गुरुच्या कृपाप्रसादाने नष्ट होतात. अशाप्रकारे योगाभ्यासाद्वारे त्या योगसाधकाला वेध प्राप्ती होते. इडापिंगला नाड्यांच्या मध्यस्थानी असलेल्या सुषुम्ना नाडी मण्डलात, मुद्राबन्ध यांच्याद्वारे वायूला उर्ध्वगामी करावे.

वैशिष्ट्य–ग्रंथत्रयींच्या भेदनाचा क्रम येथे वर्णिला आहे. सर्व दृढप्रक्रिया करता आल्या तरी जोवर सद्‌गुरुचा कृपाप्रसाद प्राप्त होत नाही तोवर कोणतीच प्रक्रिया सिध्द होत नाही.

विघ्नशान्तये प्रणवजपः

ऱ्हस्वो दहति पापानि दीर्घो मोक्षप्रदायकः ।।68 ।।
आप्पायनः प्लुतो वापि त्रिविधोच्चारणेन तु ।
तैलधारामिवाच्छिन्नं दीर्घघण्टानिनादवत् ।।69 ।।
अवाच्यं प्रणवस्याग्रं यस्तं वेद स वेदवित् ।
ऱ्हस्वं बिन्दुगतं दैर्घ्यं ब्रह्मरन्ध्रगतं प्लुतम् ।
द्वादशान्तगतं मन्त्रं प्रसादं मन्त्रसिद्धये ।।70 ।।
सर्वविघ्नहरश्चायं प्रणवः सर्वदोषहा ।।

संधिविच्छेद –त्रिविधोच्चारणेन– त्रिविध + उच्चारणेन । तैलधारामिवाच्छिन्नं – तैलधाराम् + इव + अच्छिन्नं । प्रणवस्याग्रं– प्रणवस्य +अग्रं । यस्तं – यः + अस्तं । द्वादशान्तगतं – द्वादश +अन्तगतं । सर्वविघ्नहरश्चायं – सर्वविघ्नहरः+ चायं

शब्दार्थ –वेदवित् – वेदांचा जाणकार, सर्वदोषहा – सर्व दोष नष्ट करणारा

अन्वय –हस्वः पापानि दहति दीर्घः मोक्षप्रदायकः प्लतुः आप्पायनः वापि त्रिविधोच्चारणेन तु (प्रणवः सर्वदोषहाः) दीर्घघण्टानिनादवत् तैलधाराम् इव अच्छिन्नं प्रणवस्य अग्रम् अवाच्यं तं यः वेद स वेदवित् हस्व बिन्दुगतं दैर्घ्यं ब्रह्मरन्ध्रगतं

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्लुतं। द्वादशान्तगतं प्रसादंमन्त्रं मन्त्रसिद्धये सर्वविघ्नहरश्चायं प्रणवः सर्वदोषहा (भवति)

अर्थ – प्रणवाचा जप हा ऱ्हस्व (एकमात्रायुक्त) असेल तर तो पापांना नष्ट करतो. दीर्घरूपात (द्विमात्रायुक्त) जप केल्यास तो मोक्षप्राप्ती करून देणारा आहे. तर प्लुत जप हा परिपूर्णता (सन्तुष्टी) देणारा असा तीन प्रकारचा आहे. तेलाच्या धारेप्रमाणे संतत रूपाने केलेला, दीर्घकालपर्यंत घण्टेच्या होणाऱ्या ध्वनीप्रमाणे निनादणारा, अवाचनीय असा प्रणवमात्रेचा जप जो जाणतो तो वेद्वित् होय. ऱ्हस्वजप हा बिन्दूपर्यंत नेणारा आहे तर दीर्घजप हा ब्रह्मरन्ध्रापर्यंत नेणारा आहे तसाच प्लुत जप हा द्वादशापर्यंत पोहचविणारा आहे. असा हा प्रणवमंत्राचा कृपाप्रसाद मन्त्रसिद्ध झाल्यावर प्राप्त होणारा आहे.

सर्व संकटांचा नाश करणारा व सर्व दोषांचे हरण करणारा असा हा प्रणव आहे.

वैशिष्ट्य–प्रणवाच्या जपाचा ऱ्हस्व, दीर्घ व प्लुत मात्रांचा प्रभाव येथे वर्णिला आहे. प्रणव सर्व संकटातून साधकाचे तारण करणारा '' तद् जपः तद अर्थभावनम्'' (योगसूत्र)

आरम्भादियोगभूमिकाचतुष्टयम्

आरम्भश्च घटश्चैव तथा परिचयस्तथा ।।71।।

निष्पत्तिश्चेति कथिताश्चतस्रस्तस्य भूमिकाः ।

संधिविच्छेद –आरम्भश्च– आरम्भः +च ।घटश्चैव –घटः + च + एव ।परिचयस्तथा – परिचयः + तथा । निष्पत्तिश्चेति –निष्पत्तिः + च+इति । कथिताश्चतस्रस्तस्य– कथिताः + चतस्रः + तस्य ।

अन्वय –आरम्भः च घटः च एव तथा परिचयः तथा निष्पत्तिः च इति तस्य (योगस्य) चतस्रः भूमिकाः कथिताः ।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ – आरम्भावस्था, घटावस्था, परिचयावस्था तसेच निष्पत्ति अवस्था या चार योगाच्या भूमिका (अवस्था) आहेत.

वैशिष्ट्य–योगाच्या चार अवस्थाचा नामोल्लेख येथे केला आहे.

करणत्रयसंभूतं बाह्यं कर्म परित्यजन्।।72।।
अन्तरं कर्म कुरुते यत्रारम्भः स उच्यते।

संधिविच्छेद –यत्रारम्भः– यत्र +आरम्भः

शब्दार्थ –करणत्रय – ज्ञानेन्द्रिय, कर्मेन्द्रिय आणि मन,परित्यजन्– सोडून

अन्वय –करणत्रयसंभूतं बाह्यं कर्म परित्यजन् यत्र अन्तरं कर्म कुरूते सः (योगस्य) आरम्भः (इति)उच्यते।

अर्थ – (शारीरिक, मानसिक व वाचिक) ही तीन करणांद्वारे होणारी बाह्य कर्मे सोडून देऊन केवळ आंतरिक कर्म करत राहणे ही योगाची आरम्भावस्था होय.

वैशिष्ट्य–आरम्भ या योगावस्थेत साधक बाह्य कर्माचा त्याग करून आंतरिक कर्म (चिंतन) करीत राहतो.

वायुः पश्चिमतो वेधं कुर्वन्नापूर्य सुस्थिरम्।।73।।
यत्र तिष्ठति सा प्रोक्ता घटाख्या भूमिका बुधैः।

संधिविच्छेद –कुर्वन्नापूर्य– कुर्वन्+आपूर्य।प्रोक्ता – प्र +उक्ता।घटाख्या – घट + आख्या

शब्दार्थ –आपूर्य – भरून, सुस्थिरम् – स्थिर, प्रोक्ता –सांगितली आहे.

अन्वय –वायुः पश्चिमतः वेधं कुर्वन आपूर्य सुस्थिरं यत्र तिष्ठति सा घटाख्या भूमिका बुधैः प्रोक्ता।

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ – वायू हा पश्चिम मार्गाने अर्थात् सुषुम्नामार्गाने शरीरात प्रविष्ट होऊन व स्थिर होऊन, तीन ग्रंथींचे भेदन करून जिथे स्थित होतो ती भूमिका म्हणजे घटावस्था होय असे विद्वानांद्वारे सांगितले आहे.

वैशिष्ट्य–घटावस्थेत वायूचे सुषुम्नामार्गात प्रविष्ट होऊन ग्रंथीभेदन करणे अपेक्षित आहे.

न सजीवो न निर्जीवः काये तिष्ठति निश्चलम् ।
यत्र वायुः स्थिरः खे स्यात् सेयं प्रचयभूमिका ।।74।।

संधिविच्छेद –निश्चलम् – निस्+चलम् ।सेयं – सा+इयं ।

शब्दार्थ –काये– शरीरात, खे – आकाशात

अन्वय –सजीवःन निर्जीवःन काये निश्चलं तिष्ठति । यत्र खे वायुः स्थिरः स्यात् सा इयं प्रचयभूमिका(भवति) ।

अर्थ – (क्रियारहित झाल्याने तो) सजीव नाही व (प्राण धारण करून ठेवल्याने) निर्जीव नाही असे शरीरात निश्चेष्ट होऊन राहणे व जेथे (सहस्रार आकाशात) आकाशात वायू स्थिर होतो ती प्रचयभूमिका होय.(परिचया अवस्था)

वैशिष्ट्य–प्रचय किंवा परिचय अवस्थेत साधक जीव–अजीवह्या दोन्हीही संज्ञांच्या परे असतो.

यत्रात्मना सृष्टिलयौ जीवन्मुक्तिदशां गतः ।
सहजः कुरुते योगं सेयं निष्पत्तिभूमिका ।।75।।

संधिविच्छेद –यत्रात्मना–यत्र +आत्मना। जीवन्मुक्तिदशां – जीवत् + मुक्तिदशां । सेयं – सा + इयं ।

शब्दार्थ –दशां – अवस्थेत, गतः – गेलेला

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अन्वय –यत्र आत्मना सृष्टिलयौ जीवनमुक्तिदशां गतः , योगः सहजं कुरुते सा इयं निष्पत्तिभूमिका(प्रोक्ता)।

अर्थ– जेथे (तुरीयावस्थेत) आत्मतत्त्वाने सृष्टीप्रलय करून जीवन्मुक्ती दशा प्राप्त करून, सहजावस्थेत अर्थात् असम्प्रज्ञात समाधीस प्राप्त होतो हीच निष्पत्ती भूमिका होय.

वैशिष्ट्य–निष्पत्ती अवस्था साधकाला जीवन्मुक्ती प्रदान करते. तो स्वरूपात स्थित होतो.

एतद्विद्यापठनवेदनयोः फलम्

एतदुपनिषदं योऽधीते सोऽग्निपूतो भवति। स वायुपूतो भवति। सुरापानात् पूतो भवति। स्वर्णस्तेयात् पूतो भवति। स जीवन्मुक्तो भवति।।76।।

तदेतदृचाभ्युक्तम्। तद्विष्णोः परमं पदं सदा पश्यन्ति सूरयः। दिवीव चक्षुराततम्। तद्विप्रासो विपन्यवो जागृवांस समिन्धते। विष्णोर्यत्परमं पदमित्युपनिषत्।।77।।

संधिविच्छेद –एतदुपनिषदं – एतत् + उपनिषदं ।योऽधीते – यः अधीते। सोऽग्निपूतो – सः + अग्निपूतः । तदेतदृचाभ्युक्तम् – तत् + एतत् + ऋचाभि + उक्तम् । तद्विष्णोः – तत् + विष्णोः । दिवीव – दिवि + इव । चक्षुराततम् – चक्षुः + आतमम् । तद्विप्रासो – तत् + विप्रासः । समिन्धते – सम् + इन्धते । विष्णोर्यत्परमं – विष्णोः + यत् + परमं। पदमित्युपनिषत् – पदम् + इति + उपनिषत् ।

अर्थ – या उपनिषदाचे जो अध्ययन करतो तो अग्निप्रमाणे शुद्ध होतो. तो वायूप्रमाणे पवित्र होतो, सुराप्राशनाने पवित्र होतो, स्वर्णचोरीपासूनही पवित्र होतो. तो जीवन्मुक्त होतो हे त्या त्या ऋचेद्वारे सांगितल्या गेले आहे. तेच विष्णूचे श्रेष्ठ पद आहे. हे पद सर्व

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

देवतांद्वारे पाहल्या गेले आहे. स्वर्गाप्रमाणे ते प्रत्यक्ष आहे. ज्ञानी ब्राह्मण त्या अवस्थेत जाग्रत राहून त्या पदाला अभिवर्धित करतात. हेच विष्णूचे श्रेष्ठ पद आहे. हाच या उपनिषदाचा सार आहे.

वैशिष्ट्य–या उपनिषदाच्या अध्ययनाचे फळ येथे वर्णिले आहे. प्रत्यक्ष विष्णुभगवंताने वराहरूपात या ज्ञानाचे भंडार ऋभू ऋषींच्या निमित्त्याने सर्व जिज्ञासूंसाठी खुले केले व स्वपदी विष्णुपदी पोहचण्याचा दिव्य मान साधकांना दाखविला.

इति पञ्चमोऽध्यायः

इति वराहोपनिषद्विवरणं संपूर्णम्

CC-0. Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection